७० वर्ष
निर्भीड पत्रकारीतेची

दैनिक
# संध्या
नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक

बुधवार, दि. १३ मे २०२६

www.dainikesandhya.com www.youtube.com/@sandhyalivenews

संस्थापक : कै. वसंत काणे | नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ | पुणे आवृत्ती | पाने : ८ | अंक : १३७ | Gmail : news.sandhya@gmail.com | किंमत : ७ रूपये

# शरद पवारांची सर्वपक्षीय बैठक बोलावण्याची मागणी

## मोदींना म्हणाले - राष्ट्रीय हिताच्या प्रश्नांवर सर्वांना विश्वासात घेऊन निर्णय - प्रक्रिया राबवा



**मुंबई (दै. संध्या)**

मध्यपूर्वेतील वाढत्या युद्धजन्य आणि अस्थिर परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दोन दिवसांपूर्वी केलेल्या घोषणांवर ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी गंभीर चिंता व्यक्त केली आहे. या निर्णयांचा देशाच्या अर्थव्यवस्थेवर मोठा आणि दूरगामी परिणाम होऊ शकतो, असे मत त्यांनी मांडले. या घोषणा अचानक करण्यात आल्याने सामान्य नागरिक, उद्योग-व्यवसाय क्षेत्र तसेच गुंतवणूकदारांमध्ये अस्वस्थतेचे वातावरण निर्माण झाल्याचेही त्यांनी नमूद केले. सध्याची परिस्थिती चिंताजनक असून केंद्र सरकारने अधिक जबाबदारीने पावले उचलण्याची गरज असल्याचे पवार यांनी स्पष्ट केले. या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्वतःच्या अध्यक्षतेखाली सर्वपक्षीय बैठक बोलवावी, अशी मागणी शरद पवार यांनी केली आहे. राष्ट्रीय हिताशी संबंधित महत्त्वाच्या प्रश्नांवर निर्णय घेताना सर्व राजकीय पक्षांना विश्वासात घेणे आवश्यक असल्याचे त्यांनी म्हटले. देशासमोर निर्माण झालेल्या परिस्थितीत एकत्रित चर्चा आणि व्यापक सल्लामसलत गरजेची असल्याचे सांगत पवार यांनी केंद्र सरकारने संवेदनशीलतेने भूमिका घ्यावी, असे आवाहन केले. देशहिताच्या मुद्द्यांवर सामूहिक निर्णय प्रक्रिया अधिक प्रभावी ठरू शकते, असेही त्यांनी नमूद केले. शरद पवार यांनी पुढे अर्थतज्ज्ञ, उद्योग क्षेत्रातील प्रतिनिधी आणि विविध तज्ज्ञांची तातडीने बैठक घेण्याचीही मागणी केली आहे. आंतरराष्ट्रीय परिस्थितीचा देशाच्या आर्थिक आणि औद्योगिक क्षेत्रावर काय परिणाम होऊ शकतो, याचा सखोल आढावा घेणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. आगामी धोरणांबाबत व्यापक विचारविनिमय करूनच पुढील निर्णय घ्यावेत, असेही त्यांनी सुचवले. देशातील जनतेमध्ये विश्वास, स्थैर्य आणि सुरक्षिततेची भावना निर्माण करणे हेच सध्याच्या परिस्थितीत केंद्र सरकारचे सर्वोच्च प्राधान्य असले पाहिजे, अशी ठाम भूमिका शरद पवार यांनी मांडली. या विषयाचे गांभीर्य लक्षात घेऊन प्रधानमंत्र्यांनी स्वतःच्या अध्यक्षतेखाली सर्वपक्षीय बैठक आयोजित करावी. राष्ट्रीय हिताच्या प्रश्नांवर सर्व पक्षीय नेत्यांना विश्वासात घेऊन निर्णय-प्रक्रिया राबविणे देशहितासाठी अत्यंत आवश्यक आहे. सध्याची आंतरराष्ट्रीय परिस्थिती लक्षात घेता केंद्र सरकारने अधिक संवेदनशीलता आणि व्यापक सल्लामसलत यांना प्राधान्य देणे आवश्यक आहे. यासोबतच प्रधानमंत्र्यांनी देशातील नामवंत अर्थतज्ज्ञ, उद्योग क्षेत्रातील प्रतिनिधी आणि संबंधित तज्ज्ञांची तातडीने बैठक बोलावून परिस्थितीचा सखोल आढावा घ्यावा. पुढील धोरणांबाबत व्यापक विचारविनिमय करावा. देशातील जनतेमध्ये विश्वास आणि स्थैर्य निर्माण करणे, यालाच सद्यस्थितीत सरकारचे सर्वोच्च प्राधान्य असले पाहिजे, अशी आमची ठाम भूमिका आहे.

### सुरूवात स्वत:पासून केली पाहिजे - बाळासाहेब थोरात

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जे काटकसरीचे आवाहन केले आहे याबद्दल अगोदरच राहुल गांधी यांनी सांगितले होते. निवडणुकीच्या काळात प्रचंड धुमाकुळ केला. प्रचंड इंधन वापरले आणि आता हे काटकसर सांगत आहेत. हे काही बरोबर नाही, सुरूवात स्वत:पासून केली पाहिजे, असे काँग्रेस नेते बाळासाहेब थोरात यांनी म्हटले आहे.

# NEET पेपर लीक, परीक्षा रद्द, CBI चौकशी करणार; उत्तर न देताच गेले शिक्षण मंत्री

**नवी दिल्ली (दै. संध्या)**



पेपरफुटीच्या आरोपांच्या पार्श्वभूमीवर, राष्ट्रीय चाचणी संस्थेने (NTA) मंगळवारी नीट (यूजी) २०२६ परीक्षा रद्द केली. ही परीक्षा ३ मे रोजी झाली होती. या परीक्षेला २२.७९ लाख विद्यार्थी बसले होते. एनटीएचे महासंचालक (डीजी) अभिषेक सिंह म्हणाले, "या चुकीसाठी आम्ही जबाबदार आहोत. परीक्षा पुन्हा घेतली जाईल. नवीन तारीख ६ ते ८ दिवसांत जाहीर केली जाईल." दरम्यान, केंद्र सरकारने या प्रकरणाचा तपास सीबीआयकडे सोपवला आहे. या संस्थेने या प्रकरणात एफआयआर दाखल केला आहे. एनटीएने म्हटले आहे की, भारत सरकारची परवानगी मिळाल्यानंतर परीक्षा रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला. दरम्यान, दिल्लीत शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांना या प्रकरणी माध्यमांनी प्रश्न विचारले असता, ते काहीही न बोलता निघून गेले.

'प्रश्न बँक'मध्ये फिजिक्स, केमिस्ट्री आणि बायोलॉजीचे 300 हून अधिक प्रश्न होते. हे सर्व हाताने लिहिलेले होते आणि त्यांचे हस्ताक्षरही एकच होते. यापैकी 150 प्रश्न नीटच्या पेपरमध्ये जसेच्या तसे आले. पेपरमध्ये एकूण 180 प्रश्न सोडवायचे असतात आणि प्रत्येक प्रश्न 4 गुणांचा असतो. म्हणजेच, 720 पैकी 600 गुणांचे प्रश्न थेट 'प्रश्न बँक'मधून आले. तज्ञांच्या मते, एखाद्या विशिष्ट गेस पेपरमधून परीक्षेत काही प्रश्न जसेच्या तसे येण्याची शक्यता असते, परंतु इतक्या मोठ्या संख्येने प्रश्न येण्याची शक्यता सहसा नसते. आतापर्यंत कथित 'प्रश्न बँक' किती विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचली, याचा आकडा समोर आलेला नाही, पण ही संख्या मोठी असण्याची शक्यता आहे. खरं तर, ज्यांना हे व्हॉट्सॲपवर मिळाले, त्यात मेसेजसोबत 'फॉरवर्डेड मेनी टाइम्स' असे लिहिलेले येत आहे.

क्युआर स्कॅन करून दै. संध्याच्या युट्युब चॅनलला सबस्क्राईब करा
SUBSCRIBE
www.sandhyaepaper.com

### ब्रेकिंग न्यूज

## शिक्षणाच्या संधी वाढणार : पाटील

मुंबई (दै. संध्या) : राज्यातील आदिवासीबहुल क्षेत्रातील विद्यापीठांमध्ये आदिवासी अध्ययन, संशोधन आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना देण्यासाठी आदिवासी अध्यासन केंद्र सुरू करण्यात येणार आहे. राज्यातील विद्यापीठांमध्ये आदिवासी अध्ययन व संशोधनाला या निर्णयांमुळे गती मिळणार असून, त्याचा थेट लाभ आदिवासी विद्यार्थ्यांना होणार आहे. या उपक्रमामुळे आदिवासी विद्यार्थ्यांसाठी गुणवत्तापूर्ण उच्च शिक्षणाच्या संधी वाढणार असल्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी सांगितले. मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या अध्यक्षतेखाली आदिवासी अध्यासन केंद्रांना निधी उपलब्ध करण्याबाबत मंत्रालयात बैठक झाली. या बैठकीस आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक वुईके, उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे अपर मुख्य सचिव बी. वेणुगोपाल रेड्डी, उच्च शिक्षण विभागाचे संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर, आदिवासी विकास विभागाचे सहसचिव मच्छिंद्र शेळके, मुंबई, जळगाव, नांदेड, अमरावती, गडचिरोली विद्यापीठाचे कुलगुरू उपस्थित होते. मंत्री चंद्रकांतदादा पाटील म्हणाले, जळगाव, नांदेड व मुंबई विद्यापीठात आदिवासी अध्यासन केंद्र कार्यरत असून अमरावती व गडचिरोली विद्यापीठात नव्याने आदिवासी अध्यासन केंद्र सुरु करण्यात येणार आहेत. या विद्यापीठाला आदिवासी अध्ययन केंद्रासाठी ३ कोटी रुपयांचा निधी आदिवासी विकास विभागाकडून उपलब्ध करून देण्यात येणार आहे. या निधीतून केंद्रांची उभारणी, संशोधन उपक्रम आणि विद्यार्थ्यांसाठी आवश्यक शैक्षणिक सुविधा विकसित करण्यात येणार आहेत. आदिवासी समाजाच्या सामाजिक, सांस्कृतिक आणि आर्थिक विकासासाठी संशोधनाधारित उपक्रमांना प्रोत्साहन दिले जाणार आहे. महाराष्ट्रातील आदिवासी जमातींची समृद्ध लोकसंस्कृती, भाषा आणि परंपरा जतन करणे तसेच त्यांच्या सामाजिक व आर्थिक विकासासाठी संशोधन करणे हा या केंद्रांचा मुख्य उद्देश आहे.

# पर्यटनमंत्री शंभूराज देसाई यांनी रद्द केला लंडन-पॅरिस दौरा"



**मुंबई (दै. संध्या)**

देशातील सध्याची कठीण आंतरराष्ट्रीय परिस्थिती लक्षात घेता पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी विदेशी चलनाची बचत करण्यासाठी अनावश्यक परदेश दौरे आणि खर्च टाळण्याचे आवाहन केले आहे. पंतप्रधानांच्या या संदेशाला सकारात्मक प्रतिसाद देत महाराष्ट्राचे पर्यटन,खनिकर्म आणि माजी सैनिक कल्याणमंत्री, पालकमंत्री, सातारा जिल्हा शंभूराज देसाई यांनी आपल्या कुटुंबासोबत नियोजित असलेला युरोप दौरा रद्द करण्याचा निर्णय घेतला आहे. माहितीनुसार, सुमारे तीन महिन्यांपूर्वी ही कौटुंबिक परदेश सहल ठरविण्यात आली होती. या दौऱ्यात लंडन, पॅरिस आणि ॲम्स्टरडॅम या प्रमुख शहरांचा समावेश होता. कुटुंबासोबत सुट्टी आणि पर्यटनासाठी हा दौरा आखण्यात आला होता. मात्र, देशहिताला प्राधान्य देत आणि विदेशी चलन बचतीचा संदेश जनतेपर्यंत पोहोचावा या उद्देशाने देसाई यांनी हा दौरा रद्द केल्याची माहिती समोर आली आहे. राजकीय वर्तुळात या निर्णयाचे स्वागत होत असून "देश प्रथम" या भूमिकेचे हे उदाहरण मानले जात आहे. वैयक्तिक आनंद आणि सुट्टीपेक्षा राष्ट्रहित अधिक महत्त्वाचे असल्याचा संदेश या निर्णयातून देण्यात आल्याची चर्चा आहे. देशहिताला प्राधान्य, जबाबदारीची जाणीव आणि साधेपणाचा संदेश देत शंभूराज देसाई यांनी माननीय पंतप्रधानांच्या आवाहनाला सकारात्मक प्रतिसाद दिला, त्यामुळे त्यांच्या या निर्णयाचे राजकीय वर्तुळात कौतुक होत आहे.

# माजी सैनिकांसाठी एकात्मिक कल्याण केंद्र उभारण्यास मान्यता

*राज्यपाल जिष्णु देव वर्मा : माजी सैनिकांचे पुनर्वसन व पुनर्स्थापनेसाठीच्या विशेष निधी (महाराष्ट्र) समितीची ५० वी वार्षिक बैठक*

**मुंबई (दै. संध्या)**



पंढरपूर येथे मोठ्या प्रमाणात भाविक येतात. येथे वारी आणि दर्शनासाठी येणाऱ्या माजी सैनिकांच्या सोयीसाठी त्याचप्रमाणे सातारा येथेही एकात्मिक कल्याण केंद्र उभारण्यासाठी व्यवहार्यता पडताळून प्रस्ताव पाठविण्यास राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी मान्यता दिली. माजी सैनिकांचे पुनर्वसन व पुनर्स्थापनेसाठीच्या विशेष निधी (महाराष्ट्र) समितीची 50 वी वार्षिक बैठक राज्यपालांच्या अध्यक्षतेखाली लोकभवन येथे झाली. या बैठकीत माजी सैनिक व त्यांच्या कुटुंबीयांच्या कल्याणासाठी विविध महत्त्वपूर्ण प्रस्तावांनाही मान्यता देण्यात आली. पर्यटन, खनिकर्म व माजी सैनिक कल्याण मंत्री शंभूराज देसाई, सामान्य प्रशासन विभागाचे अपर मुख्य सचिव संतोष कुमार, महाराष्ट्र, गोवा व गुजरात प्रभागाचे प्रमुख लेफ्टनंट जनरल डी. एस. कुशवाहा, रिअर ॲडमिरल शंतनु झा, एअर व्हाइस मार्शल प्रशांत वडोदकर, राज्यपालांचे सचिव डॉ. प्रशांत नारनवरे, सैनिक कल्याण संचालक तसेच संबंधित अधिकारी यावेळी उपस्थित होते. राज्यपाल हे माजी सैनिकांचे पुनर्वसन व पुनर्स्थापना यासाठीच्या विशेष निधी समितीचे पदसिद्ध अध्यक्ष आहेत.

माजी सैनिकांच्या पुनर्वसनासाठी आवश्यक आर्थिक साहाय्य उपलब्ध करून देणे. पुनर्स्थापना उपक्रमांना संस्थात्मक पाठबळ देणे, माजी सैनिक व त्यांच्या कुटुंबीयांच्या सामाजिक, शैक्षणिक व आरोग्यविषयक गरजांची पूर्तता करणे, निधीच्या योग्य व पारदर्शक वापरावर देखरेख ठेवणे या उद्देशाने ही समिती कार्य करते. या बैठकीत लष्करी मुला-मुलींची वसतिगृहे, माजी सैनिकांसाठी विश्रामगृहे, महासैनिक हॉल व लॉन्स तसेच पुणे येथील सैनिक कल्याण संचालनालयातील अशासकीय कर्मचाऱ्यांच्या वेतनवाढीस कार्योत्तर मान्यता देण्यात आली. तसेच किमान वेतन कायद्यानुसार करण्यात आलेल्या वेतन पुनर्निर्धारणालाही समितीने कार्योत्तर मान्यता दिली. रत्नागिरी जिल्ह्यातील खेड येथील तसेच धुळे येथील मिलिटरी बॉईज हॉस्टेलचे माजी सैनिक विश्रामगृहात रूपांतर करण्यास बैठकीत मान्यता देण्यात आली. राज्यातील विविध जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयांच्या अखत्यारीतील लष्करी मुला-मुलींची वसतिगृहे, माजी सैनिक विश्रामगृहे तसेच महासैनिक हॉल व लॉन्स येथे सौर ऊर्जा प्रकल्प उभारण्यासही समितीने कार्योत्तर मान्यता दिली. या निर्णयामुळे ऊर्जा बचतीसह पर्यावरणपूरक उपक्रमांना चालना मिळणार आहे. याशिवाय दुरुस्ती व नवीन बांधकामांच्या ब्लॉक अंदाजपत्रकांबाबतही समितीने चर्चा करून सविस्तर अंदाजपत्रके प्राप्त झाल्यानंतर मंजुरी देण्याचे अधिकार राज्य कार्यकारी समितीस प्रदान करण्याचा निर्णय घेण्यात आला.

राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी समितीमार्फत व्यावसायिक स्वरुपात चालविल्या जाणाऱ्या विविध उपक्रमांचा आढावा घेण्याचे निर्देश देऊन या उपक्रमांमध्ये माजी सैनिकांना प्राधान्याने रोजगार उपलब्ध व्हावा अशी सूचना केली. मंत्री शंभूराज देसाई यांनी सातारा येथे माजी सैनिक कल्याण केंद्र उभारण्यासाठी आवश्यक जागा उपलब्ध असल्याचे सांगितले. या प्रस्तावास राज्यपालांनी सहमती दर्शवून पंढरपूरसह सातारा येथील केंद्रासाठी आर्थिक आणि अनुषंगिक बाबी तपासून प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश दिले.

### मुख्यमंत्री फडणवीस, उपमुख्यमंत्री शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार आणि मंत्री चंद्रकांत पाटील यांच्याकडे निवेदनाद्वारे पाठपुरावा करणार

# पुनर्वसनाची पुढील प्रक्रिया राबवावी : डॉ. नीलम गोऱ्हे

**मुंबई (दै. संध्या)**



पुण्यातील महात्मा फुले स्मारक रहिवाशी कृती समितीच्या प्रलंबित प्रश्नांबाबत विधानभवनात आढावा घेण्यात आला. पुनर्वसनाची प्रक्रिया राबविताना स्थानिक रहिवाशांना विश्वासात घेण्यात यावे, असे निर्देश विधानपरिषद उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले.

महात्मा फुले स्मारक रहिवाशी कृती समिती, पुणे यांच्या प्रलंबित प्रश्नांबाबत डॉ. नीलम गोऱ्हे यांच्या अध्यक्षतेखाली प्रत्यक्ष व दूरदृश्य प्रणालीद्वारे बैठक पार पडली. या बैठकीत रहिवाशांच्या पुनर्वसन, मोबदला, फ्लॅट वाटप आणि सर्वेक्षणासंदर्भातील विविध मुद्द्यांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

बैठकीदरम्यान डॉ. नीलम गोऱ्हे यांनी संबंधित अधिकाऱ्यांना इतर महानगरपालिकांमध्ये देण्यात आलेल्या मोबदल्याचा अभ्यास करण्यात यावा, असे निर्देश दिले. महानगरपालिका किती जागा सामावून घेऊ शकते याचाही अभ्यास करण्यात यावा. ज्या महानगरपालिकांमध्ये जितका मोबदला देण्यात आला आहे त्याचाही अभ्यास करण्यात येणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. उपसभापती डॉ. गोऱ्हे यांनी महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांना 15 तारखेला विशेष बैठक घेण्यात यावी, अशा सूचना दिल्या. संबंधित रहिवाशांसमोर धोरण मांडण्यात यावे, त्यांना आवाहन करण्यात यावे आणि त्यांचा विश्वास संपादन करण्यात यावा, असेही त्यांनी सांगितले. पुनर्वसन प्रक्रियेत पारदर्शकता आणि लोकाभिमुख भूमिका महत्त्वाची असून ज्यांना रोख रक्कम हवी आहे त्यांना रोख मोबदला आणि ज्यांना फ्लॅट हवा आहे त्यांना फ्लॅट देण्याचा पर्याय विचारात घेण्यात यावा. सर्व स्मारकांचे सर्वेक्षण करून संपूर्ण तपशील लोकांसमोर मांडण्यात यावा, असेही त्यांनी सांगितले. कृती समितीच्या सदस्यांना स्थायी समिती सदस्यांकडे निवेदन सादर करून आपले मत अधिकृतपणे नोंदविण्याचाही सल्ला डॉ. गोऱ्हे यांनी दिला. त्यामुळे किती लोक घर स्वीकारण्यास तयार आहेत आणि किती लोकांना रोख रक्कम हवी आहे याची स्पष्ट माहिती उपलब्ध होईल. बैठकीपूर्वी लोकांचे मत जाणून घेतले तर ते उपयोगी ठरेल, असेही त्यांनी नमूद केले.

बैठकीत पुणे महानगरपालिकेचे उपायुक्त सपकाळ यांनी सर्व संबंधितांची स्वतंत्र बैठक घेऊन वन-टू-वन संवाद साधावा. त्यानंतर लोकांना विश्वासात घेऊन पुनर्वसनाची पुढील प्रक्रिया राबविण्यात यावी, असे निर्देश डॉ. नीलम गोऱ्हे यांनी दिले. तसेच महात्मा फुले स्मारक रहिवाशांच्या पुनर्वसनाबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार तसेच मंत्री चंद्रकांत पाटील यांच्याकडे निवेदनाद्वारे पाठपुरावा करण्यात येणार असल्याची माहिती बैठकीत देण्यात आली. बैठकीस पुणे महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त प्रजित नायर, उपायुक्त सपकाळ, नगर विकास विभाग 2 च्या उपसचिव प्रियंका छापवाले, महात्मा फुले स्मारक रहिवाशी कृती समितीचे अध्यक्ष निलेश गिरमे, समितीचे सदस्य विशाल मोहिते, अमर नाईक, अविनाश देवकुळे, श्रीनिवास गोणे, नरेंद्र कच्चावे यांच्यासह इतर सदस्य दूरदृश्य प्रणालीद्वारे उपस्थित होते.

# अनधिकृत बाईक टॅक्सी ॲप्सवर कारवाई करा – मंत्री प्रताप सरनाईक

**मुंबई (दै. संध्या)**



■ सायबर क्राईम विभागाला पत्र

राज्यात बेकायदेशीरपणे सुरू असलेल्या अनधिकृत बाईक टॅक्सी सेवांविरोधात परिवहन विभागाने कठोर भूमिका घेतली असून, ओला, उबर आणि रॅपिडोसारख्या अनधिकृत बाईक टॅक्सी ॲप सेवा तत्काळ बंद करून संबंधित कंपनी मालकांवर एफआयआर दाखल करण्याची मागणी परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी सायबर क्राईम विभागाकडे पत्राद्वारे केली आहे. त्याचबरोबर परिवहन आयुक्त यांनी देखील यासंदर्भात सायबर क्राईम विभागाकडे पत्र पाठविले आहे.

मंत्री सरनाईक यांनी पत्रात नमूद केले आहे की, राज्यात गेल्या काही महिन्यांपासून विविध ॲप्सच्या माध्यमातून कोणतीही वैध परवानगी, शासन मान्यता किंवा परिवहन विभागाच्या नियमांचे पालन न करता प्रवासी वाहतूक सुरू आहे. विशेषतः रॅपिडोसारख्या संस्थांच्या अनधिकृत बाईक टॅक्सींचे प्रमाण वाढत असून, ही बाब सार्वजनिक सुरक्षेच्या दृष्टीने अत्यंत गंभीर आहे.

या अनधिकृत सेवांमध्ये प्रवाशांच्या सुरक्षिततेची कोणतीही हमी नसून चालकांची पडताळणी, विमा संरक्षण, महिला सुरक्षाविषयक उपाययोजना तसेच आपत्कालीन प्रतिसाद यंत्रणा अत्यंत अपुरी असल्याचा आरोपही त्यांनी केला आहे. त्यामुळे नागरिकांच्या जीवितास गंभीर धोका निर्माण होण्याची शक्यता असल्याचे पत्रात नमूद करण्यात आले आहे. याशिवाय, शासनाच्या परिवहन नियमांचे खुलेआम उल्लंघन करून या ॲप्समार्फत आर्थिक व्यवहार सुरू असल्याने परवानाधारक रिक्षा व टॅक्सी चालकांच्या व्यवसायावर अन्यायकारक परिणाम होत असल्याचे परिवहन विभागाने म्हटले आहे.

सायबर क्राईम विभागाकडे करण्यात आलेल्या मागण्यांमध्ये अनधिकृत बाईक टॅक्सी ॲप्सचे ऑनलाईन संचालन तात्काळ बंद करणे, संबंधित ॲप कंपन्या, चालक आणि व्यवस्थापनाविरुद्ध माहिती तंत्रज्ञान कायदा व मोटार वाहन कायद्यानुसार कठोर कारवाई करणे तसेच कंपनी मालकांवर गुन्हे दाखल करण्याबाबत नमूद करण्यात आले आहे.

## संपादकीय

# शहरांनी सुरळीत धावण्यासाठी त्यांच्या पायांना कसली चाकं हवीत?



शहरांच्या वेगात मोठी भूमिका त्यातल्या दळणवळणाच्या साधनांची असते. वेग म्हटलं की आपल्या डोळ्यासमोर फक्त गोळीच्या वेगानं सणाणत निघालेल्या बुलेट ट्रेनचं चित्रच काय ते येतं. पण दळणवळणाच्या साधनांचा वेग शहरांच्या वेगासाठी तितका महत्त्वाचा नसतोच. गोंधळलात ना ?! एक मिनिट ! पण खरंच. बस किंवा टॅक्सी किंवा ट्रेन ताशी किती किमी वेगानं धावते, हे महत्त्वाचं नसतं. शहर दीर्घकाळ सुरळीत चालण्यासाठी सार्वजनिक वाहतुकीचा वेग नाही, तर इतर अनेक घटक जास्त महत्त्वाचे असतात. एकाच एक प्रकारची वाहतूक आहे की त्या त्या भागाच्या वापराला आणि भूगोलाला अनुसरून बस, ट्रेन, रिक्षा, टॅक्सी, टमटम, मेट्रो, दुचाकी वाहनं, खासगी वाहनं.. इत्यादी प्रकारांचं यथायोग्य मिश्रण आहे? ते सर्वसामान्य माणसांना सहज वापरता येईल असं नि इतकं स्वस्त आहे का ? वाहतूक प्रकारांची ही जाळी आपापसांत 'बोलतात' का – म्हणजे ट्रेन आहे, पण कनेक्टिंग बस नाही, म्हणून ताटकळत बसावं लागतं, असं तर होत नाही ना? प्रवास सुखदायक आहे का? की रोज जिवाची बाजी लावावी लागते प्रवासात? उपलब्धतेत सातत्य आहे का ? असे अनेक प्रश्न असतात. या सगळ्या प्रश्नांची उत्तरं समाधानकारक असतील, तर शहरं सुरळीत धावतात. असं म्हणतात, सार्वजनिक वाहतुकीवर आज खर्चलेला एक रुपया नजीकच्या भविष्यकाळात शहरांच्या अर्थव्यवस्थेला पाच रुपये कमावून देतो. जर्मनीत २०२२ साली झालेला '९-युरो तिकीट' नावाचा यशस्वी प्रयोग पुष्कळ बोलका आहे. जर्मनीतल्या शहरांत उपनगरी रेल्वे, जमिनीखालून जाणारी मेट्रो, ट्रॅम, उपनगरी बस अशी बहुरंगी सार्वजनिक वाहतूकव्यवस्था आहे. ९ युरोंचं तिकीट घ्या नि यातल्या कुठल्याही वाहनांतून एक दिवस कितीही प्रवास करा, अशी एक योजना त्यांनी काही शहरांत जाहीर केली. हे फार स्वस्त, सोयीस्करही होतं. महागड्या गाड्या बाळगायची आणि रहदारीच्या किचकिचाटात अडकून पडायची सक्ती टाळून बरेच लोक सार्वजनिक वाहनांनी ये-जा करायला लागले. वेळ, पैसे, ताकद तर वाचलीच. पण प्रदूषणही कमी झालं. मग तो प्रयोग जर्मनीभर राबवण्यात आला. युरोपात सगळीकडेच त्याची पुनरावृत्ती झाली. लक्झेंबर्गमधल्या मंडळींनी त्यांची सार्वजनिक वाहतूक पूर्णतः चकटफू करून टाकली. फ्रान्समधल्या शहरांत खाजगी पार्किंगसाठी राखलेले भले-दांडगे भूखंड आणि इमारती काढून घेण्यात आल्या आणि त्या सार्वजनिक वापराला खुल्या केल्या. 'जिथले श्रीमंत लोक सार्वजनिक वाहतूक वापरतात, तो खरा प्रगत देश. जिथल्या गरिबांकडे मोटारी असतात, तो नाही!' हे कोलंबियाच्या राजधानीच्या – बोगोटाच्या महापौरांचं विधान आणि त्यांचे शहररचनेतले प्रयोगही असेच प्रसिद्ध आहेत. हे सगळे प्रयोग सरकारी कल्पकपणातून, सार्वजनिक वाहतुकीत केलेल्या गुंतवणुकीतून, जबाबदार नागरी सहभागातून केले गेले – यशस्वीही झाले. त्या प्रयोगांना 'फुकटेपणा' वा 'रेवड्यावाटप' अशी लेबलं लावली गेली नाहीत. त्याचा फायदा त्या शहरांच्या नागरिकांना झाला. वेगासाठी त्यांनी धुराची-धुळीची किंमत मोजली नाही, रोजच्या प्रवासासाठी प्राणांची बाजी लावली नाही, वा स्वतःच्या खिशातून भरमसाठ पैसाही मोजला नाही. आपण या प्रयोगांतून प्रेरणा कधी घेणार आहोत? की आपल्याला मोठाल्या, सुळसुळीत, वेगवान, महागड्या, नि खाजगी गाड्यांचं वेड - आणि पर्यायानं त्यातून येणारे ट्रॅफिकचे, प्रदूषणाचे, गर्दीचे प्रश्न आवडायला लागले आहेत?

## गुरु वचन

### आध्यात्मिक आणि भौतिक धन एकत्र मिळत नाही

संसारात दोन प्रकारचे धन असते. भौतिक धन आणि दुसरे आध्यात्मिक धन. मनुष्याचा स्वभाव आहे की, तो जास्तीत जास्त धन कमवू इच्छितो. एखादी व्यक्ती सोने, चांदी, रूपयांचा ढिग लावल्याने धनवान म्हटला जातो. तर कोणी उपाशी, तहानलेला राहूनही धनवान म्हटला जातो. वास्तवात धनवान दोघेही आहेत. एक भौतिक धनाचा धनी आहे तर दुसरा अध्यात्मिक धनाचा धनी आहे. शास्त्र आणि पुराण सांगातात की, दोन्ही धनात अध्यात्म रूपी धन जास्त श्रेष्ठ आहे. कारण हे धन कोणी चोरून घेऊ शकत नाही. ज्याच्याकडे अध्यात्म रूपी धन असते तो निश्चिंत असतो. त्याला कोणत्याही प्रकारची चिंता आणि भीती नसते. संसारात कोणतीही व्यक्ती अशी नाही जी एकत्र या दोन्ही संपत्तीचे सुख प्राप्त करू शकेल. अध्यात्म आणि भौतिक धन दोन्ही दोन नावासमान आहेत. दोन्ही नावांतून एकाचवेळी प्रवास करता येत नाही, हे आपल्याला चांगल्याप्रकारे ठाऊक आहे. असे करण्याचा प्रयत्न केला तर बुडणे निश्चित असते. आपल्याला अध्याात्मिक धन अर्जित करून ईश्वराचे ऋण फेडायचे आणि जीवन–मरणाच्या चक्रातून मुक्ती मिळावायची की भौतिक धन अर्जित करून सांसारिक सुखाचा आनंद घ्यायचा आणि वारंवार जीवन–मरणाच्या चक्रात अडकून पापफळ प्राप्त करायचे, हे आपल्या हाती आहे.

भागवत् म्हणते ईश्वर ज्याच्यावर प्रेम करतो त्याचे सर्वकाही हिरावून घेतो. सर्वकाही हिरावून घेण्याचा अर्थ आहे सांसारिक सुख हिरावून घेणे. कबीर दास, तुलसीदास, रहीम, मीराबाई, सूरदास, करमैतीबाई याची उदाहरणे आहेत. येशू ख्रिस्तानेही म्हटले की, एकवेळ सूईच्या छिद्रातून ऊंट जाईल. मात्र श्रीमंत माणूस स्वर्ग प्राप्त करू शकत नाही. स्वर्ग न मिळण्याचा अर्थ आहे, ईश्वराची कृपा प्राप्त नसणे.

त्याचे कारण जेव्हा खूप धन येते व्यक्ती धन सांभाळणे आणि त्याच्या सुरक्षेबाबत सदैव चिंतित असतो. ईश्वरासाठी त्याच्याकडे वेळ नसतो. आणि भक्ती भावनाही नसते. धनाच्या अहंकारात व्यक्ती ईश्वरीय सत्तेलाही आव्हान देऊ लागतो. तीर्थस्थळांस पर्यटन स्थळ मानून त्याचा अपमान करतो. त्यामुळे अध्याात्मिक धन आणि सांसारिक धन एकत्र मिळू शकत नाही, असे म्हटले जाते.

## दै. 'संध्या' धमाल सूडोकु क्र. १४७

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 7 | | | | | 4 | | |
| | | | | | 5 | | 6 | 1 |
| 5 | 4 | | 3 | | | | | 9 |
| 8 | | 1 | | 6 | 7 | 5 | 4 | |
| 7 | | | 5 | 3 | 9 | | | 2 |
| | 5 | 2 | 8 | 4 | | 6 | | 7 |
| 2 | | | | | 4 | | 7 | 5 |
| 4 | 8 | | 1 | | | | | |
| | | 5 | | | | | 8 | |

**: सूडोकु :**


**खेळाचे नियम :** प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३–३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

– उत्तर उद्याच्या अंकात

**सूडोकु क्र. १४६ चे उत्तर**

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 3 | 9 | 1 | 6 | 4 | 5 | 8 | 2 | 7 |
| 7 | 8 | 5 | 3 | 1 | 2 | 6 | 4 | 9 |
| 6 | 2 | 4 | 7 | 9 | 8 | 1 | 3 | 5 |
| 2 | 6 | 9 | 5 | 7 | 3 | 4 | 8 | 1 |
| 1 | 5 | 7 | 8 | 2 | 4 | 9 | 6 | 3 |
| 8 | 4 | 3 | 1 | 6 | 9 | 7 | 5 | 2 |
| 9 | 7 | 2 | 4 | 3 | 6 | 5 | 1 | 8 |
| 5 | 1 | 6 | 2 | 8 | 7 | 3 | 9 | 4 |
| 4 | 3 | 8 | 9 | 5 | 1 | 2 | 7 | 6 |

## 'दै. संध्या' जम्बो शब्दकोडे क्र. १४७



**आडवे शब्द**

१. 'ऐक्यामध्ये शक्ती असते' या अर्थाची म्हण
६. सोने
१०. सोललेल्या उसाचे आडवे तुकडे
११. चंद्र न उगवण्याची तिथी
१२. संत ज्ञानेश्वरांनी लिहिलेली प्रार्थना
१४. सत्ता
१५. दफनभूमी
१६. भला, चांगला
१७. शिकारीसाठी हेरलेला प्राणी
१८. नम्रतेने वागणारा
२१. स्तुतीची गाणी
२३. गोदाम, माल साठविण्याची जागा
२५. कसोटी
२७. वर्ष, साल
२८. वालुकामय प्रदेश
२९. राजसभा
३०. बारीकसारीक
३२. थडगे
३३. तृष्णा
३५. लीनता
३७. जाड कापडाची बैठक
३९. जैन साधु
४१. चंदन उगाळण्याचा दगड
४२. कवी
४४. मदन
४७. फसविले जाणे
४९. परमेश्वर
५०. शिकार
५२. सभेपुढे न घाबरता बोलणारा
५३. बूड
५५. रत्न
५७. निपचित, निमूट
५९. मडके
६१. रावणाच्या तोंडाची संख्या
६३. पायंडा, पद्धत
६६. शिव्याशाप
६७. दिवस उजाडायच्या आत
६९. पाठविलेला, मार्गस्थ
७२. दरोडा
७३. दु:ख
७४. अनेकांना पैसे देणे असलेला
७५. प्रजा

**उभे शब्द**

१. अर्जुनाचा प्रतिस्पर्धी, द्रोणाचार्यांनी नाकारलेला शिष्य
२. डुक्कर
३. मत्सर
४. अव्यवस्था, गोंधळाचे राज्य
५. सारखा
६. हसू येण्याजोगा
७. मग आल्यामुळे या जोडीची फारकत झाली!
८. अदृश्य, नजरेसमोरून नाहीसे होणे
९. चणचण, न्यूनता
११. अव्यवस्थित, नेटकेपणाने न ठेवलेले
१३. उंबरठा
१५. मिठी
१८. उग्र वासाचे आंबडगोड चवीचे फळ
१९. शक्तीमान
२०. आकाश, नभ
२२. कापड, वस्त्र
२३. पराकाष्ठेचा लाभ
२४. शुष्कता
२५. पुन्हा
२६. धुणे (पाप इ.)
२९. स्मशान
३१. जयपराजय
३४. अक्षरओळख असलेला
३६. चंद्र, शंकर
३७. उत्सवाचे दिवस
३८. रंगविलेले
४०. भांडणाची कळ
४१. वर्ष, साल
४३. व्यवस्था, काम पाहणे
४५. नवी (हिंदी)
४६. शहाणा, हुशार
४७. स्पष्टवक्ता
४८. वाईट, अनिष्ट
५१. आच, उष्णता
५२. नातेवाईक
५४. अंगरखा
५६. वाकलेला, नम्र
५८. सोंगट्यांचे वस्त्र
६०. रात्रभर
६२. घण
६४. हिंदुस्तान
६५. पोळ्या भाजण्याचे साधन
६६. सिद्धता
६८. पौर्णिमा
७०. श्वसनेंद्रिय
७१. वडिलांचे मराठी संबोधन

**जम्बो शब्दकोडे क्र. १४६ चे उत्तर**

आडवे उत्तर १.चलन वलन ४.जिवावर उदार होणे १०.कव ११.नवरंग १२.तळ १३.हिमालय १५.लवा १६.हजर १८.नवा १९.अगरबत्ती २१.समरस २४.तम २६.आम २७.नारद २८.सकाळ दुपार संध्याकाळ ३१.शीतकर ३३.कुल ३४.तन ३५.पात ३६.लत ३७.तलमसुती ३८.विनंती ३९.वाईट ४१.बाप ४२.चाकर ४४.लडिवाळ ४६.कर्जबाजारी ४८.चरस ४९.भला ५०.दादर ५२.गो ५३.सणवार ५५.शरम ५६.धनुष्यबाण ५७.डीन ५८.दारू ६१.कच ६३.वेताळसेना ६६.टीका ६७.मरगळणे ७१.रजत ७२.मनमुराद ७३.नीरस

उभे उत्तर : १.चकचकीत २.लव ३.वर्तमानकाळ भूतकाळ भविष्यकाळ ४.जिवलग ५.वारंवार ६.वग ७.उमज ८.रत ९.होळकर १४.लवा १६.हत्ती १७.रसरशीत १९.अमर २०.बरका २२.मदत २३.समोर २५.मसलत २६.आपादमस्तक २९.संतती ३०.ध्यान ३२.कसाई ३३.कुलशील ३५.पातीचा चहा ३८.विपरीत ३९.वारसदार ४०.टणत्कार ४१.बाजा ४३.कर ४५.डिब्बा ४७.बालवाडी ५१.दमदाटी ५३.सणक ५४.रनवे ५४अ.टवाळ ५५.शबाना ५९.रुकावट ६०.समर ६२.चलन ६४.ताकद ६५.सेनानी ६८.रज ६९.गत ७०.कोस

## इतिहासात आजचा दिवस

जगातील सर्वात हलके लढाऊ विमान म्हणून 'तेजस'ला ओळखल्या जाते.

### आंतरराष्ट्रीय

- १८८० – न्यू जर्सी येथील मेनलो पार्कमध्ये थॉमस इडीसन यांनी आपल्या इलेक्ट्रीक रेल्वेची पहिली चाचणी घेतली.
- १९९५ – ब्रिटीश महिला ऍलिसन हारग्रेव्स एव्हरेस्ट सर करणारी पहिली महिला झाली.
- १९९६ – बांगलादेशात वादळात ६०० जण ठार झाले.
- २००८ – बांगलादेशात गोरौतुरा नदीत १५० प्रवाशी घेऊन जाणारी एक नौका बुडाल्याने ४० जण ठार झाले.

### राष्ट्रीय

- १९५२ – राज्यसभेत पहिली बैठक झाली.
- १९६७ – डॉ. झाकीर हुसैन हे भारताचे तिसरे राष्ट्रपती बनले. झाकीर हुसैन हे पहिले मुस्लिम राष्ट्रपती ठरले.
- २००६ – द्रमुक अध्यक्ष डॉ. एम. करुणानिधींनी पाचव्यांदा तामिळनाडूच्या मुख्यमंत्री पदाची शपथ घेतली.
- २००६ – बंगळूर येथे देशी बनावटीचे हलके लढाऊ विमान 'तेजस–पी व्ही २'ची सुपरसोनिक गतीवर आणि शस्त्रांसह यशस्वी चाचणी करण्यात आली.

### जन्म

- १९०५ – भारताचे पाचवे राष्ट्रपती फक्रुद्दीन अली अहमद यांचा जन्म.
- १९१८ – टी. बालासरस्वती, भारतनाट्यम डान्सर.

### निधन

- १९३० – फ्रीडजोफ ननसेन, नोबेल शांती पुरस्कार विजेता.
- १९९२ – भाऊराव ऊर्फ मुरलीधर दत्तात्रेय देवरस, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे ज्येष्ठ नेते.

## उपदेशकथा



### उज्ज्वल भवितव्यासाठी

एका उद्योगपतीने आपल्या कारखान्यात उच्च तंत्रज्ञान घेऊन आलेल्या एका इंजिनीयरची नेमणूक केली. त्याने आल्यावर महिन्याभरातच साऱ्या मशिन्स ठाकठीक केल्या. मशिन्सची काळजी कशी घ्यायची याचेही प्रशिक्षण त्याने कामगारांना दिले. दोन – तीन महिने झाले. त्याला काही कामच नव्हते. तो मालकाला भेटला. म्हणाला, सर ! मला तुम्ही मला फुकट पगार का देता ? सर्व मशिन्स व्यवस्थित सुरु आहेत. आता मी नसलो, तरी कारखाना ठिक चालेल. मालक म्हणाले, ते सर्व ठिक आहे. आज कारखान्यातली यंत्रं व्यवस्थित आहेत पण उद्या यातले एखादे जरी मशिन बिघडले, तरी माझे लाखो रुपयांचं नुकसान होईल. त्यावेळी मी तुला कुठे शोधू ? म्हणूनच उद्या बिघडणाऱ्या मशिन्सच्या दुरुस्तीसाठी मी तुझी आजच व्यवस्था करुन ठेवली आहे. मी काय मूर्ख आहे, तुला पैसा फुकट द्यायला !

## : SMS :

Ek shrabi sadhu se takra gaya.
Sadhu: Oh Murkh! mein tuje shrap deta hoon...
Sharabi: Ruko! main glass leke ata hoon.

## हवामानाचा अंदाज

| | | |
|---|---|---|
| औरंगाबाद | ३९.१ | २९.३ |
| अहमदनगर | ३८.९ | २७.८ |
| अकोला | ४३.३ | २९.६ |
| अमरावती | ४२.९ | २९.४ |
| बीड | ४५.६ | ३०.७ |
| भंडारा | ४५.१ | २८ |
| बुलढाणा | ३७.६ | २७ |
| चंद्रपूर | ४५.२ | ३१.३ |
| चेन्नई | ४०.४ | २९.९ |
| नवी दिल्ली | ३८.२ | ३० |
| धुळे | ४२.४ | २९.२ |
| गोंदिया | ४२.४ | २७.५ |
| जळगाव | ४३.५ | २९.४ |
| कोल्हापूर | ४१.१ | २३.२ |
| लातूर | ३९.५ | २८.७ |
| मुंबई | ४१.२ | ३४.२ |
| नागपूर | ४३.६ | २८.५ |
| नांदेड | ४३.२ | २९ |
| नंदूरबार | ४०.९ | २९.५ |
| नाशिक | ३९.६ | २६.६ |
| पुणे | ३७.४ | २५.४ |
| पंढरपूर | ४१ | २८.९ |
| सातारा | ३९.९ | २२.४ |
| सांगली | ४०.७ | २४.३ |
| सोलापूर | ४२.२ | ३०.६ |
| वर्धा | ४४.५ | २९.६ |

## पंचांग

१३ मे २०२६
बुधवार
विक्रम संवत्– २०८२
वैशाख शके
संवत्– १९४८
संवत्सर –पराभवनाम
अयन– उत्तरायणारंभ
मास– वैशाख
ऋतु– सौर ग्रीष्म
कृष्ण पक्ष
तिथि:एकादशी
१३:३०:०८
नक्षत्र:उत्तराभाद्रपद
२४:१७:१५+

योग:विष्कुम्भ २०:५४:१७
करण:बालव १३:३०:०८
करण:कौलव
२४:३०:५७+
सूर्य:मेष
चन्द्र:मीन
हिजरी सन् – १४४६
मुस्लिम मास – जिल्काद
तारीख – २६
विशेष
अपरा एकादशइ
पारनेकर महाराज
वार्षिकोत्सव – पारनेर
(अहिल्यानगर)

## आजचे राशिभविष्य

**मेष :** शुभ रंग – हिरवा, शुभ दिशा – उत्तर
सामाजिक कार्यात मग्न रहाल. वाहन सुख मिळेल.

**तूळ :** शुभ रंग–निळा, शुभ दिशा–पूर्व
दुसऱ्या विश्वासावर स्वत:चा काम करावे लागेल.

**वृषभ :** शुभ रंग– हिरवा, शुभ दिशा–पूर्व
मनोबल वाढेल. धंद्यात वाढ व सुख–समृद्धी मिळेल. परिवारात केलेल्या कामावर चर्चा होईल.

**वृश्चिक :** शुभ रंग–गुलाबी, शुभ दिशा–पश्चिम
आर्थिक लाभ होईल. आपल्या कार्यक्षेत्राचा विस्तार होईल. आरोग्याची काळजी घ्या.

**मिथून :** शुभ रंग– हिरवा, शुभ दिशा–पूर्व
मित्रांच्या सहकार्यामुळे मनोधेर्य वाढेल. प्रसन्नता वाटेल, आर्थिक लाभाची शक्यता महत्वाच्या कामांसाठी खर्च होईल.

**धनू :** शुभ रंग – काळा, शुभ दिशा – पूर्व
व्यक्तिगत जीवनातील चिंता दूर होतील. व्यवसायात वाढ होवून आनंद मिळेल. वाहन हळू चालवा.

**कर्क :** शुभ रंग– पिवळा, शुभ दिशा–उत्तर
पूर्वी केलेल्या कामाचे फळ मिळेल. लाभ, मान–सन्माना मध्ये वाढ होईल. मनोरंजनाची वेळ येईल. धंद्यात वाढ होईल.

**मकर :** शुभ रंग – पिवळा, शुभ दिशा – पूर्व
आर्थिक परिस्थिती चांगली राहील. सामाजिक कार्यात व्यापून जाल, धंद्यात नवीन योजना हाती घ्याल.

**सिंह :** शुभ रंग – पांढरा, शुभ दिशा – पश्चिम
नवीन कार्य हाती घ्याल, बिघडलेले संबंध चांगले होवून प्रसन्नता वाटेल.

**कुंभ :** शुभ रंग – लाल, शुभ दिशा – उत्तर
आज आपल्या मनातील इच्छेनुसार कामे पूर्ण होतील. आपले विरोधक ही आपल्या कामाची प्रशंसा करतील.

**कन्या :** शुभ रंग– काळा, शुभ दिशा–पूर्व
धंद्यात वाद–विवाद होवू शकतात. कामकाजात व्यत्यय येईल. कौटुंबिक परिवारातील सदस्यांची चिंता वाटेल.

**मीन :** शुभ रंग: हिरवा, शुभ दिशा : उत्तर
मन लावून काम केल्यास धंद्यात वाढ होईल. घाईगडबडीने कामे करू नका. परिवाराच्या सहकार्याने समाधान मिळेल.

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे–४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे – ४११००२ येथे प्रसिद्ध केले.
संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०–२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### उन्हाळी सुट्ट्यांमध्ये मुलांसाठी अध्यात्मिक शैक्षणिक आणि मनोरंजन शिबिर संपन्न

पुणे (दैनिक संध्या) : पवित्र नाम देवालय गुरवार पेठ पुणे येथील चर्चच्या वतीने मुलांच्या सुट्ट्यांचा सदुपयोग करण्यासाठी आयोजित करण्यात आलेले विशेष व्हॅकेशन बायबल स्कूल (VBS) शिबिर अत्यंत उत्साहात पार पडले. या सात दिवसीय शिबिरामध्ये परिसरातील सुमारे ८० हून अधिक मुला-मुलींनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला होता. या शिबिरादरम्यान मुलांसाठी विविध प्रकारच्या आध्यात्मिक, शैक्षणिक आणि मनोरंजक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये बायबलमधील कथा, सुमधुर गाणी, कृतीगीते, आणि विविध प्रकारच्या कलाकुसरीच्या वस्तू (क्राफ्ट्स) बनवण्याचे प्रशिक्षण मुलांना देण्यात आले. मुलांमधील सुप्त गुणांना वाव देणे आणि त्यांच्यावर सुसंस्कार करणे हा या शिबिराचा मुख्य उद्देश होता. शिबिराच्या सांगता समारंभाला पालकांची मोठी उपस्थिती लाभली होती. यावेळी मुलांनी शिबिरात शिकलेली गाणी, नृत्य आणि छोटे नाट्य प्रयोग सादर करून उपस्थितांची मने जिंकली. चर्चच्या मुख्य पाळक रेव्ह कॅरप, रेव्ह गायकवाड , रेव्ह आढाव व प्रमुख पाहुणे सौ. बबिता कवाडे ह्यांनी शिबिरात सहभागी झालेल्या सर्व ८० मुलांना आणि त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांना प्रोत्साहित केले. शिबिराच्या शेवटी सर्व सहभागी मुलांना प्रमाणपत्रे आणि आकर्षक बक्षिसे देऊन गौरविण्यात आले. या उपक्रमाबद्दल सर्व पालकांनी चर्च प्रशासनाचे मनापासून आभार मानले आहेत, शिबिराचे आयोजन रेव्ह कॅरप, रेव्ह गायकवाड, रेव्ह आढाव ,श्री. मनोज येवलेकर , प्राजक्ता पारोळ , विकास उमापती, विजया इंदुरकर, रोजमेरी साठे, निखिल टाकळकर , मालती नॉर्टन, जयमाला सूर्यवंशी, नूतन डनिएल, उर्मिला डिसोझा , रीना हर्जी,कविता उमापती, अनिता खामकर उज्वला साळवी, अरुणा जाधव, सार्थक राठोड, अनिकेत ताकवले, अलेक्स ताकवले, नोहा भोंगे, योना भोंगे, हर्षल आव्हाड, उदय राठोड, ऑस्टिन नवगिरे, मीनल सूर्यवंशी, कॅथेरिन गायकवाड, अण्णा उमापती, सियोन दुपटे, लावीन अमोलिक , अलिशा सूर्यवंशी, अंजल मिरपगार, सुमित वाकोडे, सचिन वाकोडे, पावन भोंगे , राजेंद्र पवार , संदीप गायकवाड , विल्सोन चक्रे. यांनी केले.

### पेशवेकालीन श्री उमामहेश्वर मंदिरात मोगरा महोत्सव



■ वासंतिक चंदन उटी सोहळा ; भजन, कीर्तन आणि भक्तीगीतांचे कार्यक्रम

पुणे (दैनिक संध्या) : शुक्रवार पेठ येथील राजा दिनकर केळकर संग्रहालयासमोरील पेशवेकालीन श्री उमामहेश्वर मंदिरात 'श्रीं' चा वासंतिक चंदन उटी सोहळा आणि मोगरा महोत्सव भक्तिमय वातावरणात साजरा झाला झाला. भगवान शंकरांच्या पिंडीवर मुखवटा व चंदन लेपन करण्यात आले होते. आदिमाया प्रतिष्ठान पुणे तसेच नादब्रह्म ढोल ताशा ध्वज पथक ट्रस्ट पुणे यांच्या वतीने या सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. मंदिर परिसर आकर्षक विविधरंगी फुलांची सजावट, मोगऱ्याचा दरवळ आणि पारंपरिक रोषणाईने उजळून निघाला होता. यावेळी भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून दर्शनाचा व धार्मिक कार्यक्रमांचा लाभ घेतला. सोहळ्यास नगरसेवक राघवेंद्र उर्फ बाप्पू मानकर, कुणाल टिळक, स्वरदा बापट, स्वप्नाली पंडित, देवेंद्र वडके यांसह श्री उमा महेश्वर मंदिर सर्व विश्वस्त मंडळ उपस्थित होते. कमलेश कामठे, स्वामी भक्त परिवार यांनी कार्यक्रमाचे आयोजन केले. विविध भजनी सेवा मंडळांनी भजन, कीर्तन आणि भक्तीगीतांच्या माध्यमातून वातावरण भक्तिमय केले. श्री भागीरथी सेवा भजनी मंडळ, श्री स्वामी शंकर भजनी सेवा मंडळ, श्री गुरु माऊली भजनी सेवा मंडळ, श्री वटवृक्ष भजनी सेवा मंडळ, श्री स्वामी समर्थ भजनी मंडळ मंडई मठ पुणे तसेच श्री स्वामी ॐ मल्हारी भजनी सेवा मंडळ यांनी सहभाग घेतला.

### एआयमुळे 'पोर्टफोलिओ करिअर'चा ट्रेंड वाढला; 'फाउंडर' प्रोफाइलमध्ये उसळी

पुणे (दैनिक संध्या) : कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) आणि डिजिटल टूल्सच्या वाढत्या वापरामुळे भारतातील उद्योजकतेचे चित्र झपाट्याने बदलत आहे. व्यावसायिक नेटवर्किंग प्लॅटफॉर्म LinkedIn च्या नव्या आकडेवारीनुसार, भारतात आपल्या प्रोफाइलमध्ये 'Founder' (संस्थापक) हा शब्द जोडणाऱ्या सदस्यांच्या संख्येत गेल्या वर्षभरात तब्बल १०४ टक्क्यांनी वाढ झाली आहे. ही वाढ जागतिक स्तरावर सर्वाधिक मानली जात आहे. एआयमुळे व्यवसाय सुरू करण्यासाठी लागणारे पारंपरिक अडथळे कमी होत असल्याने तरुणांमध्ये उद्योजकतेकडे मोठा कल वाढताना दिसत आहे. विशेषतः जनरेशन झेड आता पारंपरिक नोकरीच्या चौकटीबाहेर जाऊन 'पोर्टफोलिओ करिअर'चा मार्ग स्वीकारत आहे. या पद्धतीत एकाच वेळी उत्पन्नाचे अनेक स्रोत तयार करण्यावर भर दिला जातो. लिंक्डइनच्या सर्वेक्षणानुसार, भारतातील ७५ टक्के जनरेशन झेड उद्योजकांकडे उत्पन्नाचे एकापेक्षा अधिक स्रोत आहेत. तुलनेत जनरेशन एक्समध्ये हे प्रमाण ६२ टक्के आहे. त्यामुळे कामातील स्थिरता, आर्थिक स्वातंत्र्य आणि स्वतःच्या वेळेवर नियंत्रण मिळवण्याची मानसिकता अधिक बळकट होत असल्याचे दिसून येते. भारतातील पाचपैकी चार म्हणजेच ८० टक्के संस्थापकांच्या मते, एआय आणि डिजिटल साधनांमुळे उद्योजकता आता सर्वांसाठी अधिक सुलभ झाली आहे. तर ८१ टक्के उद्योजकांनी आज व्यवसाय सुरू करणे पूर्वीपेक्षा अधिक सोपे झाल्याचे मान्य केले.

### मॅरिएट इंटरनॅशनल लक्झरी डायनिंग सीरिजचे तिसरे सत्र

पुणे (दैनिक संध्या) : मॅरिएट इंटरनॅशनल लक्झरी डायनिंग सीरिजचे तिसऱ्या सत्राची घोषणा करण्यात आली अक्रॉस द टेबल ही संकल्पना आहे.2026 सीरिजच्या ठिकाणांमध्ये जे.डब्ल्यू मॅरिएट फू क्योंक एमरॉल्ड बे रिसॉर्ट अॅन्ड स्पा,द नाका आयलँड,लक्झरी कलेक्शन रिसॉर्ट अॅन्ड स्पा फुकेत, सेंट रेजीस मालदीव्ज वॉमुली रिसॉर्ट मंडापा, रिटझ् कार्लटन क्योटो, रिटझ् कार्लटन यॉट यांचा समावेश आहे.

### हॉटेलमध्ये झालेल्या किरकोळ बाचाबाचीवरुन युवकाचा खुन

पुणे (दैनिक संध्या) : सहजपुर (ता. दौंड) येथे एका हॉटेलमध्ये झालेल्या किरकोळ बाचाबाचीवरून एका युवकाचा खुन झाला. सदर घटना ११ मे रोजी सायंकाळी ५.३० वाजता सहजपुर फाटा येथील ओएसिस हॉटेलमध्ये घडली. या हॉटेलमध्ये फिर्यादी दयानंद विश्वनाथआप्पा भुरके, मित्र अक्षय निगडे तसेच त्यांचा मयत पुतण्या धनराज शिवाजी भुरके (वय-३९ वर्षे) (तिघेही राहणार, अंबुलगा मेन, ता. निलंगा, जि. लातुर) हे जेवण करताना परमीट रूममध्ये दारू पित होते. यावेळी मयत धनराज भुरके हे बाथरूमला जात असताना समोरच्या टेबलावर बसलेल्या आरोपींना धक्का लागला.

# उपाययोजनांबाबत मार्गदर्शक सूचना निर्गमित : जिल्हाधिकारी

पुणे (दै. संध्या)



राज्य शासनाकडून प्राप्त सूचनेनुसार भारतीय हवामान विभागाने जारी केलेल्या हंगामी उष्णतेच्या इशाऱ्यानुसार पुढील काही महिन्यांत सामान्यापेक्षा अधिक तापमान राहणार असल्याचे अवगत केले आहे, अशा अत्यंत तीव्र उष्णतेच्या लाटेच्या परिस्थितीत सर्वाधिक कामगार आणि मजूरांना त्रास होतो , उष्णतेच्या लाटेच्या प्रतिकूल परिणामांपासून त्यांच्या संरक्षणाच्यादृष्टीने बहु-क्षेत्रीय उपाययोजना मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात येत आहेत, अशी माहिती जिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे अध्यक्ष जितेंद्र डुडी यांनी दिली आहे.

कामगारांचे कामाचे तास पुन्हा नियोजित करणे. विशेषतः दुपारच्या उष्णतेत काम टाळणे. आवश्यकतेनुसार कामाचा वेग कमी करण्याची परवानगी देणे, पुरेसे पिण्याचे पाणी, विश्रांती क्षेत्रे व थंडावा मिळेल अशी व्यवस्था करणे. आपत्कालीन बर्फ,पंखा व उष्णता प्रतिबंधक साहित्य उपलब्ध करुन देणे. आरोग्य विभागाशी समन्वय साधून कामगारांची नियमित आरोग्य तपासणी करणे.

कारखाने व खाणी व्यवस्थापनासाठी : कामगारांना सर्वाधिक उष्णतेच्या वेळेत विश्रांती देणे. दोन व्यक्तीच्या गटाने काम करण्याची व्यवस्था करणे. इलेक्ट्रोलाइट पूरक पेय उपलब्ध करुन देणे. कामगारांना उष्णतेचा धोका व उपाययोनांबाबत जागरुक करणे.

विशेष लक्ष देण्याचे गट : बांधकाम कामगार, वीटभट्टी कामगार, रोजंदारी मजूर व असंघटीत क्षेत्रातील कामगाराच्या जनजागृतीसाठी पोस्टर, बॅनर व श्रमिक चौकांवर मोहिमा आयोजित करणे.

ग्रामसभा व सार्वजनिक कार्यक्रमांसाठी : उन्हाळ्यात सुरू असलेल्या ग्रामसभा व धार्मिक,सांस्कृतिक मिरवणुका यामध्ये आरोग्य कर्मचाऱ्यांची नियुक्त करुन आवश्यक उपचार साहित्य व उपाययोजना उपलब्ध कराव्यात. प्रक्रिया व कार्यक्रमांचे वेळापत्रक उष्णतेच्या उच्चांक काळात बदलण्याची शक्यता तपासावी. प्रत्येक ठराविक लोकसंख्येच्या गटासाठी थंडावा मिळेल अशी विश्रांती क्षेत्रे अनिवार्यपणे उभारावीत. यात्रांमध्ये पुरेसे पिण्याचे पाणी व इलेक्ट्रोलाइट पेय उपलब्ध करुन घ्यावे. जनजागृतीमध्ये स्थानिक पातळीवर पत्रके व माहिती फलकांचा आणि प्रसारमाध्यमांचा वापर करावा.

प्रशासनाच्यावतीने देण्यात आलेल्या नागरिकांनी पालन करुन सहकार्य करावे, असे आवाहन श्री.डुडी यांनी केले आहे.

## भारत–आफ्रिका भागीदारी नव्या रणनीतिक टप्प्यात

पुणे (दै. संध्या)



जागतिक भू-राजकीय बदलांमुळे आंतरराष्ट्रीय संबंधांची समीकरणे वेगाने बदलत असताना भारत आणि आफ्रिका यांच्यातील भागीदारी एका परिवर्तनशील टप्प्यात प्रवेश करत आहे. सामायिक विकास उद्दिष्टे, दक्षिण-दक्षिण सहकार्याची भावना आणि आत्मनिर्भरतेच्या समान ध्येयामुळे ही भागीदारी पारंपरिक राजनयिक संबंधांच्या पलीकडे जाऊन तंत्रज्ञान, व्यापार, आरोग्य सहकार्य आणि क्षमता विकासापर्यंत विस्तारली आहे. आज आफ्रिकेसोबत भारताचे संबंध समानता, परस्पर सन्मान आणि सामूहिक समृद्धी या मूल्यांवर आधारित व्यापक भागीदारीचे दर्शन घडवतात. आगामी चौथ्या भारत–आफ्रिका फोरम शिखर परिषदेसाठी तयारी वेग घेत असताना, दोन्ही बाजू दीर्घकालीन सद्भावनेचे ठोस आणि लोकाभिमुख परिणामांमध्ये रूपांतर करण्यावर भर देत आहेत.

## एमआयटी एडीटी विद्यापीठाचा तेजस पाटील भारतीय फेन्सिंग संघात!

### चीनमधील शांघायात होणाऱ्या प्रतिष्ठित 'फॉइल ग्रँड प्रिक्स' स्पर्धेत करणार देशाचे प्रतिनिधित्व

पुणे (दै. संध्या)



पुणे येथील एमआयटी आर्ट, डिझाईन आणि तंत्रज्ञान विद्यापीठ (एडीटी), लोणी-काळभोर, पुणे येथील स्कूल ऑफ कॉम्प्युटिंगचा (एसओसी) विद्यार्थी तेजस मनोज पाटील याची चीनमधील शांघाय येथे १५ ते १७ मे २०२६ दरम्यान होणाऱ्या प्रतिष्ठित 'फॉइल ग्रँड प्रिक्स' फेन्सिंग (तलवारबाजी) स्पर्धेसाठी भारतीय संघात निवड झाली आहे.

ही निवड भारतीय तलवारबाजी संघटनेतर्फे अधिकृतपणे जाहीर करण्यात आली असून, या आंतरराष्ट्रीय स्पर्धेत जगभरातील अव्वल फेन्सर्स सहभागी होणार आहेत. फेन्सिंग असोसिएशन ऑफ इंडियाने प्रसिद्ध केलेल्या अधिकृत निवड अधिसूचनेनुसार, तेजस मनोज पाटील याची भारतीय पुरुष 'फॉइल' संघात निवड करण्यात आली आहे.

तेजस पाटीलने आपल्या सातत्यपूर्ण कामगिरी, मेहनत आणि खेळातील उत्कृष्ट कौशल्याच्या जोरावर भारतीय संघात स्थान मिळवले आहे. त्याच्या या यशामुळे एमआयटी-एडीटी विद्यापीठाच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला असून, विद्यापीठाच्या क्रीडा क्षेत्रातील वाढत्या यशाची नोंद पुन्हा अधोरेखित झाली आहे.

या कामगिरीनंतर एमआयटी एडीटी विद्यापीठाचे संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ. विश्वनाथ दा. कराड, कार्याध्यक्ष तथा प्र-कुलपती प्रा. डॉ. मंगेश कराड, कार्यकारी संचालक डॉ.सुनिता कराड, कुलगुरू डॉ. राजेश एस., प्रोवोस्ट डॉ.सायली गणकर, प्र.कुलपती डॉ.रामचंद्र पुजेरी, डॉ.मोहित दुबे, डॉ.नचिकेत ठाकूर, कुलसचिव डॉ. महेश चोपडे, छत्रपती शिवाजी पुरस्कारप्राप्त क्रीडा विभाग संचालक प्रा. पद्माकर फड यांनी तेजसचे अभिनंदन करत शांघाय येथे होणाऱ्या स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या आहेत. त्याच्या कामगिरीमुळे विद्यापीठातील तसेच राज्यातील युवा खेळाडूंना निश्चितच प्रेरणा मिळेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे.

## पुण्यात ५३ वी वर्ल्ड ऑर्गनायझेशन फॉर जेस्टोसिस परिषदेचे आयोजन

पुणे (दै. संध्या)



मातृ आरोग्यासाठी जागतिक तज्ज्ञ एकत्र येणार

गर्भावस्थेशी संबंधित उच्च रक्तदाब आणि जेस्टोसिससारख्या गंभीर आजारांवर केंद्रित ५३ व्या वर्ल्ड ऑर्गनायझेशन फॉर जेस्टोसिस (WOG) आंतरराष्ट्रीय परिषदेचे पुण्यात आयोजन करण्यात आले आहे. गेस्टोसिस इंडिया असोसिएशन (GIA) यांच्या वतीने आयोजित या परिषदेला पुणे प्रसूती व स्त्रीरोग संघटना (POGS), ISOPARB पुणे चॅप्टर तसेच भारती विद्यापीठाच्या IRSHA संस्थेचे सहकार्य लाभले आहे. मातृ आरोग्य, सुरक्षित प्रसूती आणि उच्च जोखीम गर्भावस्थेशी संबंधित जागतिक संशोधन, अनुभव आणि आधुनिक उपचार पद्धतींची देवाणघेवाण या परिषदेत होणार आहे.

परिषदेची सुरुवात गर्भावस्थेतील वाढत्या स्थूलतेवर आधारित विशेष कार्यशाळेने होणार असून, स्थूलता ही जेस्टोसिससह अनेक गुंतागुंतींचे प्रमुख कारण ठरत असल्याने या विषयावर राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय तज्ज्ञ मार्गदर्शन करणार आहेत.

या परिषदेत आई व गर्भातील गुंतागुंत, प्रसूतीदरम्यान उद्भवणारे धोके, अतिरक्तस्राव, क्रिटिकल केअर व्यवस्थापन तसेच प्रसूतीनंतर आई आणि बाळांच्या दीर्घकालीन आरोग्य परिणामांवर विशेष चर्चा होणार आहे. सुरक्षित मातृत्वासाठी वेळेवर निदान, प्रतिबंधात्मक उपाययोजना आणि गुणवत्तापूर्ण आरोग्यसेवेचे महत्त्व यावेळी अधोरेखित करण्यात येणार आहे.

उद्घाटन समारंभात वर्ल्ड ऑर्गनायझेशन फॉर जेस्टोसिसच्या अध्यक्षपदाचे जागतिक नेतृत्व हस्तांतरण होणार असून, प्रा. हेमा दिवाकर यांची २०२६ साठी WOG च्या अध्यक्षपदी नियुक्ती जाहीर करण्यात येणार आहे. या निवडीमुळे मातृ आरोग्य क्षेत्रातील भारताची जागतिक भूमिका अधिक मजबूत झाल्याचे मानले जात आहे. तसेच गेस्टोसिस इंडिया असोसिएशनच्या अध्यक्षपदाची धुरा डॉ. गिरीजा वाघ स्वीकारणार आहेत.

परिषदेत तरुण डॉक्टर, पदव्युत्तर विद्यार्थी आणि नवोदित संशोधकांना विशेष प्रोत्साहन देण्यात येणार आहे.

जेस्टोसिस, स्थूलता आणि मातृ आरोग्याशी संबंधित भारतीय संशोधन सादर करण्यासाठी स्वतंत्र व्यासपीठ उपलब्ध करून देण्यात आले आहे.

पॅनेल चर्चा, प्रत्यक्ष केस-आधारित सत्रे तसेच उच्च जोखीम गर्भावस्था आणि स्थूलता विषयातील राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय तज्ज्ञांचा सहभाग ही परिषदेची प्रमुख वैशिष्ट्ये ठरणार आहेत. महिलांचे दीर्घकालीन आरोग्य सुधारण्यासाठी आणि सुरक्षित मातृत्वाचा संदेश अधिक प्रभावीपणे पोहोचवण्यासाठी जागतिक स्तरावर सामूहिक प्रयत्नांची आवश्यकता या परिषदेत अधोरेखित करण्यात येणार आहे.

## आलं लसूण विकणारा सर्वसामान्य माणूस चित्रपटाचा निर्माता

पुणे (दै. संध्या)




आलं लसूण विकणाऱ्या नागपूरमधील एका सर्वसामान्य व्यक्तिमत्व असलेल्या रवी पंडित पवार यांनी आपलं आयुष्य एकदम साधं ठेवून मनोरंजन क्षेत्रात अभिनेत्रींचे स्वप्न पाहणाऱ्या आपल्या मुलींसाठी चक्क मराठी सिनेमा तयार केला आहे. "पिक्चर बॉईज" असे नाव असलेला हा चित्रपट येत्या १५ मे रोजी संपूर्ण महाराष्ट्रात प्रदर्शित होणार आहे. चित्रपटांच्या स्वप्नमयी जगात गावातल्या दोन तरुणांचा प्रवेश होतो आणि त्यांच्या आयुष्यात काय काय घडते अशा मनोरंजक कथासूत्रावर हा चित्रपट बेतला असून, चित्रपटाचा धमाल ट्रेलर लाँच करण्यात आला आहे. त्रिमूर्ती फिल्म्सनं 'पिक्चर बॉईज' या चित्रपटाची निर्मिती केली आहे. रवी पांडुरंग पंडितपवार, राजा पांडुरंग पंडितपवार हे या चित्रपटाचे निर्माते असून शिवाजी केशव पाटील हे सहनिर्माते आहेत. चित्रपटाची कथा, पटकथा, संवादलेखन आणि दिग्दर्शन निलेशसिंह राजपूत यांनी केलं आहे. मंदार चोळकर, सुनील दोडगे, संध्या-प्रनिकेत यांनी लिहिलेल्या गीतांना वरुण लिखाते आणि संध्या-प्रनिकेत यांनी संगीतबद्ध केले आहे. सुप्रसिद्ध गायक आनंद शिंदे, जसराज जोशी, स्वप्नील गोडबोले, वरुण लिखाते, एल. के. लक्ष्मीकांत यांनी चित्रपटातली गाणी गायली आहेत.

## 'पुणे ॲग्री हॅकॅथॉन-२०२६' पालकमंत्र्याच्या हस्ते शुक्रवारी उद्घाटन : जिल्हाधिकारी

पुणे (दै. संध्या)

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत स्पर्धेचा समारोप

कृषी महाविद्यालय येथे 15 ते 17 मे 2026 या कालावधीत आयोजित 'पुणे ॲग्री हॅकॅथॉन-2026' या स्पर्धेचे उद्घाटन राज्याच्या उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्या हस्ते 15 मे रोजी सकाळी 11.30 वाजता करण्यात येणार आहे तर स्पर्धेचा समारोप आणि बक्षीस वितरण राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या हस्ते 17 मे 2026 रोजी सकाळी 11.30 वाजता संपन्न होणार आहे, अशी माहिती जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी यांनी दिली आहे.

स्पर्धेसाठी उत्साहवर्धक प्रतिसाद लाभला असून यावर्षी एकूण 1 हजार 290 अर्ज पोर्टलवर पुढील प्रॉब्लेम स्टेटमेंटमधील थीमकरीता प्राप्त झाले आहेत. यामध्ये मृदा आरोग्य आणि व्यवस्थापन, स्मार्ट जल व्यवस्थापन आणि ऑटोमेशन, शेती यांत्रिकीकरण (एआय आणि रोबोटिक्स), कृषी प्रक्रिया आणि मूल्य साखळी, अक्षय ऊर्जा आणि कृषी-कचरा व्यवस्थापन, पीक संरक्षण आणि कीड व्यवस्थापन, हवामान-अनुकूल आणि डिजिटल शेती, प्रभावी कृषी प्रशासनासाठी एआय, तंत्रज्ञान आधारित हस्तक्षेप प्रभावी आपत्ती व्यवस्थापन, पीक नुकसानीचे मूल्यांकन आणि भाकितासाठी एआय, तंत्रज्ञान, साधने समावेश आहे.

राज्यनिहाय प्राप्त झालेल्या स्पर्धकांची संख्या पुणे प्रमाणे आहे; महाराष्ट्र 867, तामिळनाडू 231, तेलंगणा 28, कर्नाटक 23, उत्तर प्रदेश 22, राजस्थान व मध्य प्रदेश प्रत्येकी 18, गुजरात 17, पंजाब 16, दिल्ली 8, ओरिसा 7, अरुणाचल प्रदेश 6, केरळ 5, हरियाणा व आसाम प्रत्येकी 4, पश्चिम बंगाल, चंदीगड, बिहार व उत्तराखंड प्रत्येकी 2, गोवा, छत्तीसगड, जम्मू-काश्मीर, हिमाचल प्रदेश व लडाख प्रत्येकी 1 या प्रमाणे ऑनलाईन अर्ज प्राप्त झाले आहेत. या प्राप्त अर्जांची प्राथमिक छानणी ज्यूरी पॅनेलद्वारे करण्यात आली आहे. प्राथमिक छाननी मध्ये 120 नवकल्पना यांची निवड प्रत्यक्ष प्रदर्शनाकरिता करण्यात आली आहे. यामधून प्रत्येक प्रवर्गातून एक विजेता व उपविजेता यांची निवड ज्युरी पॅनेलमार्फत करण्यात येईल. विजेत्यास रुपये 25 लाख रुपये व उपविजेत्यास रुपये 15 लाख पारितोषिक देण्यात येणार आहे.

## हिंदुत्वाच्या स्पष्टतेतूनच राष्ट्रीय एकता निर्माण होईल

### सुनील आंबेकर अखिल भारतीय प्रचार प्रमुख राष्ट्रीय स्वयंसेवक संघ

पुणे (दै. संध्या)



"विश्वकल्याणाचा भाव असलेले हिंदुत्व हीच या राष्ट्राची खरी ओळख आहे.हिंदुत्वाच्या विचारात स्पष्टता आली,तरच खऱ्या अर्थाने राष्ट्रीय एकता निर्माण होईल आणि त्यातूनच राष्ट्राची पुढील दिशा स्पष्ट होईल," असे प्रतिपादन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे अखिल भारतीय प्रचार प्रमुख सुनील आंबेकर यांनी केले.

कर्वेनगर येथील कमिन्स अभियांत्रिकी महाविद्यालयातील के बी जोशी सभागृहामध्ये राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या छत्रपती संभाजी भागाच्या वतीने आयोजित 'संघ शताब्दी मंथन' कार्यक्रमात ते मुख्य वक्ते म्हणून बोलत होते. यावेळी व्यासपीठावर डेक्कन अभिमत विद्यापीठाचे कुलपती डॉ भूषण पटवर्धन,राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे अखिल भारतीय संपर्क विभागाचे कार्यालय प्रमुख प्रणव पवार आणि छत्रपती संभाजी भागाचे संघचालक अनिल व्यास यांची उपस्थिती होती.

समाजाचा पाठिंबा हाच संघकार्याचा आधार असल्याचे नमूद करून सुनील आंबेकर म्हणाले, "संघ स्वयंसेवकांची साधना ओळखून समाजाने विपरित परिस्थितीत संघाला साथ दिली.आता व्यक्ति निर्माणाचे कार्य प्रत्येक कुटुंबात पोहोचणे आवश्यक आहे.केवळ संघाच्या भरवशावर समाजपरिवर्तन शक्य नाही; त्यासाठी समाजाचा सक्रिय सहभाग अनिवार्य आहे. समाजाचे अवलंबित्व कमी करून स्वावलंबी व्यवस्था निर्माण करणे हेच संघाचे ध्येय आहे." मुस्लिम प्रश्न हा संघाच्या स्थापनेपूर्वीपासून असून,संघ तो सोडवण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील असल्याचेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले.

डॉ भूषण पटवर्धन यांनी शिक्षण पद्धतीवर भाष्य करताना भारतीय ज्ञानावर विश्वास निर्माण करण्याचे आवाहन केले. ते म्हणाले, "सध्या शिक्षणात पाश्चात्य 'मोनोकल्चर'चा प्रभाव वाढला असून,आहार,विहार आणि विचारांतून भारतीयत्व हरवत चालले आहे.भारतीय ज्ञान आधुनिक विज्ञानाच्या कसोटीवर सिद्ध करून जगासमोर मांडण्याची गरज आहे. मानव्यशास्त्रात जागतिक दर्जाच्या संस्था भारतात उभ्या राहायला हव्यात आणि डेक्कन कॉलेजमध्ये ते सामर्थ्य आहे."

सुनील आंबेकर म्हणाले लोकशाही रक्षण : आणीबाणीच्या काळात स्वयंसेवकांनी संविधानाच्या रक्षणासाठी आणि लोकशाहीच्या पुनर्स्थापनेसाठी मोठे योगदान दिले.

मतांतरण व जागृती : लोकसंख्याशास्त्रीय बदल आणि मतांतरण रोखण्यासाठी केवळ कायदा पुरेसा नाही, तर हिंदू समाजाने संघटित आणि जागृत राहणे गरजेचे आहे.

युवा संवाद : नवीन पिढीशी प्रभावी संवाद साधून त्यांच्या कर्तृत्वावर विश्वास ठेवत त्यांना राष्ट्रकार्यात सोबत घ्यायला हवे.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### चाकणला कन्या विद्यालयात दहावी परीक्षेत ज्योती राजभर प्रथम

चाकण (दैनिक संध्या) : महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक परीक्षा मंडळाच्या वतीने मार्चमध्ये घेण्यात आलेल्या दहावीच्या परीक्षेत क्रांती शिक्षण संस्थेच्या येथील कन्या विद्यालयाचा शेकडा निकाल ९७.७२ टक्के लागला. या विद्यालयातील ज्योती राजेश राजभर हिने ९३.८० टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांक मिळवला. मधुरा सुनील होडंगे हिने ९१.८० टक्के गुण मिळवून दुसरा क्रमांक, तर तेजस्विनी संभाजी तळेकर हिने ९१.४० टक्के गुण मिळवून तिसरा क्रमांक मिळवला. तसेच त्रिशा निलेश बोंबले हिने ९०.४० हिचा चौथा तर, स्नेहा सुभाष गोपनर हिने ८९.४० टक्के गुण मिळवून पाचवा क्रमांक मिळवला. क्रांती शिक्षण संस्थेचे अध्यक्ष वैभव शाह, उपाध्यक्षा साधना शाह, सचिव साहेबराव देशमुख, सहसचिव दिलीप इंगवले आदींनी सर्व गुणवंत विद्यार्थीनी व त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांचे कौतुक केले.

### विद्यार्थी सहायक समितीमध्ये शनिवारी कलादालनाचे उद्घाटन व विद्यार्थी मेळावा

पुणे (दैनिक संध्या) : विद्यार्थी सहायक समितीच्या शिवाजी हौसिंग सोसायटीजवळील लजपतराय विद्यार्थी भवन येथे उभारण्यात आलेल्या कलादालनाचे उद्घाटन व कलाकार (आर्टिस्ट) माजी विद्यार्थी मेळाव्याचे आयोजन केले आहे. येत्या शनिवारी (ता. १६ मे) रोजी सकाळी १०.३० वाजता प्रसिद्ध चित्रकार मिलिंद मुळीक व ज्येष्ठ शिल्पकार विवेक खटावकर यांच्या प्रमुख उपस्थितीत हा सोहळा होणार आहे. यासह समितीमध्ये राहून कलाविषयक शिक्षण घेतलेल्या आजवरच्या माजी विद्यार्थ्यांचा मेळावा होणार आहे. रविवारी (ता. १७) सायंकाळी ५.३० वाजता चित्रकार विलास कुलकर्णी यांच्या जलरंग प्रात्यक्षिकांची अनुभूती कलाप्रेमींना घेता येणार आहे. समितीचे अध्यक्ष प्रतापराव पवार, कार्यकारी विश्वस्त तुषार रंजनकर आदी उपस्थित राहणार आहेत. उद्घाटनानंतर या कलादालनात माजी विद्यार्थ्यांच्या कलाकृतींचे प्रदर्शन भरणार असून, सर्व पुणेकरांना हे प्रदर्शन विनामूल्य पाहता येणार आहे, अशी माहिती संयोजकानी दिली आहे. तसेच समितीच्या कलाकार माजी विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने या मेळाव्यात सहभागी होण्याचे आवाहन केले आहे.



### ताराबाई अडागळे यांचे निधन

लोणी काळभोर (दैनिक संध्या) : लोणीकाळभोर येथील श्रीमती ताराबाई किसन अडागळे यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. त्या ८७ वर्षांच्या होत्या. त्यांच्या पश्चात पाच मुले, सुना, नातवंडे व परतुंडे असा मोठा परिवार आहे. पत्रकार अमोल अडागळे यांच्या त्या आजी होत.

### शहर अभियंता पदावर स्थानिक व कार्यक्षम अभियंत्याची नियुक्ती करा : वाघेरे

पिंपरी (दैनिक संध्या) : पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे शहर अभियंता हे महत्त्वाचे पद गेल्या अडीच महिन्यांपासून रिक्त आहे. आपण आयुक्तपदी रुजू होऊन दोन महिने पूर्ण झाले असले तरी अद्याप शहराला कायमस्वरूपी शहर अभियंता मिळालेला नाही. त्यामुळे अनेक विकासकामांवर तसेच प्रशासकीय कामकाजावर परिणाम होत आहे, त्यामुळे त्वरित शहरअभियंता पदी नियुक्ती करावी,अशी मागणी पिंपरीतील माहिती अधिकार कार्यकर्ते रमेश वाघेरे यांनी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे आयुक्त डॉ विजय सुर्यवंशी यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमधील शैक्षणिक अर्हता असलेले अनुभवी कार्यक्षम स्थानिक अभियंत्यांची शहर अभियंता पदावर त्वरित नियुक्ती करावी, अशी मागणी केली आहे, शहरातील आमदार, खासदार, माजी पदाधिकारी किंवा इतर राजकीय हस्तक्षेपामुळे हे पद आतापर्यंत रिक्त राहिले असल्याची चर्चा शहरातील नागरिकांमध्ये आहे. त्यामुळे कोणाच्याही दबावाला बळी न पडता, आवश्यक शैक्षणिक अर्हता व प्रशासकीय अनुभव असलेल्या स्थानिक अभियंत्यांची शहर अभियंता पदावर तातडीने नियुक्ती करण्यात यावी, अशी मागणी पिंपरीतील माहिती अधिकार कार्यकर्ते रमेश नानासाहेब वाघेरे यांनी आयुक्तांनाकडे केली आहे.

### व्यावसायिक विश्वात लिंगभेदातीत विचार व कृती सक्षम बनवते : डॉ. माधुरी कानिटकर

पुणे (दैनिक संध्या) : "डॉक्टर, लष्करी अधिकारी आणि शिक्षक, अशा तीन भूमिका निभावताना वैद्यकीय शिक्षणामुळे मला सेवाभाव, जबाबदारीचे भान मिळाले. लष्करी सेवेने शिस्त, वेळेचे महत्त्व, नेमकेपणा दिला आणि या सकारात्मक गोष्टींचा मला शिक्षकी पेशात उपयोग झाला. व्यावसायिक कारकीर्द घडवताना, लिंगभेदातीत विचार आणि कृती करणे, तुम्हाला अधिक सक्षम करते," असे प्रतिपादन लेफ्टनंट जनरल (निवृत्त) डॉ. माधुरी कानिटकर यांनी केले. सर्वसामान्यांच्या आरोग्यसेवांसाठी झटणाऱ्या समवेदना संस्थेच्या २३ व्या वर्धापनदिनानिमित्त आयोजित व्याख्यानात कानिटकर बोलत होत्या. 'जिद्द, शिस्त आणि आरोग्य - एका महिला जनरलचा यशस्वी मंत्र', असा त्यांच्या व्याख्यानाचा विषय होता. एरंडवणे येथील आदर्श अभिनव सभागृहात झालेल्या कार्यक्रमावेळी लेफ्टनंट जनरल (निवृत्त) राजेंद्र कानिटकर, समवेदना संस्थेच्या सल्लागार समितीचे सदस्य राजीव साबडे, संस्थेचे व्यवस्थापक अमर पवार, प्रसिद्ध शिक्षणतज्ज्ञ डॉ. राजा व रेणु दांडेकर उपस्थित होते. संस्थेचे हितचिंतक चंद्रकांत आरोळे आणि माधवी राऊत यांचा डॉ. कानिटकर यांच्या हस्ते कृतज्ञता सत्कार करण्यात आला. संस्थेच्या अहवालाचे प्रकाशनही डॉ. कानिटकर यांनी केले. डॉ. कानिटकर यांनी स्वतःच्या वैद्यकीय शिक्षणापासूनचा काळ, कौटुंबिक पार्श्वभूमी, लष्करी वैद्यकीय महाविद्यालयातील प्रवेश, प्रत्यक्ष लष्करी वैद्यकीय सेवेचा स्वीकार, एकाच क्षेत्रातील सहचराची निवड, प्रदीर्घ काळातील लष्करी सेवेचा अनुभव आणि नाशिकच्या महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या कुलगुरूपदाची जबाबदारी असे विविध टप्पे उलगडले. समवेदना संस्थेतर्फे वंचित आणि गरजू विद्यार्थी, महिला, तसेच आर्थिकदृष्ट्या मागास घटकांसाठी केले जाणारे कार्य कौतुकास्पद असल्याचे गौरवोद्गार त्यांनी काढले.


**पुणे जिल्हा परिषद, बांधकाम विभाग (दक्षिण)**

**ई - निविदांतर्गत खुली बी १ निविदा सुचना क्रं. ०९ सन २०२६-२७**

पुणे जिल्हा परिषद, नवीन प्रशासकीय इमारत, वेलस्ली रोड, कॅम्प पुणे-१ यांच्या वतीने अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, पुणे जिल्हा परिषद, पुणे यांचे तर्फे दौंड-१, एकूण - १ कामांची ई-निविदा http:mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दि. ११/०५/२०२६ रोजी दु. १२.०० वा. प्रसिध्द करणेत आल्या आहेत. ई निविदेबाबत संपूर्ण माहिती http:mahatenders.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करुन देणेत आलेली आहे.

सही/- कार्यकारी अभियंता (दक्षिण) जिल्हा परिषद, पुणे

सही/- अति. मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, पुणे

जा.क्र. जि. प. बांध/ले-६/८१/२०२६

पुणे दि. १२/०५/२०२६


# ॲमेझॉन एमएक्स प्लेयरकडून विमल खन्ना ट्रेलरचे अनावरण

## पुस्तकांपासून पडद्यापर्यंत एक दिग्गज सर्वायव्हल थ्रिलर पात्र जिवंत

**विमल खन्ना १५ मेपासून ॲमेझॉन एमएक्स प्लेयरवर खास मोफत स्ट्रीम**




मुंबई (दै. संध्या) :

ॲमेझॉन एमएक्स प्लेयर या भारतातील आघाडीच्या विनामूल्य, प्रीमियम, जाहिरात-समर्थित व्हिडिओ स्ट्रीमिंग सेवेने आज त्याच्या आगामी सर्वायव्हल थ्रिलर विमल खन्नाच्या मनोरंजक ट्रेलरचे अनावरण केले. सुरेंद्र मोहन पाठक यांच्या 'द विमल सिरीज' या गाजलेल्या कलाकृतीत हिंदी साहित्यातील सर्वात चिरस्थायी पात्रांपैकी एक पात्र प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. या मालिकेत ईशा तलवार आणि तारा अलीशा बेरी यांच्यासोबत सनी हिंदुजा मुख्य भूमिकेत झळकतील. दिनांक 15 मे रोजी प्रदर्शित होणार असलेली ही मालिका एका तणावपूर्ण, अनपेक्षित जगात प्रवेश करते जिथे ओळख नाजूक असते, विश्वास धोकादायक असतो आणि प्रत्येक हालचालीची किंमत मोजावी लागते.

हा ट्रेलर एका अविरत जगण्याच्या थरारक सूर तयार करतो, कारण विमल खन्ना स्वतःला सतत पळपुट्या अवस्थेत पाहतो. विश्वासघात, फसवणूक आणि जगण्याच्या एका धोकादायक चक्रात खोलवर ओढला जातो, जिथे प्रत्येक पलायन त्याला आणखी पुढे ढकलते. रहस्ये उघड होऊ लागतात आणि लपलेले हेतू समोर येऊ लागतात, तेव्हा एक प्रश्न रेंगाळतो- विमल खन्ना बचेगा या मरेगा? तो बाहेर पडण्याचा मार्ग शोधून काढेल की तो चक्रात अधिकच ओढला जाईल?

चुकीचा आरोप लावून आणि त्याच्या अस्तित्वाला आव्हान देणाऱ्या स्थितीत, विमलचा निर्दोषतेसाठीचा लढा लवकरच त्याला नष्ट करण्याचा निर्धार असलेल्या व्यवस्थेविरुद्धच्या लढाईत रूपांतरित होतो. जसजसे नियंत्रण सुटते, तसतशी प्रत्येक चाल अपेक्षित वाटते आणि प्रत्येक सुटकेची किंमत मोजावी लागते. ज्यामुळे तो एका गुंतागुंतीच्या जाळ्यात आणखी खोलवर ओढला जातो. कल्पनेची धार आणि भावनिक तीव्रतेसह, विमल खन्ना वेडेपणा, बदलत्या निष्ठा आणि टिकून राहण्याच्या अंतःप्रेरणेने चालणारे एक खडतर, शहरी जग निर्माण करतो.

ॲमेझॉन एमएक्स प्लेयरचे कंटेंट प्रमुख अमोघ दुसाद म्हणाले, "ॲमेझॉन एमएक्स प्लेयरवर सुरेंद्र मोहन पाठक यांची विमल सिरिज प्रदर्शित करणे हा आमच्यासाठी एक रोमांचक सर्जनशील प्रवास होता. हे एक पात्र आणि एक असे जग आहे ज्याने वर्षानुवर्षे वाचकांवर गारुड केले. पुस्तकी पात्राला दृश्यात्मक मंचावर आणण्याची जबाबदारी आणि प्रमाण या दोन्हींसह येते. आजच्या प्रेक्षकांसाठी सिनेमॅटिक, गुंतवणाऱ्या आणि आकर्षक गोष्टीला आकार देताना मूळ मालिकेचे सार राखून ठेवण्याचा हा मार्ग या सिरिजला 'हटके' बनवतो. ॲमेझॉन एमएक्स प्लेयरवर हे विश्व देशभरातील प्रेक्षकांसमोर आणण्यासाठी आम्ही उत्सुक आहोत."

या कार्यक्रमाबद्दल आणि स्वतःच्या भूमिकेबद्दल बोलताना सनी हिंदुजा म्हणाला, "ॲमेझॉन एमएक्स प्लेयरसोबत विमल खन्नावर काम करण्याचा हा एक विलक्षण अनुभव होता. विमल हा पारंपरिक नायक नाही; तो एक सामान्य माणूस आहे ज्याला विलक्षण परिस्थितीत ढकलले जाते, जिथे जगणे ही सहज प्रवृत्ती बनते. ज्या गोष्टीने मला या पात्राकडे आकर्षित केले ते म्हणजे त्याचा अंतर्गत संघर्ष, त्याची ओळख टिकवून ठेवणे आणि त्याच्या विरोधात काम करणाऱ्या व्यवस्थेशी जुळवून घेणे यांच्यातील सततचा संघर्ष. 'ये अलग मिट्टी का बना है' ही एक म्हण विमलला तंतोतंत लागू पडते. त्याचा प्रवासच त्याला असुरक्षित आणि शक्तिशाली बनवतो."

प्रसिद्ध थरारक, सनसनाटी कथालेखक सुरेंद्र मोहन पाठक पुढे म्हणाले, "विमल खन्ना हे पात्र वर्षानुवर्षे वाचकांच्या स्मरणात आहे. त्यांचा प्रवास नेहमीच स्वतःची ओळख आणि स्वतःच्या भावनेला आव्हान देणारा आहे जो. ही कथा पडद्यावर आकार घेताना पाहणे रोमांचक आणि अर्थपूर्ण दोन्ही आहे. प्रेक्षक कधी एकदा ॲमेझॉन एमएक्स प्लेअरच्या माध्यमातून नवीन पद्धतीने या विश्वाचा अनुभव घेतील असं झाले आहे."

विमल खन्नाचे स्ट्रीम मोफत खास ॲमेझॉन एमएक्स प्लेयरवर 15 मेपासून मोबाइल उपकरणे, कनेक्टेड टीव्ही, ॲमेझॉन शॉपिंग ॲप, प्राइम व्हीडिओ, फायर टीव्ही, जिओ टीव्ही आणि एअरटेल एक्स्ट्रीमवर होईल.

## झी टीव्हीवरील 'वसुधा' भारतातील टॉप-रेटेड मालिकांमध्ये सामील

नवी दिल्ली (दै. संध्या) :

भारतीय टेलिव्हिजनसाठी हा एक ऐतिहासिक क्षण ठरला आहे. झी टीव्हीने मनोरंजन उद्योगांमध्ये आपले अग्रस्थान आणखी दृढ केले असून वाहिनीवरील प्रमुख मालिका 'वसुधा' सर्व हिंदी जनरल एंटरटेनमेंट चॅनेल्स (GEC - General Entertainment Channels) मध्ये क्रमांक 1 ची फिक्शन मालिका ठरली आहे. प्रभावी 1.8 टीव्हीआर नोंदवत, 'वसुधा' या मालिकेने केवळ अव्वल स्थानच पटकावले नाहीये तर भारतीय टेलिव्हिजनवरील स्पर्धात्मक समीकरणालाही नवीन वळण दिले आहे. 'क्योंकि सास भी कभी बहू थी' आणि 'अनुपमा' यांसारख्या दीर्घकाळ आघाडीवर असलेल्या मालिकांना मागे टाकत, प्रेक्षकांच्या पसंतीत आणि कंटेंट नेतृत्वामध्ये मोठा बदल झाल्याचे स्पष्ट झाले आहे. हा टप्पा फक्त उत्तम कामगिरीचा दाखला नाही तर टेलिव्हिजन विश्वात सुरू झालेल्या आमूलाग्र बदलांचे संकेत देणाराही आहे. प्रेक्षकांची निष्ठा आता प्रगल्भ होत चालली असून, ताज्या दमाची कथानके, आपलेसे वाटणारे कथाकथन आणि नव्या युगातील व्यक्तिरेखा यांना प्रेक्षक मोठ्या प्रमाणावर पसंती देत आहेत. या बदलाच्या केंद्रस्थानी 'वसुधा' या मालिकेतील मुख्य व्यक्तिरेखा वसुधा आणि देव हे आहेत. अगदी अल्पावधीतच ह्या व्यक्तिरेखा घराघरांत पोहोचली असून, विभिन्न वयोगटांतील प्रेक्षकांसोबत त्यांचे खास नाते जुळले आहे. त्यांच्या वाढत्या लोकप्रियतेतून प्रेक्षकांसोबत जोडले जाण्याच्या आणि संवाद साधण्याच्या नवीन पर्वाचे प्रतीक दिसून येते आणि त्यातून आजच्या मनोरंजन अर्थप्रणालीमध्ये नेतृत्व करण्याची व्याख्याच बदलत आहे.

## आदित्य बिर्ला मेमोरियल हॉस्पिटलकडून हाडे व सांधे उपचारांच्या शिबीराचे आयोजन

नवी दिल्ली (दै. संध्या) :

**लवकर निदान आणि अस्थिरोग उपचारांना प्रोत्साहन देण्यासाठी उपक्रम**

लवकर निदान आणि वेळेवर उपचारांचे महत्त्व लक्षात घेऊन, पुण्यातील आदित्य बिर्ला मेमोरियल हॉस्पिटल तर्फे विशेष हाडे व सांधे उपचार शिबीर (बोन अँड जॉइंट कॅम्प) चे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरास 11 मे रोजी सुरुवात झाली असून ते 23 मेपर्यंत सकाळी 10 ते सायंकाळी 5.30 या वेळेत रुग्णालय परिसरात सुरू राहणार आहे.

अदित्य बिर्ला मेमोरियल हॉस्पिटलचे मुख्य कार्यकारी अधिकारी पामेश गुप्ता म्हणाले, "गुडघेदुखी, कंबरेचे दुखणे, पाठदुखी, सांध्यांमध्ये कडकपणा किंवा सूज, चालताना किंवा पायऱ्या चढताना अडचण, हाडे कमकुवत होणे किंवा हालचालींमध्ये मर्यादा येणे अशी लक्षणे असलेल्या व्यक्तींसाठी हे शिबिर विशेषतः अधिक उपयुक्त आहे. अशा लक्षणांकडे सुरुवातीच्या टप्प्यात अनेकदा दुर्लक्ष केले जाते, त्यामुळे पुढे दीर्घकालीन अस्थिरोग समस्यांना सामोरे जावे लागू शकते."




या उपक्रमांतर्गत सहभागी नागरिकांना 6 हजार 999 रुपयांच्या मूळ किमतीऐवजी केवळ 999 रुपयांत सर्वसमावेशक बोन अँड जॉइंट स्क्रीनिंग पॅकेज उपलब्ध करून देण्यात आले आहे. या पॅकेजमध्ये हाडे आणि सांध्यांशी संबंधित विविध आजारांचे निदान आणि मूल्यांकन करण्यासाठी आवश्यक तपासण्यांचा समावेश आहे.

या शिबिरामध्ये आरए फॅक्टर -- रुमेटॉईड आर्थ्रायटिस शोधण्यासाठी, अँटी-सीसीपी -- सुरुवातीच्या रुमेटॉईड आर्थ्रायटिसची खात्री करण्यास मदत

युरिक ॲसिड -- गाऊट आणि युरिक ॲसिडमुळे होणाऱ्या सांधेदुखीचे निदान, व्हिटॅमिन डी -- हाडांची मजबुती आणि हाडांच्या विकारांचा धोका तपासण्यासाठी

याबरोबरच कॅल्शियम, ईएसआर आणि सीआरपी यांसारख्या तपासण्या तसेच अस्थिरोग तज्ज्ञांचा सल्ला याचाही समावेश आहे. स्क्रीनिंग पॅकेजबरोबरच रुग्णालयाकडून मोफत ऑर्थोपेडिक मूल्यमापनही करून दिले जात आहे. यामध्ये एक्स-रे, ॲडव्हान्स बीएमआय, फॅट ॲनालिसिस आणि तज्ज्ञांचा सल्ला यांचा समावेश आहे.

या शिबिराअंतर्गत रुग्णालयाने काही विशेष सवलतीही जाहीर केल्या आहेत यात तज्ज्ञांनी सल्ला दिल्यास अस्थिरोग शस्त्रक्रियेवर 20 टक्के सूट, इतर तपासण्यांवर 20 टक्के सूट, डेक्सा बीएमडी तपासणी 3 हजार 900 रुपयांऐवजी 999 रुपयांत, डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार एमआरआयवर 50 टक्के सूट

शिबिरासाठी नोंदणी करणाऱ्या सहभागी नागरिकांना 'आरोग्य केअर प्रिव्हिलेज कार्ड' केवळ 99 रुपयांत उपलब्ध करून देण्यात येत आहे.

या उपक्रमाद्वारे अदित्य बिर्ला मेमोरियल हॉस्पिटल नागरिकांना हाडे किंवा सांध्यांशी संबंधित सातत्यपूर्ण लक्षणांकडे दुर्लक्ष न करता लवकर निदान, वेळेवर उपचार आणि चांगल्या जीवनमानासाठी सक्रिय पावले.

## जाने अनजाने हम मिले मालिकेने गाठला ५०० भागांचा पल्ला




नवी दिल्ली (दै. संध्या) :

गोल्डी बेहल आणि सोनल ए. कक्कर यांच्या रोझ ऑडिओ व्हिज्युअल्स प्रा. लि. निर्मित, झी टीव्हीवरील लोकप्रिय मालिका 'जाने अनजाने हम मिले'ने नुकताच 500 भागांचा मोठा टप्पा गाठत प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले आहे. नोव्हेंबर 2024 मध्ये प्रसारित व्हायला सुरुवात झाल्यापासून ही मालिका भावनिक गहनता आणि आकर्षक नाट्यामुळे प्रेक्षकांच्या मनात सतत घर करून राहिली आहे. शारदा (जयती भाटिया) यांची दमदार भूमिका असो किंवा राघव (भरत अहलावत) आणि रीत (आयुषी खुराणा) यांची मोहक ऑन-स्क्रीन केमिस्ट्री, ह्या मालिकेने देशभरातील प्रेक्षकांशी एक घट्ट नाते जोडले आहे. जयती भाटिया, भरत अहलावत आणि आयुषी खुराणा यांसारख्या कलाकारांसह 'जाने अनजाने हम मिले' या मालिकेला प्रचंड प्रेम आणि प्रशंसा मिळत आहे. या विशेष प्रसंगी कलाकार आणि तंत्रज्ञांनी सेटवर केक कापून आनंदाने उत्सव साजरा केला आणि पुढेही असेच आणखी मोठे टप्पे गाठण्याची आशा व्यक्त करत प्रेक्षकांचे मनापासून आभार मानले आणि या उल्लेखनीय यशाचा आनंद सर्वांसोबत शेयर केला. ह्या मालिकेत राघवची भूमिका साकारणारा भरत अहलावत म्हणाला, "'जाने अनजाने हम मिले' मालिकेने 500 भागांचा टप्पा गाठणे माझ्यासाठी खरोखरच अविश्वसनीय आहे. राघवची भूमिका साकारताना मला अपार समाधान मिळाले असून प्रेक्षकांकडून मिळालेले प्रेम मनाला भारावून टाकणारे आहे. यातील प्रत्येक दृश्य, प्रत्येक भावनेने मला अभिनेता म्हणून घडवले आहे. या प्रवासाला इतके खास बनवल्याबद्दल मी संपूर्ण टीम आणि आमच्या प्रेक्षकांचा मनापासून आभारी आहे."

ह्या मालिकेत रीतची भूमिका साकारणारी आयुषी खुराणा म्हणाली, "500 भाग झाले तरी अजूनही असंच वाटतंय की आम्ही नुकतीच सुरुवात केली आहे. ही मालिका म्हणजे माझ्यासाठी दुसरे घरच बनली आहे, जिथे सुंदर आठवणी आणि नाती निर्माण झाली आहेत आणि जी मी सदैव जपेन.

## जीसा संघटनेचे सचिव महेश उबाळे यांचे निधन

जेजुरी (दै. संध्या) :



जेजुरी कगर सर्व्हिस असोशियशन जीसा संघटनेचे सचिव तसेच एस एस आर क्रिकेट क्लबचे संचालक,उद्योजक व सामाजिक कार्यकर्ते महेश उबाळे वय 42 यांचे हृदयविकाराने निधन झाले.त्यांचे मागे आई,वडील,भाऊ,पत्नी व तीन मुली असा परिवार आहे. जेजुरी येथील युवा उद्योजक, जीसा संघटनेचे सचिव,सामाजिक कार्यकर्ते म्हणून महेश उबाळे यांची ओळख होती. सहा महिन्यांपूर्वी एस एस आर क्रिकेट क्लब च्या वतीने पुरंदर प्रीमियर लीग क्रिकेट स्पर्धेचे जेजुरीत भव्य आयोजन करण्यात आले होते.या स्पर्धेच्या आयोजनात त्यांचा पुढाकार होता. ग्रामदेवता जानाई देवी यात्रेत कुस्ती आणि बैलगाडा स्पर्धेसाठी त्यांचे मोठे योगदान होते. मंगळवार दिनांक 12 रोजी सकाळी पालखी मैदानावर ते क्रिकेट खेळत असताना त्यांना त्रास झाला. आणि हृदय विकाराने त्यांचे निधन झाले.त्यांच्या आकस्मित निधनामुळे जेजुरी शहरात हळहळ व्यक्त करण्यात आली. जेजुरी येथील कैलास स्मशान भूमीत त्यांच्यावर अंत्य संस्कार करण्यात आले. यावेळी जीसा ,जेजुरी उद्योजक संघ,जेजुरी नगरपरिषद,अखिल जुनी जेजुरी मित्र मंडळ व विविध संघटनांच्या वतीने त्यांना श्रद्धांजली वाहण्यात आली.

## स्नॅपड्रॅगन® 8 एलीट जनरेशन ५ ने युक्त असलेला वनप्लस पॅड ४ टॅब्लेट उपलब्ध

नवी दिल्ली (दै. संध्या) :




जागतिक स्तरावरील तंत्रज्ञान ब्रॅण्ड वनप्लसने आज आपले वनप्लस पॅड 4 हे उत्पादन विक्रीसाठी खुले करत असल्याची घोषणा केली. पीसीच्या तोडीची कामगिरी, दृश्यात्मकता व उत्पादनक्षमता पोर्टेबल स्वरूपात देण्याच्या दृष्टीने हे उत्पादन विकसित करण्यात आले आहे. या उपकरणाची किंमत ५४,९९९ रुपयांपासून सुरू होत आहे. अमेझॉन.इन, फ्लिपकार्ट, वनप्लस. इन वनप्लस स्टोअर ॲप, वनप्लस एक्स्पिरिअन्स स्टोअर आणि निवडक ऑफलाइन पार्टनर्सकडे ते विक्रीसाठी उपलब्ध असून, काही बँकांशी निगडित सवलती उपकरणाच्या किमतीवर जाहीर करण्यात आल्या आहेत.

वनप्लस पॅड 4 स्नॅपड्रॅगन® 8 एलीट जनरेशन 5 तंत्रज्ञानावर आधारित असल्याने आजवरचा तो सर्वात शक्तीशाली वनप्लस टॅब्लेट आहे. १२ जीबी एलपीडीडीआर5एक्स रॅम क्षमतेचे आणि ५१२ जीबी यूएफएस ४.१ स्टोरेजने युक्त असे हे उपकरण मल्टिटास्किंग, गेमिंग तसेच सर्जनशील कार्यप्रवाहासांठी वेगाने व सुविहितपणे काम करते. सातत्यपूर्ण कामगिरीची निश्चिती करण्याच्या उद्देशाने या टॅब्लेटमध्ये प्रगत क्रायो-व्हेलॉसिटी कूलिंग प्रणाली देण्यात आली आहे. यामध्ये ४०,७६० एमएमची महाकाय शक्ती आहे, यातील व्हेपर चेम्बर आणि ग्रॅफाइट कॉम्पोझिटमुळे उपकरण खूप वापरले जात असतानाही थंड राखले जाते. काम आणि मनोरंजन या दोन्ही बाबी डोळ्यापुढे ठेवून विकसित करण्यात आलेल्या वनप्लस पॅड 4 मध्ये ३३.५३ सेंटीमीटर (१३.२ इंची) स्क्रीन व अत्यंत सुस्पष्ट डिसप्ले आहे. स्क्रीनच्या स्पष्टतेचे मानक ३१५ पीपीआयपर्यंत आहेत तसेच डॉल्बी व्हिजन प्रणालीही यात आहे. दृश्ये अत्यंत स्पष्ट दिसावीत म्हणून १४४ हर्ट्झचा रिफ्रेश दर आहे. ७:५ अशा रीडफिट अस्पेक्ट रेशिओमुळे वापरण्याजोग्या स्क्रीनची जागा वाढते. त्यामुळे टॅब्लेटवर वाचन, संपादन यांसारखी उत्पादनक्षम कामे तसेच मल्टिटास्किंग (एकावेळी अनेक कामे करणे) उत्तम पद्धतीने केले जाते. उपकरणातील बॅटरी १३,३८० एमएएच एवढ्या क्षमतेची असून, वनप्लस उपकरणांपैकी ही सर्वांत अधिक क्षमतेची बॅटरी आहे. त्यामुळे व्हिडिओ प्लेबॅक, गेमिंग आणि स्टॅण्डबाय आदी विस्तारित सेवा देणेही शक्य होत आहे. ८० वॉट्सच्या सुपरव्हूक वेगवान चार्जिंगमुळे वापरकर्ते कोणत्याही व्यत्ययाशिवाय झटपट उपकरण चार्ज करवून घेऊ शकतात.

हा टॅब्लेट ऑक्सिजनओएस 16 वर चालणारा असल्यामुळे पीसीच्या तोडीचा अनुभव देतो. मल्टिटास्किंग, विंडो व्यवस्थापन लवचिकपणे करणे, ड्रॅग-अँड-ड्रॉप शेअरिंग, मल्टि-विंडो सपोर्ट आणि सेकंड स्क्रीन कार्यात्मकता असे सर्व यामुळे शक्य होत आहे. या उपकरणाद्वारे एआय पेण्टर, एआय रेकॉर्डर, एआय रायटर आणि एआय समरी अशा अनेक एआयशी निगडित सोयी वनप्लसने ग्राहकांना देऊ केल्या आहेत.

हे उपकरण अव्वल दर्जाच्या धातूच्या युनीबॉडी रचनेत बसवण्यात आले आहे. टॅब्लेटची जाडी ५.९४ मिलीमीटर एवढी आहे, ड्युन ग्लो आणि सेज मिस्ट अशा दोन रंगछटांमध्ये ते उपलब्ध आहे. यामध्ये आठ हाय-फाय स्पीकर सेटअप आणि अवकाशीय श्राव्य अनुभव यांचा समावेश आहे. ॲक्सेसरींमध्ये वनप्लस स्टायलो प्रो १६,००० दाब स्तरांचा (प्रेशर लेव्हल्स) समावेश आहे. या उपकरणाच्या ड्युअल-टिप रचनेमुळे लेखन, चित्र रेखाटणे आदी कामे शांतपणे होऊ शकतात. त्यात तत्काळ प्रतिसादासाठी झिरो प्रेशर शाई व वेगवान कृती करण्याची सोय आहे. एक स्मार्ट कीबोर्डही लवकरच बाजारात येणार आहे. त्यामुळे पॅड 4 चे रूपांतर पीसीसारख्या उत्पादनक्षम उपकरणात होणार आहे. ५४,९९९ रुपयांपासून सुरू होणाऱ्या किमतीला उपलब्ध असणारे वनप्लस पॅड 4 ५ मे, २०१६ रोजी विक्रीसाठी खुले होणार आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### यूके मधील ॲबरिस्टविथ विद्यापीठ आणि पीसीईटी शिष्टमंडळाची बैठक संपन्न

पिंपरी (दैनिक संध्या) : जागतिक दर्जाच्या शैक्षणिक संस्थांनी एकत्र येऊन उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थी आणि प्राध्यापकांसाठी योग्य समन्वय साधून मजबूत जागतिक परिवर्तनकारी शैक्षणिक भागीदारी निर्माण केली पाहिजे. यासाठी ॲबरिस्टविथ विद्यापीठ आणि भारतात आंतरराष्ट्रीय दर्जाच्या शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देणाऱ्या पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्ट सोबत एक दृढ नाते निर्माण करत आहे याचा पुढील काळात दोन्ही संस्थांच्या विस्तारासाठी उपयोग होईल असे मत यूके मधील ॲबरिस्टविथ विद्यापीठाचे आंतरराष्ट्रीय विभाग, सहयोगी प्र-कुलपती प्रा. नायजेल होल्ट यांनी व्यक्त केले. पीसीईटीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्ष पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांच्या उपस्थितीत यूके मधील ॲबरिस्टविथ विद्यापीठ सोबत २०२५ मध्ये सामंजस्य करार करण्यात आला होता. त्या कराराचा पुढचा टप्पा म्हणून पीसीईटी आणि यूके मधील ॲबरिस्टविथ विद्यापीठ शिष्टमंडळाची बैठक पीसीईटी ट्रस्टच्या कार्यालयात आयोजित करण्यात आली होती. यावेळी यूके मधील ॲबरिस्टविथ विद्यापीठाचे आंतरराष्ट्रीय विभाग, सहयोगी प्र-कुलपती प्रा. नायजेल होल्ट, प्रादेशिक व्यवस्थापक सामंथा वॅलिन, सल्लागार झफीर आलम आणि पीसीईटीच्या वतीने ओ. एस. डी. डॉ. योगेश भावसार, डॉ. ऐश्वर्या गोपालकृष्णन, डॉ. निरुपमा कोचेरलाकोटा, डिजिटल मार्केटिंग विभागाच्या शुभांगी रामटेके यांनी या बैठकीत सहभाग घेतला. पुढील काळात या दोन्ही संस्थांच्या मध्ये उच्च शिक्षण, संशोधन, शेती, सांस्कृतिक, कला, विद्यार्थी, प्राध्यापक विनिमय क्षेत्रात एक दृढ नाते निर्माण होईल. यूके मधील ॲबरिस्टविथ विद्यापीठ ही संस्था तिच्या शैक्षणिक उत्कृष्टता, संशोधन सामर्थ्य आणि आंतरराष्ट्रीय दर्जाच्या उच्च शिक्षण संशोधन सुविधा साठी जागतिक स्तरावर ओळखली जाते. या करारामुळे संयुक्तपणे शैक्षणिक संशोधन, परदेशात उच्च शिक्षण, संशोधन, दुहेरी पदवी प्राप्त करणे, अल्पकालीन अभ्यासक्रम, उन्हाळी शाळा उपक्रम, विद्यार्थी प्राध्यापक विनिमय, क्रेडिट हस्तांतरण आणि विद्यार्थी इंटर्नशिप असे सहयोगी उपक्रम राबविण्यात येणार आहेत अशी माहिती पीसीईटीचे कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांनी या बैठकीनंतर दिली.

### स्वच्छ पिंपरी चिंचवडसाठी नागरिकांनी पुढाकार घ्यावा, महापौर लांडगे यांचे आवाहन

पिंपरी (दैनिक संध्या) : पिंपरी चिंचवड शहर स्वच्छतेत देशात अव्वल स्थानावर नेण्यासाठी प्रत्येक नागरिकाने सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन महापौर रवि लांडगे यांनी केले. स्वच्छ सर्वेक्षण २०२५–२६ अंतर्गत नागरिकांचा अभिप्राय हा शहराच्या विकासाचा महत्त्वाचा आधार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. महापौर रवि लांडगे म्हणाले की, शहरातील स्वच्छता व्यवस्था अधिक प्रभावी, पारदर्शक आणि नागरिकाभिमुख करण्यासाठी नागरिकांचे मत अत्यंत महत्त्वाचे आहे. प्रशासनाच्या प्रयत्नांना साथ देत प्रत्येकाने आपला अभिप्राय नोंदवणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे. यावेळी उपमहापौर शर्मिला बाबर आणि आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनीही नागरिकांना मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन केले. "मी माझा अभिप्राय दिला आहे, आपणही जरूर नोंदवा," असे सांगत महापौर रवि लांडगे यांनी नागरिकांना पुढाकार घेण्याचे आवाहन केले. नागरिकांना https://cf.sbmurban.org या संकेतस्थळावर जाऊन सहजपणे आपला अभिप्राय नोंदवता येणार आहे. पिंपरी चिंचवडला देशात स्वच्छतेत अग्रक्रमांक मिळवून देण्यासाठी सर्वांनी एकत्रित प्रयत्न करावेत, असेही महापौर रवि लांडगे यांनी नमूद केले आहे. तर, आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनीही नागरिकांना सहभागाचे आवाहन करत म्हटले की, "स्वच्छ सर्वेक्षण २०२५–२६ मध्ये नागरिकांचा अभिप्राय हा शहराच्या गुणवत्तेचा आणि प्रगतीचा आरसा आहे. तुमच्या मतांमुळे शहरातील सेवा अधिक प्रभावी आणि नागरिकाभिमुख बनू शकतात. त्यामुळे प्रत्येक नागरिकाने आपला अभिप्राय नोंदवून शहराच्या विकासात सक्रिय योगदान द्यावे.

### सावधान...! रस्त्यावर कचरा टाकल्यास होणार दंडात्मक कारवाई

पिंपरी (दैनिक संध्या) : पिंपरी-चिंचवड शहर स्वच्छ व सुंदर ठेवण्यासाठी महापालिकेकडून स्वच्छता मोहीम अधिक तीव्र करण्यात आली असून सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकणाऱ्यांविरोधात आता थेट दंडात्मक कारवाई सुरू करण्यात आली आहे. पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या 'ड' क्षेत्रीय कार्यालय (रहाटणी) अंतर्गत वॉर्ड क्रमांक २६ मधील कावेरी नगर (वाकड रोड) परिसरात रस्त्यावर मोठ्या प्रमाणात घरगुती कचरा टाकला जात असल्याचे निदर्शनास आले. नागरिकांकडून वारंवार सूचना देऊनही काहीजण शिळे अन्न, भाज्या, कपडे तसेच प्लास्टिकच्या पिशव्यांमधील कचरा रस्त्यावर फेकत असल्यामुळे परिसरात अस्वच्छता निर्माण होत होती.

# पुरुष गटात वाघजाई तर महिला गटात राजमाता जिजाऊ संघ विजेता



**पिंपरी (दै. संध्या)**

'महापौर चषक ही केवळ स्पर्धा नसून राज्यातील नवोदित खेळाडूंना मोठ्या व्यासपीठावर स्वतःची क्षमता सिद्ध करण्याची संधी आहे. पिंपरी चिंचवड शहर क्रीडा संस्कृतीला चालना देणारे शहर म्हणून ओळख निर्माण करत आहे, आणि अशा स्पर्धांमधून भविष्यातील राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय दर्जाचे खेळाडू घडतील, असा विश्वास आहे, ' असे प्रतिपादन महापौर रवि लांडगे यांनी केले. या स्पर्धेत पुरुष गटात वाघजाई तर महिला गटात राजमाता जिजाऊ संघ विजेता ठरला आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या 'महापौर चषक राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धा २०२६' चा समारोप व पारितोषिक वितरण महापौर रवि लांडगे यांच्या हस्ते झाले. यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी आमदार महेश लांडगे, विधानपरिषद सदस्य माजी मंत्री सचिन अहिर, क्रीडा, कला, साहित्य आणि सांस्कृतिक सभापती कैलास कुटे, नगरसदस्या भीमाताई फुगे, नगरसदस्य शीतल उर्फ विजय शिंदे, सागर गवळी, दत्ता गव्हाणे, सचिन तापकीर, माजी नगरसदस्य विलास मेडिगिरी, पंडितराव गवळी, सहाय्यक कामगार आयुक्त अश्विनी साकोरे, उपायुक्त पंकज पाटील यांच्यासह क्रीडाप्रेमी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या स्पर्धेत पुरुष गटात रत्नागिरीच्या वाघजाई कबड्डी संघाने शानदार कामगिरी करत महापौर चषक पटकावला, तर महिला गटात पुण्याच्या राजमाता जिजाऊ संघाने विजेतेपदावर आपले नाव कोरले.

पुरुष गटात वाघजाई कबड्डी संघ रत्नागिरी प्रथम क्रमांकाचा मानकरी ठरला तर शिवमुद्रा संघ कोल्हापूर द्वितीय, बारामती स्पोर्ट क्लब बारामती तृतीय आणि सतेज संघ पुणे चतुर्थ क्रमांकावर राहिले.

महिला गटात राजमाता जिजाऊ संघ पुणे यांनी प्रथम क्रमांक पटकावत विजेतेपद मिळवले तर शिवशक्ती संघ मुंबई द्वितीय, बारामती स्पोर्ट क्लब बारामती तृतीय आणि धर्मवीर कबड्डी संघ नंदुरबार यांनी चतुर्थ क्रमांक मिळवला. स्पर्धेतील वैयक्तिक पारितोषिकांमध्ये पुरुष गटात साहिल पाटील यांना "सर्वोत्कृष्ट खेळाडू" म्हणून बुलेट प्रदान करण्यात आली तर अर्जुन तडस यांना पंचाहत्तर हजार रुपये आणि चषक देऊन गौरविण्यात आले. "सर्वोत्कृष्ट चढाई" पुरस्कार अजिंक्य पवार यांना चेतक गाडी देऊन प्रदान करण्यात आला तर अजित चव्हाण यांना पन्नास हजार रुपये आणि चषक देण्यात आला. "सर्वोत्कृष्ट पकड" या प्रकारात शुभम शिंदे यांना चेतक गाडी तर वैभव रबाडे यांना पन्नास हजार रुपये व चषक प्रदान करण्यात आला. महिला गटात निकिता पडवळ यांना "सर्वोत्कृष्ट महिला खेळाडू" म्हणून चेतक गाडी देण्यात आली तर मृणाली भुवड यांना पंचाहत्तर हजार रुपये व चषक प्रदान करण्यात आला. "सर्वोत्कृष्ट चढाई" प्रकारात सोनाली शिंगटे यांना चेतक गाडी तर मनिषा बारटक्के यांना पन्नास हजार रुपये व चषक देण्यात आला. "सर्वोत्कृष्ट पकड" पुरस्कार ऋतुजा तिगडे यांना चेतक गाडी आणि हर्षदा सोनवणे यांना पन्नास हजार रुपये व चषक देऊन सन्मानित करण्यात आले.

> राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर नाव उज्वल करणारे अर्जुन आणि छत्रपती पुरस्कार विजेत्या शकुंतला खटावकर, छत्रपती पुरस्कार विजेते सूर्यकांत पाटील, संगीता सोनावणे, सायली क्रिपाळे, अमरदीप चांदुगुडे, माजी प्रो कबड्डी खेळाडू सुनील लांडे आणि माजी आंतरराष्ट्रीय खेळाडू रामदास लांडगे यांचा देखील सन्मान करण्यात आला. या स्पर्धेच्या निमित्ताने राज्यभरातील अनेक नामांकित खेळाडू आणि क्रीडाप्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली.

## लंडनमधील मराठी बांधवांना मिळणार हक्काची जागा

**पिंपरी (दै. संध्या)**

युनायटेड किंगडम (यूके) मधील मराठी बांधवांचे हक्काचे आणि प्रमुख सांस्कृतिक केंद्र असलेल्या 'महाराष्ट्र मंडळ, लंडन' या संस्थेच्या वास्तूची जागा "फ्री होल्ड" करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने ५ कोटी रुपयांचा निधी परकीय चलनाद्वारे वितरित केला आहे. मुख्यमंत्री आणि संबंधित विभागाकडे सातत्याने केलेल्या पाठपुराव्याला यामुळे मोठे यश आले आहे असे चिंचवड विधानसभेचे आमदार शंकर जगताप यांनी सांगितले. या संदर्भातील अधिकृत माहिती राज्याचे उद्योग व मराठी भाषा मंत्री उदय सामंत यांनी पत्राद्वारे आमदार शंकर जगताप यांना दिली आहे.

**■ पाठपुराव्याला यश**

आमदार शंकर जगताप याबाबत म्हणाले, लंडनमध्ये वास्तव्यास असलेल्या महाराष्ट्रीयन नागरिकांच्या सोयीसाठी आणि तेथील मराठी समुदायाच्या सर्वांगीण विकासासाठी महाराष्ट्र मंडळाच्या प्रांगणाची मालकी हक्काची जागा खरेदी करणे अत्यंत आवश्यक होते.

यासाठी संस्थेला आर्थिक निधी उपलब्ध करून द्यावा, अशी लेखी विनंती डिसेंबर २०२४ मध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली होती.

## तरुण-तरुणींना मिळणार 'ऑन द स्पॉट' हक्काची नोकरी- आमदार शंकर जगताप

*नवी सांगवीत १४ मे २०२६ रोजी 'भव्य रोजगार मेळावा' : राष्ट्रीय, बहुराष्ट्रीय कंपन्यांमध्ये ५ हजारांहून अधिक पदांसाठी थेट भरती*

**पिंपरी (दै. संध्या)**

पिंपरी-चिंचवड परिसरातील बेरोजगार तरुण-तरुणींना नामांकित राष्ट्रीय, बहुराष्ट्रीय कंपन्यांमध्ये रोजगाराची सुवर्णसंधी उपलब्ध करून देण्यासाठी गुरुवार, दिनांक १४ मे रोजी सांगवी येथे 'भव्य रोजगार मेळावा २०२६' चे आयोजन करण्यात आले आहे. कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नावीन्यता विभाग (पुणे), प्रतिभा महिला प्रतिष्ठान आणि चंद्ररंग चॅरिटेबल ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने हा मेळावा होणार असल्याचे आमदार शंकर जगताप यांनी सांगितले. नवी सांगवी येथील न्यू मिलेनियम इंग्लिश मीडियम स्कूल येथे सकाळी ९ वाजल्यापासून या मेळाव्याला सुरुवात होईल. मेळाव्याचे उद्‌घाटन कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नावीन्यता विभागाचे मंत्री मंगलप्रसादजी लोढा यांच्या हस्ते होणार आहे. या मेळाव्यात मुख्यत्वे पुणे, पिंपरी-चिंचवड व चाकण तसेच महाराष्ट्रातील विविध औद्योगिक पट्ट्यातील नामवंत आयटी, ऑटोमोबाईल, मॅन्युफॅक्चरिंग, रिटेल आणि बँकिंग क्षेत्रातील नामांकित कंपन्या थेट मुलाखती घेऊन उमेदवारांची निवड करणार आहेत.

पाचवी ते दहावी, तसेच बारावी, पदवीधर, पदव्युत्तर तसेच आयटीआय आणि डिप्लोमाधारक पात्र उमेदवारांना यात सहभागी होता येईल. उमेदवारांनी आपल्या बायोडाटा आणि आवश्यक शैक्षणिक कागदपत्रांच्या प्रतींसह वेळेवर उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे. या मेळाव्याच्या माध्यमातून ५ हजारांपेक्षा जास्त रिक्त पदांवर भरती केली जाणार आहे.




> "युवकांना रोजगाराचे हक्काचे व्यासपीठ आणि दर्जेदार संधी मिळवून देणे, हाच या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. नामांकित कंपन्यांमध्ये नोकरी मिळवून देऊन आपल्या तरुणांच्या हाताला काम आणि कौशल्याला योग्य न्याय मिळवून देण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. जास्तीत जास्त तरुण-तरुणींनी या सुवर्णसंधीचा लाभ घेऊन आपल्या उज्वल भविष्याची पायाभरणी करावी."
>
> — शंकर जगताप (आमदार - चिंचवड विधानसभा)

# 'शिवरूद्र शंभुराजे' च्या पहिल्या महानाट्याला शिवशंभूप्रेमींची भरभरून दाद

*पिंपरी चिंचवड महानगरपालिका आयोजित छत्रपती संभाजी महाराज विचार प्रबोधन पर्वाला उत्साहात सुरुवात*

**पिंपरी (दै. संध्या)**



'छत्रपती शिवाजी महाराज की जय...', 'छत्रपती संभाजी महाराज की जय...', 'जय भवानी, जय शिवाजी....' च्या जयघोषात आणि स्वराज्याच्या इतिहासाची साक्ष देणाऱ्या नेत्रदीपक दृश्यांनी चिंचवड येथील छत्रपती संभाजीनगर परिसरातील बर्ड व्हॅली उद्यानाच्या मागील बाजूस असलेल्या मोकळ्या मैदानाचा परिसर अक्षरशः दुमदुमून गेला. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने छत्रपती संभाजी महाराज विचार प्रबोधन पर्वा'अंतर्गत सादर करण्यात आलेल्या 'शिवरूद्र शंभुराजे' या भव्य महानाट्याच्या पहिल्या प्रयोगाला शिवप्रेमींनी प्रचंड प्रतिसाद देत मोठ्या संख्येने उपस्थिती लावली.

या प्रबोधन पर्वाचे उदघाटन उपमहापौर शर्मिला बाबर,आयुक्त डॉ.विजय सुर्यवंशी यांच्या हस्ते तर माजी महापौर मंगला कदम, स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे, सत्तारूढ पक्षनेते प्रशांत शितोळे, विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर, तसेच क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती सभापती कैलास कुटे यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडले यावेळी नगरसदस्य तुषार हिंगे, कुशाग्र कदम, मंदार देशपांडे, नगरसदस्या अनुराधा गोरखे, सुप्रिया चांदगुडे, योगिता नागरगोजे,जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक, शिव शंभू शाहू जन्मोत्सव समितीचे अध्यक्ष संजय कुरबेट्टी, उपाध्यक्ष हेमा पारिसकर, संभाजी ब्रिगेडचे प्रविण कदम, सतीश काळे यांच्यासह नागरिक उपस्थित होते.

यावेळी विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर म्हणाले, त्यागाचे सर्वात मोठे उदाहरण 'छत्रपती संभाजी महाराज त्यांच्या जयंतीनिमित्त भव्य-दिव्य सोहळा शहरात होत आहे ही अभिमानाची बाब आहे. असे आवाहन देखील त्यांनी केले.

छत्रपती संभाजी महाराजांचे बलिदान व प्रेरणा अशा महोत्सवांमधून लोकांपर्यंत पोहोचत आहेत,या कार्यक्रमाला नागरिकांचा प्रतिसाद खूप चांगला मिळत आहे. छत्रपती संभाजी महाराज यांच्या जीवनावर आधारित ऐतिहासिक प्रसंग अनुभवण्यासाठी शहरातील नागरिकांनी या महानाट्यास उपस्थित रहावे असे आयुक्त डॉ. विजय सुर्यवंशी म्हणाले.

उदघाटन कार्यक्रमानंतर छत्रपती संभाजी महाराज यांच्या जीवनावर आधारित शिवस्पर्श शिवसह्याद्री प्रतिष्ठान निर्मित, इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड होल्डर, विनय चंद्रकांत दाभाडे लिखित, दिग्दर्शित व प्रतिक चंद्रकांत दाभाडे सह-दिग्दर्शित भव्य महानाट्याच्या प्रयोगाला सुरुवात झाली. या प्रयोगात सुमारे २०० हून अधिक कलाकारांनी सहभाग नोंदवत छत्रपती संभाजी महाराज यांच्या जीवनातील महत्त्वपूर्ण ऐतिहासिक प्रसंग जिवंत केले. घोडे, उंट, भव्य नेपथ्य, पारंपरिक वेशभूषा, अत्याधुनिक प्रकाशयोजना, प्रभावी ध्वनीसंयोजन आणि नेत्रदीपक आतषबाजीच्या सहाय्याने उभारण्यात आलेल्या प्रत्येक दृश्याला उपस्थित प्रेक्षकांनी टाळ्यांचा कडकडाट करत उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

महानाट्यात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनातील प्रसंग, राज्याभिषेक तसेच छत्रपती संभाजी महाराज यांचा जन्म, बालपण, राज्याभिषेक व संघर्षमय जीवनप्रवास आणि स्वराज्य रक्षणासाठी दिलेले बलिदान यांचे प्रभावी चित्रण करण्यात आले आहे, या महानाट्यातून उपस्थितांना हे प्रसंग अनुभवायला मिळाले. कार्यक्रमस्थळी नागरिकांसाठी सुयोग्य बैठक व्यवस्था, अग्निशामक वाहन, रूग्णवाहिका, सुरक्षा व्यवस्था तसेच आवश्यक नागरी सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या. दरम्यान, 'शिवरूद्र शंभुराजे' या महानाट्याचे आणखी दोन प्रयोग ११ व १२ मे २०२६ रोजी याच ठिकाणी सायंकाळी ६.३० वाजता सादर करण्यात येणार असून,नागरिकांनी या भव्य महानाट्य प्रयोगाचा लाभ घ्यावा, असे आवाहन महानगरपालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

# सोसायट्यांमधील झाडांच्या छाटणीसाठी विशेष पॉलिसी बनवणार : आमदार जगताप

**सोसायटीधारकांचा आर्थिक भार वाचणार; आयुक्त-आमदार बैठकीत मोठा निर्णय**

**पिंपरी (दै. संध्या)**

**■ ताथवडे-वाकडची वाहतूक कोंडी फोडण्यासाठी 'फ्री लेफ्ट' आणि रस्ते रुंदीकरणाचे थेट आदेश**



पिंपरी चिंचवड शहरातील गृहनिर्माण सोसायट्यांमध्ये राहणाऱ्या लाखो नागरिकांना दिलासा देणारा एक अत्यंत महत्त्वाचा निर्णय घेण्यात येणार आहे . सोसायट्यांच्या आवारातील झाडांच्या छाटणीसाठी (ट्रीमिंग) महापालिकेकडून आता एक स्वतंत्र 'विशेष पॉलिसी' (धोरण) तयार केली जाणार आहे. यामुळे या छाटणीचा संपूर्ण आर्थिक भार आता सोसायट्या आणि पर्यायाने नागरिकांवर पडणार नाही असे आमदार शंकर जगताप यांनी सांगितले.

शहरातील पायाभूत सुविधा, वाहतूक कोंडी, पर्यावरण आणि नागरी सुविधांच्या संदर्भात सोमवारी महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्या समवेत पार पडलेल्या अत्यंत महत्त्वाच्या उच्चस्तरीय बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. या बैठकीला अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम, अतिरिक्त आयुक्त विक्रांत बगाडे, उपायुक्त अण्णा बोदडे, शहर अभियंता मनोज सेठीया, मुख्य अभियंता संजय कुलकर्णी, सह शहर अभियंता प्रमोद ओंभासे, बापू गायकवाड, प्रेरणा सिनकर आणि अजय सूर्यवंशी यांसह विविध विभागांचे प्रमुख उपस्थित होते.

सध्या महापालिकेच्या माध्यमातून केवळ सार्वजनिक जागांवरील झाडांची छाटणी केली जाते, मात्र खाजगी सोसायट्यांच्या आवारातील झाडांच्या छाटणीसाठी कोणतीही आर्थिक किंवा प्रशासकीय तरतूद नव्हती. परिणामी, पावसाळ्यापूर्वी किंवा एरवी झाडांची छाटणी करताना सोसायट्यांना स्वतःच्या खिशातून मोठा खर्च करावा लागत असे. आता नवीन पॉलिसीमुळे नागरिकांची या आर्थिक त्रासातून मुक्तता होणार आहे. यासोबतच, पर्यावरण संवर्धनाचा भाग म्हणून शहरातील निर्माणाधीन (अंडर-कन्स्ट्रक्शन) रस्त्यांचे काम पूर्ण होण्यापूर्वी रस्त्याच्या कडेला प्रत्येक दोन पोलच्या मध्ये किमान एक झाड लावणे बंधनकारक करण्याचे निर्देश आमदार जगताप यांनी दिले आहेत.

दरम्यान रेडी मिक्स कॉंक्रीट प्लांटमुळे होणाऱ्या वायुप्रदूषणावर नियंत्रण मिळवण्यासाठी पीसीएमसी, पीएमसी, एमपीसीबी आणि जिल्हाधिकारी यांची संयुक्त बैठक आयोजित करण्याचे निर्देश दिले आहेत. आरएमसीबाबत तयार करण्यात आलेल्या एसओपीचे उल्लंघन करणाऱ्या तब्बल १५० बांधकाम व्यावसायिकांना नोटिसा बजावण्यात आल्या आहेत. यापुढे पर्यावरण मंजुरीच्या अटी-शर्तींमध्येच आरएमसीच्या नियमांचा समावेश केला जावा अशी सूचना आमदार जगताप यांनी केली आहे. शहरातील सार्वजनिक शौचालयांचा सर्व्हे सुरू करण्यात आला असून, आगामी प्रारूप विकास आराखड्यात दर्जेदार शौचालयांसाठी राखीव जागा ठेवली जाणार आहे. विशेषतः महिलांसाठी "शी" शौचालयांची उभारणी करण्यासाठी सीएसआर फंडातून तरतूद करावी. तसेच, पिंपळे सौदागर येथे पोस्ट ऑफिससाठी जागा राखीव ठेवण्यात यावी अशी सूचना देखील करण्यात आली.

आगामी पावसाळा लक्षात घेता, शहरातील सर्व नाले आणि ओढ्यांची सफाई तातडीने पूर्ण करण्याचे निर्देश दिले आहेत. नाले व ओढ्यांच्या पात्रातील बेकायदेशीर बांधकामे व अतिक्रमणे हटवण्याचे थेट आणि पूर्ण अधिकार क्षेत्रीय कार्यालयातील अधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत. तसेच काळेवाडी परिसरातील दूषित पाण्याच्या समस्येवर तातडीने उपाययोजना करण्याचे आदेश दिले आहेत. महापालिकेच्या सुमारे २,८०० कर्मचाऱ्यांना थेट आर्थिक लाभ मिळवून देणारी 'आश्वासित प्रगती योजना' व 'सेवांतर्गत योजना' लागू करण्याच्या सूचना प्रशासनाला देण्यात आल्या. यासोबतच, 'माझी लाडकी बहीण योजने'अंतर्गत रात्रंदिवस काम करून नाव नोंदणी करणाऱ्या कर्मचाऱ्यांना विशेष प्रोत्साहन भत्ता दिला जाणार आहे. तसेच, पुनावळे येथील जिल्हा परिषद शाळेचे महापालिकेकडे हस्तांतरण करण्याची प्रक्रिया जलद केली जाईल असे ही आमदार जगताप यांनी सांगितले.

बैठकीत शहरातील वाहतूक कोंडी फोडण्यासाठी तात्काळ आणि धडक उपाययोजना करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. कस्पटे वस्ती रस्ता रुंदीकरणासह महत्त्वाच्या चौकांमध्ये 'फ्री लेफ्ट' मार्ग मोकळे करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. ज्यामुळे वाहनचालकांचा प्रवासाचा वेळ वाचेल. पिंपळे सौदागर येथील स्वराज्य चौक अंडरपास आणि पीके चौक येथील उड्डाणपुलासाठी तातडीने निधीची तरतूद करण्याची सूचना करण्यात आली आहे. याशिवाय महत्वाचे म्हणजे कल्पतरू चौक, आरके चौक आणि सांगवी फाटा येथे 'अर्बन स्ट्रीट' व स्मार्ट सिटीअंतर्गत करण्यात आलेल्या फुटपाथची रुंदी कमी करून रस्ता रुंद केला जाईल. वाहतूक कोंडी आणि अपघातप्रवण क्षेत्र शोधण्यासाठी वाहतूक पोलीस आणि मनपा आयुक्त यांची संयुक्त बैठक होऊन तात्काळ तोडगा काढला जाईल असेही आमदार शंकर जगताप यांनी सांगितले.

> "शहरातील सोसायट्यांमध्ये राहणाऱ्या नागरिकांना झाडांच्या छाटणीसाठी स्वतःच्या खिशातून मोठा आर्थिक भुर्दंड सोसावा लागत होता. हा जाचक खर्च वाचवण्यासाठी महापालिकेने विशेष आणि स्वतंत्र पॉलिसी तयार करावी, अशी सूचना मी प्रशासनाला केली आहे. यामुळे लाखो नागरिकांना दिलासा मिळेल. शहराचा विकास करताना पायाभूत सुविधांना गती देणे आणि सोबतच वाहतूक कोंडी, पर्यावरण संवर्धन व कर्मचाऱ्यांच्या कल्याणाचे प्रश्न मार्गी लावणे यालाच आमचे प्राधान्य आहे. आजच्या बैठकीत घेतलेल्या सर्व निर्णयांची तातडीने आणि कालबद्ध अंमलबजावणी करण्याचे आदेश प्रशासनाला दिले आहेत."
>
> — शंकर जगताप (आमदार, चिंचवड विधानसभा मतदारसंघ)

## थोडक्यात पण महत्वाचे...

### किसनराव गायकवाड यांचे निधन



भिगवण (दैनिक संध्या) : डिकसळ( ता.इंदापुर) येथील किसनराव कल्याण गायकवाड ( वय ८८) यांचे वृद्धापकाळाने सोमवारी निधन झाले.किसनराव गायकवाड हे सार्वजनिक बांधकाम विभागातुन २००१ साली सेवानिवृत्त झाले होते. आपल्या सेवेच्या तीस वर्षाच्या काळात पुणे सोलापूर राष्ट्रीय महामार्गावर मार्ग संरक्षक म्हणून इंदापूर तालुक्यातील हिंगणगाव ते दौंड तालुक्यातील पाटस या ९० किलोमीटरच्या अंतरावर कार्यरत होते. १९९२ साली तात्कालीन मुख्यमंत्री सुधाकरराव नाईक पुणे सोलापूर राष्ट्रीय महामार्गावरून पंढरपूर येथे जात असताना डाळज गावच्या हद्दीत आपल्या गाड्यांचा ताफा थांबवून भर उन्हात आपले कर्तव्य पार पाडत असलेल्या किसनराव गायकवाड यांचे कौतुक केले होते.१९७९ साली उजनी धरण झाल्यानंतर हत्तीच्या मस्तकाच्या काळ्याभोर जमिनी पाण्याखाली गेल्यानंतर किसनराव गायकवाड यांनी आपल्या चार भावंडांना आपले मामा गुलाबराव सकुंडे यांच्या मदतीने शासकीय सेवेत रुजू करून घेतले होते. त्यांच्या निधनाने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. त्यांच्या पाठीमागे पत्नी ,चार भावंडे मुलगा,पुतणे, सुना, नातू असा मोठा परिवार आहे. भिगवण पत्रकार संघाचे अध्यक्ष विजयकुमार गायकवाड हे त्यांचे पुतणे होत.

### उन्हाळी सुट्ट्यांसाठी सासवड आगारातून लांब पल्ल्यांच्या मार्गावर बस सेवा उपलब्ध

सासवड (दैनिक संध्या) : उन्हाळी सुट्टी गावी जाणाऱ्या नागरिकांच्या, प्रवाशांच्या सोयीसाठी सासवड आगारातून नाशिक, सोलापूर, अहमदपूर (लातूर), दादर, अक्कलकोट, आंबेजोगाई, धुळे, बोरीवली, नांदेड व गोंदवले आदी ठिकाणी बस सेवा सुरू करण्यात आली आहे. या बस सेवांसाठी महिला, ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग यांना नियमानुसार प्रवास भाड्यामध्ये सवलत मिळणार आहे. विविध मार्गांवर सुटणाऱ्या गाड्या व त्यांच्या वेळा पुढील प्रमाणे नाशिक साठी शिवाजीनगर मार्गे सकाळी ०५.३०, ०६.००, ०८.३०, ०९.३०, १०.३०, दुपारी ०१.०० सोलापूर स्वारगेट इंदापूर मार्गे सकाळी ०६.१५, ०७.१५, ०८.१५, ०९.१५ अहमदपूर स्वारगेट इंदापूर बार्शी लातूर मार्गे ०६.०० दादर ०६.३०, ०७.४५ अक्कलकोट मोरगाव बारामती इंदापूर मार्गे ०६.३० आंबेजोगाई स्वारगेट इंदापूर बार्शी मार्गे ०७.०० धुळे शिवाजीनगर नाशिक मार्गे ०७.३० जेजुरी बोरिवली ०९.३०, ११.०० नांदेड स्वारगेट इंदापूर लातूर मार्गे ०५.३० स्वारगेट सासवड गोंदवले ०८.३० याप्रमाणे बस सासवड बसस्थानकातुन प्रवाशांसाठी उपलब्ध होणार आहेत याशिवाय स्वारगेट सासवड फलटण पंढरपूर या मार्गावर सासवड आगाराच्या वतीने जादा बस सेवा उपलब्ध करुन देण्यात येणार असल्याची माहिती प्रभारी आगार प्रमुख मोहिनी ढेरे यांनी दिली. विविध लांब पल्ल्यांच्या मार्गावर थेट बससेवा उपलब्ध होणार असल्याने सासवड व तालुक्यातील प्रवाशांनी लाभ घ्यावा असे आवाहन पुरंदर बस प्रवासी संघाचे अध्यक्ष तानाजी सातव यांनी केले आहे. पंढरपूर बारामती फलटण सांगोला मंगळवेढा तसेच मोरगाव नीरा मार्गे जाणाऱ्या लांब पल्ल्यांच्या सर्व साध्या, जलद, निमआराम बसेस साठी सासवड पी एम पी बस स्थानकासमोरील थांबा अधिकृत बसथांबा म्हणून मान्यता देण्यात आली असून सासवड पर्यंतचे बसभगडे पीएमपी बस स्थानकापर्यंत ग्राह्य असणार आहे. प्रवाशांनी तिकीट मागताना सासवड पी एम टी स्टॅन्ड पर्यंत तिकीट मागावे. स्वारगेट सासवड मार्गावर असणारे अधिकृत प्रवास भाडे सासवड पीएमपी बस स्थानकापर्यंत मान्य असेल अशी ही माहिती तानाजी सातव यांनी यावेळी दिली.

### गुन्हे शाखेचा सन्मान

नारायणगाव (दैनिक संध्या) : मंचर परिसरातील थोरांदळे पाईनमळा येथे 31 मार्च 2026 रोजी दामोदर जयराम मिंडे (वय 62) या वयस्कर व्यक्तीचा खून करून सोन्याची अंगठी मोबाईल व रोख रक्कम असा सुमारे 29 हजार रुपयांचा ऐवज चोरट्यांनी लुटला होता. या गंभीर गुन्ह्याचा तपास करत असताना पोलिसांना त्याचा शोध लागत नव्हता. मात्र स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाकडून 100 हून अधिक सीसीटीव्ही फुटेज तपासण्यात आले. त्यातून संशयित आरोपींची माहिती मिळवत 5 एप्रिल 2026 रोजी पुणेवाडी परिसरात सापळा रचून कबीर उंबऱ्या काळे (वय 24,सध्या रा. पुणेवाडी,ता.पारनेर, जि.अहिल्यानगर आणि एका विधी संघर्षीत बालकाला पाठलाग करून ताब्यात घेतले. या आरोपींकडून गुन्ह्यात वापरलेली दुचाकी जप्त केली. या तपासा दरम्यान आरोपींकडून ओतूर,घोडेगाव,मंचर आणि दिंडोरी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील आणखी चार जबरी चोरीचे गुन्हेही उघडकीस आले. या गुन्ह्यांचा शोध घेण्यास स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक प्रमोद क्षीरसागर,महादेव शेलार यांच्यासह अभिजीत सावंत, दीपक साबळे,संदीप वारे, अक्षय नवले,राजू मोमीन,अतुल डेरे हनुमंत ढोबळे, योगेश रोडे आणि अजित पवार यांनी शोध लावल्यामुळे त्यांचा सत्कार करण्यात आला.

### पेन्शन योजना दिशाभूल करणारी : पडवळ

नारायणगाव (दैनिक संध्या) : महाराष्ट्र राज्य सरकारने ६ मे २०२६ रोजी राष्ट्रीय निवृत्तीवेतन प्रणाली (NPS) मध्ये सुधारणा करून नवीन सुधारित पेन्शन योजना (Revised NPS/UPS) जाहीर केली आहे. या योजनेवर कर्मचारी संघटनांकडून संमिश्र प्रतिक्रिया येत असून, काहींनी याला "फसवणूक" तर काहींनी "एक पाऊल पुढे" म्हटले आहे. संघटनेचे अध्यक्ष राहुल पडवळ यांनी शासनावर गंभीर आरोप करत या निर्णयाचा निषेध नोंदविला आहे. ज्या कर्मचाऱ्यांनी २० वर्षे किंवा त्याहून अधिक सलग सेवा पूर्ण केली आहे, त्यांना सेवानिवृत्तीच्या वेळेस मिळणाऱ्या शेवटच्या मूळ वेतनाच्या ५० टक्के रक्कम पेन्शन म्हणून मिळेल.या पेन्शनवर महागाई भत्ता (DA) लागू राहील.किमान१० ते २० वर्षांची सेवा असल्यास किमान ७,५०० रु.पेन्शनची हमी असेल. निवृत्तीनंतर ६० टक्के हिस्सा शासनाकडे जमा करण्याची अट आहे. तसेच गरजेपुटी स्वतःच्या खात्यातून 25% रक्कम काढलेल्या कर्मचाऱ्यांना ती रक्कम दहा टक्के व्याजासह परत भरण्याची अटही कठोर असल्याचे सांगण्यात आले. यावेळी पडवळ यांनी सांगितले की, दरमहा पगारातून दहा टक्के कपात होत असताना अनेक कर्मचारी निवृत्तीपूर्वीच निधन पावतात. अशावेळी त्यांचा निधी सुरक्षित राहण्याऐवजी शासन तो काढून घेण्याची भाषा करत आहे .त्यामुळे जुन्या पेन्शन योजनेचा अधिकार कर्मचाऱ्यांनाच मिळायला हवा असे स्पष्ट केले.

### कौटुंबिक वादातून पतीने केली पत्नी व मुलाला मारहाण



नारायणगाव (दैनिक संध्या): जुन्नर तालुक्यातील बोरी बुद्रुक येथे राहणाऱ्या कोरडे कुटुंबातील स्वाती मिलिंद कोरडे व मिलिंद कोरडे या 8 मे रोजी लग्नासाठी आळेफाटा येथे गेले होत्या. त्यावेळी त्यांचे पती मिलिंद दत्तात्रय कोरडे यांनी त्यांना दारूच्या नशेत चाळकवाडी येथे गाठून शिवीगाळ केली. त्यानंतर सायंकाळी स्वाती कोरडे आणि त्यांचा मुलगा सुमित हे घरी गेले असता तिथे पुन्हा मिलिंद कोरडे व स्वाती कोरडे यांच्यात वाद झाला.पती मिलिंद कोरडे यांनी हातातील कुऱ्हाडीच्या लाकडी दांड्यांनी पत्नी स्वाती हिला मारहाण केली. तसेच अथर्व योगेश याने पीव्हीसी पाईपने पाठीवर तर सासू विमल यांनी लाकडी काठीने मारहाण केली. याप्रकरणी फिर्यादी स्वाती कोरडे यांनी पती मिलिंद कोरडे,अथर्व कोरडे,सासू विमल कोरडे आणि आयुष कोरडे यांच्यावर आळेफाटा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सुरू आहे.

# येडगाव परिसरातील केबल चोरीप्रकरणी शेतकरी हतबल

नारायणगाव (दै. संध्या)



येडगाव धरण जलाशयात असलेल्या इंदिरानगर परिसरातील 40 कृषी विज पंपांच्या सुमारे आठ हजार फूट लांबीच्या केबल अज्ञात चोरट्यांनी आज पहाटेच्या सुमारास चोरून नेल्या. शेती पिकांना सिंचन करण्यासाठी कृषी पंपांना जोडणी करण्यासाठी नवीन केबल खरेदी कराव्या लागणार आहेत. यामुळे शेतकऱ्यांना एकूण सुमारे दहा लाख रुपयांचा आर्थिक भुर्दंड सहन करावा लागणार आहे. 8 फेब्रुवारी 2026 रोजी येथील खंडोबा माळ परिसरातील 40 कृषी पंपांच्या केबल चोरीला गेल्या होत्या. या चोरीचा तपास अद्याप लागला नसतानाच पुन्हा या भागात चोरीची दुसरी घटना झाली आहे.सातत्याने होत असलेल्या केबल चोरीमुळे शेतकरी हतबल झाले आहेत.

दरम्यान या प्रकरणी शेतकऱ्यांनी आज खासदार डॉ.अमोल कोल्हे, माजी आमदार अतुल बेनके, सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रवीण संपांगे यांची भेट घेऊन या दुष्टचक्रातून आमची सुटका करा. अशी विनवणी केली आहे.

येडगाव ग्रामपंचायत हद्दीतील इंदिरानगर, कैलासनगर, हांडे मळा, गणेशनगर, खंडोबाचे माळ, दोन देवळे परिसरात शेतकऱ्यांचे कृषी उपसा जलसिंचनेचे सुमारे चारशे कृषी पंप येडगाव धरण जलाशयात आहेत. सन 2022 पासून याच भागातील केबल उन्हाळ्यात धरण जलाशयाची पाणीपातळी कमी झाल्यानंतर चोरीला जात आहेत.

येडगाव धरणाची पाणी पातळी खालावल्याने केबल उघड्या पडल्या आहेत. या संधीचा फायदा घेत अज्ञात चोरट्यांनी आज पहाटेच्या सुमारास इंदिरानगर परिसरातील शिवाजी शिंदे,शिवाजी नेहरकर, अरुण भिसे,प्रकाश नेहरकर, दत्तात्रय भिसे,शरद नेहरकर, शरद काशीद, वैभव भिसे,गणेश भिसे,तुषार गावडे, दिलीप भोर,कैलास काशीद आदि शेतकऱ्यांच्या सुमारे 40 कृषी विज पंपांच्या सुमारे आठ हजार फूट लांबीच्या केबल चोरून नेल्या आहेत.एका कृषी पंपाला सुमारे दीडशे ते दोनशे मीटर लांबीची सुमारे 13 हजार रुपये किमतीची तांबे धातु असलेली केबल होती. यापूर्वीचा अनुभव पाहता केबल चोरीला जाऊ नये म्हणून शेतकऱ्यांनी केबल भूमिगत गाडल्या होत्या. तरीपण चोरट्यांनी डाव साधला.

या बाबत माजी सरपंच गुलाबराव नेहरकर, प्रकाश नेहरकर, शिवाजी नेहरकर म्हणाले टोमॅटो,कांदा व इतर भाजीपाला पिकांना बाजार नाहीत. तापमान वाढीमुळे पिकांना रोज सिंचन करावे लागत आहेत. शेतकरी आर्थिक विवंचनेत असताना केबल चोरीचा भुर्दंड सहन करावा लागत आहे. मात्र केबल चोरांचा कायमस्वरूपी छडा लावण्यात पोलिसांना यश येत नाही. केबल मधील तांब्याची तार काढून चोरटे भंगार व्यवसायिकांना विक्री करतात.दरम्यान आज घटनास्थळी भेट देऊन नारायणगाव पोलिसांनी पाहणी केली.

नारायणगावचे सहायक पोलीस निरीक्षक प्रवीण संपांगे यांनी घटनास्थळी भेट देऊन हा परिसर निर्जन आहे. याचा फायदा चोरटे घेत आहेत. परिसरात वारंवार केबल चोरी होत आहेत. यापूर्वी कांदळी परिसरातील केबल चोरट्यांना अटक करण्यात आली आहे. ग्रामपंचायतिने परिसरात सीसीटीव्ही कॅमेरे बसवल्यास चोरट्यांचा तपास करणे सोपे होईल. याबाबत संबंधितांना सूचना करण्यात आल्या आहेत.

## चिरनेर - कळंबूसरे रस्त्यावर जलवाहिनी फुटल्याने हजारो लिटर पाणी वाया



उरण (दै. संध्या)

उरण तालुक्यातील चिरनेर हायस्कूल नाक्याजवळ,चिरनेर - कळंबूसरे रस्त्यावर पुलाचे काम सुरु असलेल्या ठिकाणी काल सकाळी 6:45 वाजताचे सुमारास बांधपाडा - खोपटे ग्रामपंचायतीला पाणी पुरवठा करणारी जलवाहिनी फुटल्याने दोन तासात भर रस्त्यावर मोठ्या प्रमाणात पाण्याच्या प्रेशरणे कारंजा उडत राहिल्याने हजारो लिटर पाणी वाया गेले.कडक उन्हाळ्याच्या दिवसात कित्येक ठिकाणी पाण्याची वणवण सुरु असतांना या हेटवणे पाणी पुरवठा योजनेच्या मुख्य जलवाहिनीतून चिरनेर हायवे रोड येथून जोडलेली बांधपाडा - खोपटे गावाकडे पाणी पुरवठा करण्यासाठी साकरण्यात आलेली जलवाहिनी सकाळच्या सत्रात फुटल्याने खोपटे येथील रहिवाशांची उन्हाच्या तडाक्यातच पाण्याची पुरती गैरसोय झाली होती. फुटलेल्या जलवहिनीतून दोन तास स्वछ आणि निर्मळ असे पिण्याचे पाणी वाया जात असतांना रस्त्यावरील पादचारी आणि वाहनचालकांनी हे दृश्य समोर पाहत होते. परंतु पाण्याची विनाकारण होणारी नासाडी थांबविण्यासाठी येथील नागरिकांनी सहकार्य करून संबंधितांना कळवून वाया जाणारे पाणी बंद करून थांबविण्यात आले. मात्र सदरची जलवाहिनी बंद करून फुटलेली जलवाहिनी बांधपाडा ग्रामपंचायतीच्या वतीने प्लंबर आणि कामगारांनी युद्ध पातळीवर दुरुस्ती करून जोडण्यात आली. याशिवाय बंद करण्यात आलेला पाणी पुरवठाही सुरळीत करण्यात आल्याची माहिती ग्रामविकास अधिकारी राजेंद्र सातंगे यांनी दिली.

## चाकणला मर्सिडीज बेंज कंपनीतील बिबट्या अखेर पिंजऱ्यात जेरबंद

चाकण (दै. संध्या)

चाकण औद्योगिक वसाहतीतील मल्टिनॅशनल मर्सिडीज बेंज कंपनीमध्ये दोन दिवसापासून बिबट्या शिरला होता. त्याचे सीसीटीव्ही फुटेज आले होते. हा बिबट्या भक्षाच्या शोधात कंपनीच्या आवारात आल्याचे सीसीटीव्ही फुटेजमध्ये दिसून आल्यानंतर कर्मचारी, कामगार यामध्ये भीतीचे वातावरण पसरले होते. हा बिबट्या कंपनीत काल सायंकाळी साडेसातच्या सुमारास पिंजऱ्यात जेरबंद झाला.अशी माहिती वनपरिक्षेत्र अधिकारी संतोष कंक यांनी दिली. र्सिडीज बेंज कंपनीतील प्रोडक्शन हाऊस गेल्या दोन दिवसापासून खबरदारीचा उपाय म्हणून पूर्णपणे बंद ठेवण्यात आले होते. कंपनीचा विस्तार मोठा असल्याने बिबट्या नेमका कुठे लपला हे शोधण्यासाठी वनविभागाला मोठी कसरत करावी लागली. हे रेस्क्यू ऑपरेशन यशस्वी करण्यासाठी वनविभाग, रेस्क्यू चॅरिटेबल ट्रस्ट, वाईल्ड लाईफएस ओएस यांनी समन्वयाने बिबट्याला अखेर जेरबंद केले. भुकेने व्याकुळ झालेला बिबट्या भक्षाच्या शोधात असताना पिंजऱ्यात बिबट्या जेरबंद झाला. हा बिबट्या पूर्ण वाढ झालेला नर आहे. त्याचे वय अंदाजे तीन ते चार वर्षे आहे.

## निर्जळ ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे व लाईट बसवणं अत्यावश्यक

कोरेगावमुळ (दै. संध्या)

मोठ्या प्रमाणावर नागरिकरण वाढत आहे तसेच कोरेगावमुळचे क्षेत्रफळ ही मोठ आहे भविष्याच्या सुरक्षेच्या दृष्टीने जिथं गरज आहे तिथे सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात यावे व जिथं गरज आहे तिथे लाईट ही बसवणं गरजेचे आहे यासाठी सामाजिक संस्था किंवा उद्योजक मंडळी पुढं आलं पाहिजे या गोष्टी लोकसहभागातूनच मार्गी लावले जातात. सार्वजनिक ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे असल्याने गुन्हेगार गुन्ह्या करण्यापूर्वी दोनदा विचार करतात, कारण त्यांना भीती असते की ते कॅमेऱ्यात कैद होतील. तसेच एखादा गुन्हा (चोरी, दरोडा, तोडफोड) घडल्यास, सीसीटीव्ही फुटेज तपास आणि गुन्हेगारांची ओळख पटवण्यासाठी मौल्यवान पुरावा ठरते. व वाहतूक कोंडी किंवा अपघातांच्या घटनांवर लक्ष ठेवण्यासाठी सीसीटीव्ही अत्यंत उपयुक्त आहेत. यामुळे वाहतूक पोलीस नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवरही कारवाई करु शकतात अशी माहिती उरुळी कांचन पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सचिन वांगडे यांनी उरुळी कांचन पोलीस ठाण्याच्या हद्दीत येणाऱ्या ग्रामपंचायत कोरेगावमुळ मध्ये कायदा सुव्यवस्था राखण्यासाठी आढावा बैठक घेण्यात आली होती यावेळी वरील मार्गदर्शन केले. यावेळी ग्रामपंचायत सरपंच राधिका संतोष काकडे, पंचायत समितीचे सदस्य कृषीराज चौधरी, पोलीस पाटील वर्षा सचिन कड, तंटामुक्तीचे अध्यक्ष मानसिंग कड, ग्रामपंचायत सदस्या मनिषा कड, माजी सरपंच विठ्ठल शितोळे, ग्रामपंचायत सदस्य दत्तात्रय काकडे, ग्रामविकास अधिकारी स्वाती राजगुरु, माजी सरपंच प्रमोद बोधे, उरुळी कांचन पतसंस्थेचे संचालक अशोक सावंत, प्रविण शितोळे, कचरु कड, नितीन कड, राजाराम भंडारे, चंद्रशेखर शितोळे, दिलीप शितोळे, सचिन कड, संतोष काकडे, सुनिल सस्ते आदी ग्रामस्थ, महिला, ग्रामपंचायत क्लार्क विजय मोरे, चक्रधर ताठे उपस्थित होते.

## मान्सूनपूर्व तयारीचा जिल्हाधिकाऱ्यांनी घेतला सविस्तर आढावा

भिवंडी (दै. संध्या)



सर्व यंत्रणांनी समन्वयाने काम करावे : जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ

आगामी पावसाळ्यात जिल्ह्यात कोणतीही दुर्घटना होऊ नये, यासाठी सर्व शासकीय यंत्रणांनी आतापासूनच सतर्क राहून समन्वयाने पूर्वतयारी करावी. जिल्ह्याचा आपत्ती व्यवस्थापन आराखडा चोख असावा आणि आपत्कालीन स्थितीत तत्काळ मदतीसाठी 'आपदा मित्रां'ची संख्या वाढवावी, असे निर्देश ठाण्याचे जिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे अध्यक्ष डॉ.श्रीकृष्ण पांचाळ यांनी दिले आहेत.

जिल्हाधिकारी कार्यालय आणि जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण,ठाणे यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'मान्सूनपूर्व तयारी आढावा बैठक २०२६' समिती सभागृहात संपन्न झाली, त्याप्रसंगी ते बोलत होते.

या बैठकीस जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रणजीत यादव, अपर जिल्हाधिकारी हरिश्चंद्र पाटील, निवासी उपजिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. संदीप माने, उपजिल्हाधिकारी सर्जेराव मस्के-पाटील, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी डॉ. अनिता जवंजाळ यांच्यासह विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

यावेळी बोलताना ते म्हणाले की, सार्वजनिक बांधकाम विभागाने पावसाळ्यापूर्वी जिल्ह्यातील सर्व धोकादायक पूल, साकव आणि जुन्या इमारतींचे ऑडिट करावे. जलसंपदा विभागाने धरणांची प्रत्यक्ष पाहणी करून तांत्रिक अहवाल सादर करावा. राष्ट्रीय महामार्ग आणि सार्वजनिक बांधकाम विभागाने मान्सून काळात दरडी कोसळण्याच्या घटना लक्षात घेऊन प्रमुख घाटांमध्ये जेसीबी, पोकलेन आणि डंपरची कायमस्वरूपी व्यवस्था करावी.

डॉ.पांचाळ यांनी आपत्कालीन परिस्थितीत यंत्रणांची गतिशीलता तपासण्यासाठी अग्निशमन दल, पोलीस आणि आरोग्य विभागाने प्रत्येक तालुक्यात रंगीत तालीम घ्यावी. पावसाळ्यात उद्भवणाऱ्या साथीच्या रोगांचा प्रसार रोखण्यासाठी आरोग्य विभागाने औषध साठा आणि वैद्यकीय पथके सज्ज ठेवावीत अशा सूचना देवून आपत्ती निवारणासाठी आवश्यक साधनसामुग्रीसाठी जिल्हा नियोजन समितीच्या निधीतून अनुदान उपलब्ध करून दिले जाईल,असे स्पष्ट केले.

जिल्हाधिकारी डॉ. पांचाळ यांनी यावेळी दरडप्रवण गावे, पूरप्रवण क्षेत्रे, नदीतील गाळ काढणे, औद्योगिक क्षेत्रातील सुरक्षा आणि शोध-बचाव साहित्याची उपलब्धता यांचा सविस्तर आढावा घेतला.

निवासी उपजिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.संदीप माने यांनी संगणकीय सादरीकरणाद्वारे आपत्ती व्यवस्थापन आराखड्याची माहिती दिली. सर्व उपविभागीय अधिकारी आणि तहसीलदारांना आपापल्या स्तरावर नियंत्रण कक्ष तातडीने स्थापन करण्याच्या सूचनाही यावेळी देण्यात आल्या.

# पत्रकार उत्कर्ष समितीचा वर्धापन दिन व पुरस्कार सोहळा संपन्न

पनवेल (दै. संध्या)



पत्रकारिता क्षेत्रातील कार्याला प्रेरणा देणारा आणि विविध क्षेत्रातील कर्तृत्ववान व्यक्तींना गौरविणारा पत्रकार उत्कर्ष समिती, महाराष्ट्र राज्य यांचा १० वा वर्धापन दिन व राज्यस्तरीय पुरस्कार सोहळा २०२६ सोमवार दिनांक ११ मे रोजी पनवेल येथील आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात अत्यंत दिमाखदार आणि उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. कार्यक्रमाची सुरुवात "यत्र नार्यस्तु पूज्यन्ते रमन्ते तत्र देवताः" या उक्तीनुसार पनवेल महानगरपालिकेच्या महिला व बालकल्याण समितीच्या सभापती सौ.ममता प्रीतम म्हात्रे,महिला उत्कर्ष समितीच्या प्रदेश अध्यक्षा डॉ. स्मिता अजय पाटील, उपाध्यक्ष सौ. आरती पाटील, सचिव ॲड. एम. दिव्या लोकरे तसेच इतर मान्यवर महिलांच्या शुभहस्ते दीपप्रज्वलन करून झाले. त्यानंतर सुमधुर आवाजात गणेश वंदना सादर करण्यात आली. पुढे “जय जय महाराष्ट्र माझा, गर्जा महाराष्ट्र माझा…” या महाराष्ट्र गीताने वातावरण भारावून गेले. गायक अलंकार भोईर व विश्वनाथ गायकवाड यांच्या सादरीकरणाने उपस्थितांच्या मनात अभिमानाची भावना जागृत झाली. पत्रकार उत्कर्ष समितीचे प्रदेश उपाध्यक्ष दिवंगत राम जाधव यांना यावेळी भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. तसेच समितीतर्फे त्यांच्या पत्नी सौ. निशा जाधव यांचा माहेरवाशिणीचा सन्मान साडी-चोळी देऊन करण्यात आला. या कृतीतून पत्रकार उत्कर्ष समिती आपल्या सहकाऱ्यांना कधीही वाऱ्यावर सोडत नाही, तर त्यांच्या पाठीशी सदैव ठामपणे उभी राहते, हे अधोरेखित झाले. कार्यक्रमात पत्रकार उत्कर्ष समितीच्या महिला व पुरुष सदस्यांना ओळखपत्रांचे वितरण करण्यात आले. यानंतर “पत्रकार उत्कर्ष समिती वर्धापन दिन व पुरस्कार सोहळा स्मरणिका २०२६” चे मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. यानंतर विविध क्षेत्रातील मान्यवरांना राज्यस्तरीय पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. यामध्ये आदर्श सेवाव्रती पुरस्कार आर्या अजय देशमुख व डॉ. दिपाली उमाळे, लोककला गौरव पुरस्कार दत्ता हरी भोईर व दिगंबर धर्मा कोळी, समाजरत्न पुरस्कार गजानन देशमुख, आदर्श पत्रकार पुरस्कार गणेश राऊत व राजन देसाई, आदर्श शिक्षक पुरस्कार ज्योती वाघ व सुनील दरवडा, साहित्यरत्न पुरस्कार वृषाली टाकले व सरोज अंदणकर, आदर्श कीर्तनकार पुरस्कार ह.भ.प. नकुल महाराज भोईर व ह.भ.प. विक्रम महाराज थोरवे, उत्कृष्ट छायाचित्रकार पुरस्कार शंकर शिंदे, आदर्श संस्था पुरस्कार स्नेहज्योत संस्था (मुंबई) तसेच कर्तव्यदक्ष अधिकारी पुरस्कार विजयकुमार राठोड यांना प्रदान करण्यात आले. तसेच “पंचज्योती सन्मान” या विशेष राज्यस्तरीय पुरस्काराने पाच मानकरी महिलांचा गौरव करण्यात आला. ॲड. अनिशा फणसळकर यांना “न्यायज्योत”, मीना घोडविंदे यांना “सेवाज्योत”, मोनिका शिंपी यांना “गिरीजन उद्धार ज्योत”, रेखा पाटील यांना “श्रृंगार ज्योत” आणि समता ठाकूर यांना “ज्ञानज्योत” गौरव पुरस्कार देण्यात आले. कार्यक्रमास पनवेल महानगरपालिकेचे विरोधी पक्षनेते अरविंद म्हात्रे तसेच शिवसेना (शिंदे गट) पनवेल तालुका अध्यक्ष परेश पाटील यांनी प्रमुख उपस्थिती लावली. त्यांनी आपल्या मनोगतातून पत्रकार उत्कर्ष समितीच्या कार्याचे कौतुक करत अशा उपक्रमांची समाजाला गरज असल्याचे मत व्यक्त केले. कार्यक्रमाची रंगत वाढविण्यासाठी लोककलावंत दत्ता हरी भोईर यांच्या “आई एकविरा सांस्कृतिक कलामंच”च्या टीमने कोळीगीते व बहारदार लावणी सादर करत प्रेक्षकांचे मन जिंकले. या सादरीकरणामुळे संपूर्ण सभागृहात जल्लोषाचे वातावरण निर्माण झाले.

कार्यक्रमाचे निवेदन प्रा. अक्षय पाटील (पेण) व पंडित सर (उरण) यांनी अत्यंत प्रभावी व सुरेख शैलीत केले. त्यांच्या निवेदनामुळे कार्यक्रमाची पकड शेवटपर्यंत टिकून राहिली. या यशस्वी सोहळ्यामागे पत्रकार उत्कर्ष समितीचे सर्वेसर्वा अध्यक्ष डॉ. अशोक म्हात्रे यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांच्या संपूर्ण टीममधील पदाधिकारी, तसेच पत्रकार बंधू-भगिनींनी दिलेला मोलाचा सहभाग अत्यंत महत्त्वाचा ठरला. सर्वांच्या एकत्रित प्रयत्नांमुळेच हा भव्य कार्यक्रम यशस्वीरित्या पार पडला. एकूणच, पत्रकार उत्कर्ष समितीचा हा वर्धापन दिन व पुरस्कार सोहळा केवळ सन्मानाचा नव्हे, तर प्रेरणा देणारा, समाजकार्याला चालना देणारा आणि सांस्कृतिक समृद्धीचा उत्सव ठरला. उपस्थित मान्यवर, पुरस्कारार्थी आणि प्रेक्षकांच्या उत्स्फूर्त प्रतिसादामुळे हा सोहळा संस्मरणीय ठरला.



दखखनच्या पठाराला कोकणाच्या किनाऱ्यापासून वेगळं करणारी सह्याद्री पर्वतरांग ही जणू निसर्गाने उभी केलेली अभेद्य भिंतच. पण माणूस भिंतींना भेदण्यासाठीच मार्ग शोधत आला आहे. या भिंतीला भेदून तयार झालेले घाट म्हणजे त्या जिद्दीचा साक्षीदार. त्यापैकी भोर घाट हा सर्वात महत्त्वाचा, ऐतिहासिक आणि सतत वापरात राहिलेला मार्ग. आज आपण काही तासांत पार करणारा पुणे–मुंबई प्रवास, पूर्वी दिवसांच्या प्रवासातून पूर्ण होत असे. या प्रवासाची कथा म्हणजे हजारो वर्षांच्या बदलत्या काळाची, बदलत्या तंत्रज्ञानाची आणि बदलत्या गरजांची कहाणी आहे.

# पुणे–मुंबई : सातवाहनांच्या पायवाटेपासून ‘कनेक्टिंग लिंक’पर्यंतचा प्रवास



**सातवाहन काल : व्यापार, संस्कृती आणि घाटवाटा**

सातवाहन कालात सह्याद्री ओलांडण्याची गरज प्रामुख्याने व्यापारामुळे निर्माण झाली. कोकण किनाऱ्यावरील बंदरे.. सोपारा, कल्याण, चौल ही परदेशी व्यापाऱ्यांसाठीची प्रवेशद्वार होती. रोमन साम्राज्याशीही व्यापार होत असल्याचे पुरावे आजही जुन्नर, तेर इथे सापडल्याचे पुरावे तिथल्या वस्तूसंग्रहालयात पाहायला मिळतात. या बंदरांवर उतरलेला माल दख्खनमध्ये पोहोचवण्यासाठी घाटवाटा तयार झाल्या. त्या पायवाटा होत्या... रस्ता नव्हता; पण मार्ग होता.

व्यापारी काफिले, जनावरे, आणि माणसे या घाटातून प्रवास करत असत. या प्रवासात धोके होते... वन्य प्राणी, दरोडेखोर, आणि कठीण भूप्रदेश. तरीही हा मार्ग जिवंत राहिला कारण तो गरजेचा होता. या मार्गातून केवळ वस्तूंची देवाणघेवाण झाली नाही, तर संस्कृती, भाषा, धर्म आणि विचारही एका प्रदेशातून दुसऱ्या प्रदेशात पोहोचला. सह्याद्री हा अडथळा नसून, संवादाचा पूल ठरला.

**मध्ययुगीन सत्ताकाळ**

यादव, बहामनी आणि आदिलशाही सत्तांच्या काळात या घाटमार्गांचा वापर वाढला. सत्तेला विस्तार हवा होता, आणि त्यासाठी जलद संपर्क आवश्यक होता. घाटवाटा अधिक वापरात आल्या, काही प्रमाणात सुधारल्या गेल्या. पण या मार्गाला खऱ्या अर्थाने सामरिक धार मिळाली ती छत्रपती शिवाजी महाराज यांच्या काळात.

सह्याद्रीच्या किल्ल्यांच्या जाळ्यातून मराठा सत्तेने घाटांवर नियंत्रण मिळवलं. लोहगड किल्ला आणि विसापूर किल्ला हे किल्ले भोर घाटावर नजर ठेवून होते. घाटातून होणारी प्रत्येक हालचाल या किल्ल्यांच्या देखरेखीखाली होती. त्यामुळे हा मार्ग केवळ व्यापाराचा राहिला नाही; तो संरक्षण, गुप्त हालचाली आणि युद्धनीतीचा महत्त्वाचा भाग बनला.

**ब्रिटिश कालखंड : पायवाट ते दगडी रस्ता**

१८१८ मध्ये इंग्रजांनी महाराष्ट्रावर सत्ता प्रस्थापित केल्यानंतर त्यांच्या दृष्टीने मुंबई–पुणे संपर्क अत्यंत महत्त्वाचा ठरला. व्यापार, प्रशासन आणि लष्करी हालचालींसाठी एक सक्षम रस्ता आवश्यक होता. त्यामुळे १८३० च्या दशकात भोर घाटात दगडी रस्ता बांधण्याचे काम हाती घेण्यात आले. हा रस्ता घोडागाडी आणि बैलगाडी चालेल असा होता. पुढे घाटातील वळणं सांभाळून, उतार-चढाव नियंत्रित करत हा रस्ता उभारण्यात आला. हा टप्पा म्हणजे पुणे–मुंबई मार्गाचा आधुनिक जन्म. हजारो वर्षांच्या पायवाटांना आता एक ठोस, अभियांत्रिकी पायाभूत सुविधा मिळाली.

**रेल्वेचा चमत्कार : सह्याद्रीतून लोहमार्ग**

ब्रिटिशांनी पुढे एक पाऊल टाकत 'ग्रेट इंडियन पेनीनसुला रेल्वे' (महान भारतीय द्वीपकल्प रेल्वे) मार्फत भोर घाटातून रेल्वेमार्ग उभारला. १८६३ मध्ये हा मार्ग सुरू झाला. हे काम त्याकाळी अत्यंत कठीण होते... डोंगर फोडणे, बोगदे खोदणे, पूल बांधणे... पण यामुळे सह्याद्री ओलांडण्याची संकल्पना बदलली. प्रवास जलद, नियमित आणि सुरक्षित झाला.

**स्वातंत्र्यानंतर : राष्ट्रीय महामार्ग ते द्रुतगती मार्ग**

स्वातंत्र्यानंतर भारताने या मार्गाचा विकास पुढे चालू ठेवला. पुणे–मुंबई मार्ग राष्ट्रीय महामार्गात विकसित झाला. पण वाढत्या वाहतुकीमुळे घाटातील वळणं आणि अपघातांची समस्या वाढू लागली. यावर उपाय म्हणून २००२ मध्ये मुंबई-पुणे द्रुतगती मार्ग सुरू करण्यात आला. हा भारतातील पहिला सहा पदरी द्रुतगती मार्ग ठरला. प्रवासाचा वेळ मोठ्या प्रमाणात कमी झाला आणि वेगाला नवे परिमाण मिळाले. पुण्याच्या विकासासाठीही मोठे सकारात्मक परिणाम झाले.

**औद्योगिक आणि आयटी विकासाला मोठी चालना**

पूर्वी मुंबई आणि पुणे यांच्यातील प्रवास वेळखाऊ होता. द्रुतगती मार्गामुळे हा वेळ मोठ्या प्रमाणात कमी झाला. त्यामुळे पुणे हे मुंबईला पर्यायी औद्योगिक आणि माहिती तंत्रज्ञान केंद्र म्हणून वेगाने पुढे आले. हिंजवडी आयटी पार्क, तळवडे, खराडी, मगरपट्टा, चाकण, रंजनगाव यांसारख्या भागांचा विकास झपाट्याने झाला. अनेक बहुराष्ट्रीय कंपन्यांनी पुण्यात गुंतवणूक केली.

**पुणे–मुंबई आर्थिक पट्टा**

द्रुतगती मार्गामुळे पुणे आणि मुंबई यांच्यातील आर्थिक संबंध अधिक मजबूत झाले. अनेक व्यावसायिक मुंबईत बैठक घेऊन त्याच दिवशी पुण्यात परत येऊ लागले. लॉजिस्टिक्स, वेअरहाउसिंग, वाहतूक आणि सेवा क्षेत्राचा विस्तार झाला. लोणावळा, खोपोली, तळेगाव या मधल्या पट्ट्यातही आर्थिक हालचाली वाढल्या.

**रिअल इस्टेटचा मोठा विस्तार**

द्रुतगती मार्गानंतर पुण्यातील बांधकाम व्यवसायाने प्रचंड वेग घेतला. हिंजवडी, वाकड, बाणेर, पिंपरी-चिंचवड, तळेगाव, रावेत, चाकण या भागांमध्ये मोठ्या प्रमाणावर गृहनिर्माण प्रकल्प उभे राहिले. मुंबईत काम करणाऱ्या काही लोकांनीही पुण्यात स्थायिक होण्यास सुरुवात केली.

**पर्यटन आणि विकेंड संस्कृती वाढली**

लोणावळा, खंडाळा, मावळ परिसर हा विकेंड पर्यटनाचा प्रमुख पट्टा बनला. पुणे आणि मुंबईतील लोकांचा परस्पर प्रवास वाढला. रिसॉर्ट्स, हॉटेल्स, फूड मॉल्स, अ‍ॅडव्हेंचर पर्यटन यांचा व्यवसाय वाढला.

**शिक्षण क्षेत्राचा विस्तार**

पुणे आधीपासून शिक्षणाचे केंद्र होते; पण द्रुतगती मार्गामुळे देशभरातील विद्यार्थ्यांसाठी पुणे अधिक सहज उपलब्ध झाले. खासगी विद्यापीठे, अभियांत्रिकी, व्यवस्थापन आणि आयटी शिक्षण संस्थांचा विस्तार झाला.

**पिंपरी-चिंचवडचा वेगवान शहरी विस्तार**

ऑटोमोबाईल उद्योग आणि द्रुतगती मार्ग यांचा एकत्रित परिणाम म्हणून पिंपरी-चिंचवड महानगराचा झपाट्याने विस्तार झाला. वाहन उद्योग, पुरवठा साखळी आणि पूरक उद्योग मोठ्या प्रमाणावर वाढले.

**पुण्याची जीवनशैली बदलली**

द्रुतगती मार्गानंतर पुणे अधिक “मेट्रो शहर” म्हणून विकसित होऊ लागले. मॉल संस्कृती, कॉर्पोरेट जीवनशैली, आयटी प्रोफेशनल्सची वाढ, उच्च उत्पन्न गट, नवीन टाउनशिप्स यामुळे शहराचा चेहरामोहरा बदलला

**‘कनेक्टिंग लिंक’ : आधुनिक अभियांत्रिकीचा शिखरबिंदू**

तरीही खंडाळा–लोणावळा घाटातील काही भाग अपघातप्रवण आणि वेळखाऊ राहिले. याच समस्येवर उपाय म्हणून ‘कनेक्टिंग (मिसिंग ) लिंक’ प्रकल्पाची संकल्पना पुढे आली. खोपोली ते कुसगाव या दरम्यानचे अंतर सुमारे ६ किलोमीटरने कमी करणे आणि प्रवासाचा वेळ सुमारे ३० मिनिटांनी घटवणे... हा या प्रकल्पाचा मुख्य उद्देश. सुमारे ६,६९५ कोटी रुपयांच्या खर्चातून हा प्रकल्प उभारण्यात आला.

या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाचे लोकार्पण देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आणि एकनाथ शिंदे, सुनेत्रा अजित पवार आणि मान्यवर मंत्री, सचिव यांच्या उपस्थितीत १ मे रोजी करण्यात आले. महाराष्ट्र दिनाच्या निमित्ताने हा मार्ग वाहनांसाठी खुला करण्यात आला, आणि सह्याद्री ओलांडण्याच्या इतिहासात एक नवा अध्याय सुरू झाला.

**पूल आणि बोगदे : अभियांत्रिकी कमाल**

या प्रकल्पात दोन समांतर बोगदे आणि दोन उंच पूल उभारण्यात आले आहेत. ८.९२ किलोमीटर लांबीचा बोगदा लोणावळा तलावाच्या सुमारे १८० मीटर खाली खोदण्यात आला आहे. तसेच १८४ मीटर उंच केबल-आधारित पूल (तारांच्या आधारावर उभारलेला पूल) हा अभियांत्रिकी कौशल्याचा उत्कृष्ट नमुना आहे. या प्रकल्पामुळे घाटातील धोकादायक वळणं टाळली जातील. वाहतुकीचा अखंड प्रवाह राखला जाईल. इंधनाची बचत, वेळेची बचत आणि अपघातांमध्ये घट... या सर्व बाबींचा थेट फायदा प्रवाशांना होणार आहे. अत्याधुनिक अग्निसुरक्षा, हवाप्रवाह व्यवस्था आणि डिजिटल नियंत्रण प्रणाली (संगणकीय नियंत्रण व्यवस्था) यामुळे हा मार्ग अधिक सुरक्षित बनला आहे.

**महाकाय प्रकल्पांची उभारणी : आधुनिक तंत्रज्ञान आणि आव्हानांची शर्यत**

महाराष्ट्रातील पायाभूत सुविधांचा चेहरामोहरा बदलणाऱ्या समृद्धी महामार्ग आणि मुंबई-पुणे मिसिंग लिंकसारख्या प्रकल्पांची उभारणी करणे हे केवळ इंजिनिअरिंगचे (अभियांत्रिकीचे) काम नसून ते एक मोठे प्रशासकीय आणि तांत्रिक आव्हान होते. हे प्रकल्प साकारताना निसर्गाची प्रतिकूलता आणि तांत्रिक क्लिष्टता यांचा मोठा सामना करावा लागल्याचे महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक अनिलकुमार गायकवाड यांनी अधोरेखित केले आहे.

**बोगद्यांचे जाळे आणि सुरक्षिततेचे कवच**

बोगद्यात केवळ रस्ता तयार करणे पुरेसे नव्हते, तर प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी तिथे एक स्वतंत्र यंत्रणा कार्यरत असते. बोगद्यात नैसर्गिक सूर्यप्रकाश नसतो आणि हवेची हालचाल मर्यादित असते. अशा वेळी, वाहनांच्या धुरामुळे कार्बन मोनॉक्साईडचे प्रमाण वाढू नये म्हणून तिथे शक्तिशाली 'जेट फॅन्स' (वेगवान हवेचे पंखे) बसवले जातात. तांत्रिक बिघाडामुळे एखादी गाडी बोगद्यात बंद पडली, तर सुरक्षिततेसाठी दर ३०० ते ५०० मीटरवर 'क्रॉस पॅसेज' (आंतरजोड मार्ग) आणि 'इमर्जन्सी पार्किंग बे' (आपत्कालीन वाहन थांबा) दिलेले असतात. 'ऑटोमॅटिक इन्सिडेंट डिटेक्शन सिस्टिम' (स्वयंचलित घटना शोध प्रणाली) मुळे एखादे वाहन थांबल्यास नियंत्रण कक्षाला तातडीने संदेश जातो, ज्यामुळे भ्रमणध्वनी सेवा नसतानाही मदत पोहोचू शकते.

**वाऱ्याचा वेग आणि केबल-स्टेड ब्रिजचे आव्हान**

कनेक्टिंग लिंक प्रकल्पांतर्गत लोणावळ्याजवळील दरीत जो भव्य केबल-स्टेड ब्रिज (ताराधारित पूल) उभारला गेला, तिथे सर्वात मोठे आव्हान वाऱ्याच्या वेगाचे होते. १८४ मीटर उंचीचे पायलान्स (आधारस्तंभ) आणि दरीतील प्रचंड वारा यामुळे पुलाच्या स्थिरतेवर परिणाम होऊ शकतो. हे लक्षात घेऊन, या पुलाचे डिझाइन (आराखडा) अशा प्रकारे करण्यात आले आहे की, ताशी शेकडो किलोमीटर वेगाने वाहणाऱ्या वाऱ्याचा दाब हा पूल सहज पेलू शकेल. या पुलाच्या पायाभरणीसाठी वापरण्यात आलेल्या एका 'फुटिंग'चे (पाया रचना) वजन तब्बल १०,००० टन आहे, जे या कामाच्या अवाढव्यतेची साक्ष देते.

**कामाची गती आणि सकारात्मक दृष्टीकोन**

गायकवाड एका वृत्त वहिनीला दिलेल्या मुलाखतीत म्हणाले, भूसंपादनावेळी झालेला विरोध असो किंवा घाटातील कठीण भौगोलिक परिस्थिती, या सर्व आव्हानांवर मात करण्यासाठी केवळ तांत्रिक ज्ञान पुरेसे नसते, तर जोखीम घेण्याची क्षमता आणि सकारात्मक दृष्टीकोन आवश्यक असतो. "आम्ही प्रतिकूलतेत संधी शोधली आणि त्यामुळेच आज महाराष्ट्र वेगवान रस्ते विकासाच्या जागतिक नकाशावर ठळकपणे दिसत आहे ." त्यांच्या या बोलण्यातून हे काम किती आव्हानात्मक होते याची जाणीव होते.

**जगातील सर्वाधिक रुंद भूमिगत बोगदा आणि गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड**

यशवंतराव चव्हाण द्रुतगती मार्गावरील कनेक्टिंग लिंक प्रकल्पातील बोगद्याची जगातील सर्वाधिक रुंद भूमिगत बोगदा म्हणून गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये नोंद झाली आहे. याबाबतचे गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डच्या प्रतिनिधींनी जागतिक विक्रमाचे प्रमाणपत्र मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे सुपूर्द केले. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री श्रीमती सुनेत्रा अजित पवार यांची प्रमुख उपस्थिती होती. गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डने या बोगद्याची रुंदी जगात सर्वाधिक २२.३३ मीटर अशी जाहीर केली.

या प्रकल्पाच्या कामात अनेक आव्हानांचा सामना करावा लागला. कोविड-१९ महामारी, मुसळधार पाऊस, कठीण खडक, वन परवानग्या... तरीही अभियंते आणि कामगारांनी चिकाटीने हे काम पूर्ण केले.

सातवाहनांच्या पायवाटेपासून सुरू झालेला हा प्रवास आज ‘कनेक्टिंग (मिसिंग) लिंक’पर्यंत पोहोचला आहे. सह्याद्री तसाच आहे... बदलल्या आहेत त्या त्याला ओलांडण्याच्या पद्धती. हा मार्ग आजही केवळ प्रवासाचा नाही... तो इतिहास, वर्तमान आणि भविष्य यांना जोडणारा जिवंत दुवा आहे... मिसिंग लिंकचा नवा थरारक अध्याय नव्या महाराष्ट्राच्या घडणीतील महत्त्वाचे पान ठरणार आहे ..!!

- युवराज पाटील
जिल्हा माहिती अधिकारी, पुणे

---




भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर लवकरच, १३ नोव्हेंबर १९४७ रोजी तत्कालीन केंद्रीय गृहमंत्री आणि उपपंतप्रधान सरदार वल्लभभाई पटेल सोमनाथ येथे गेले. समुद्रकिनारी उभे राहून त्यांनी मंदिराच्या भग्नावशेषांकडे गंभीर नजरेने पाहिले आणि एक प्रतिज्ञा केली सोमनाथ मंदिराच्या पुनर्निर्माणाची. तो क्षण म्हणजे भारताच्या सांस्कृतिक पुनर्जागरणाचा पहिला मोठा जागर; आपल्या सभ्यतेच्या स्वाभिमानाच्या सार्वजनिक पुनर्प्राप्तीचा क्षण होता.

ब्रिजेश सिंह, प्रधान सचिव तथा महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय

आणि आता, ११ मे रोजी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी सोमनाथ अमृत महोत्सवात उपस्थित राहून मंदिराच्या पुनर्स्थापित तेजात सहभाग घेतला, तेव्हा तीच प्रतिज्ञा पुन्हा नव्याने प्रज्वलित झाल्यासारखी वाटते. विशेष महापूजा, कुंभाभिषेक, ध्वजारोहण आणि लाखो भाविकांची उपस्थिती—हे सर्व मिळून भग्नावस्थेतून पुनर्निर्माणाकडे आणि पुनरुत्थानाकडे झालेल्या अखंड प्रवासाची घोषणा करतात. सरदार पटेलांच्या दूरदृष्टीपासून आजच्या आत्मविश्वासपूर्ण भारतापर्यंतचा हा अखंड सांस्कृतिक प्रवाह आहे. ही परंपरा, कालातीत आणि प्रेरणादायी, प्रत्येक पिढीला आपल्या वारशाचे जतन करण्याचे, ऐक्याचे रक्षण करण्याचे आणि भारताच्या सनातन आत्म्यावर दृढ श्रद्धा ठेवत समृद्ध, सुसंवादी आणि अखंड भविष्याकडे वाटचाल करण्याचे आवाहन करते.

अमेरिकन लेखक मार्क ट्वेन यांनी एकदा म्हटले होते की वाराणसी इतिहास, परंपरा आणि आख्यायिकांपेक्षाही प्राचीन आहे. पण कदाचित त्यांनी प्रभास पाटण आणि सोमनाथ पाहिले नसावे. भागवत पुराणानुसार, चंद्राला त्याचे सासरे दक्ष यांनी शाप दिला होता. त्या शापातून मुक्त होण्यासाठी चंद्राने याच स्थळी भगवान शिवाची आराधना केली आणि म्हणूनच ‘सोमनाथ—चंद्राचा अधिपती’ हे नाव उदयास आले.

मंदिर उभे राहण्याच्या खूप आधीपासून प्रभास पाटण हे मानवी वस्तीचे केंद्र होते. इ.स.पू. ३००० पासून येथे शेती आणि पशुपालन करणारी पूर्व-हडप्पा संस्कृती अस्तित्वात होती. सिंधू संस्कृतीच्या ऱ्हासानंतरही येथे जीवन टिकून राहिले. येथे सापडलेली रेड पॉलिश्ड वेअर मातीची भांडी आणि प्रारंभीच्या लिपींचे पुरावे याची साक्ष देतात. इसवी सनाच्या प्रारंभीच्या शतकांत हे एक साधे पण महत्वाचे नगर होते. समुद्रकिनाऱ्यालगत ७ ते १० मीटर खोलीवर सापडलेले दगडी नांगर प्राचीन सागरी व्यापाराचे साक्षीदार आहेत. हा किनारा केवळ निसर्गरम्य नव्हता, तर व्यापाराचे प्रवेशद्वार होता. येथे वस्ती आणि पवित्रता एकत्र वाढत गेली.

प्राचीन ग्रंथांमध्ये प्रभास क्षेत्राला तीर्थ म्हणून संबोधले आहे. महाभारतामध्ये भगवान कृष्णाच्या देहत्यागाचे स्थळ म्हणून प्रभासाचा उल्लेख आहे. दगडांनी अमरत्वाची भाषा शिकण्यापूर्वीच हा किनारा सांसारिक आणि आध्यात्मिक जगामधील एक पवित्र संगम होता. त्याची प्रारंभीची रूपे साधी—लाकूड आणि गवताची—असली, तरी ती मानवी मनाच्या दैवी शोधाची खूण होती.

इ.स. ६४९ च्या सुमारास वल्लभीच्या मैत्रक राजवटीत पहिले ऐतिहासिकदृष्ट्या प्रमाणित मंदिर उभे राहिले. पुढे ९व्या–१०व्या शतकात चालुक्य/सोलंकी काळात सोमनाथ हे काशी आणि उज्जैनच्या बरोबरीचे प्रमुख तीर्थस्थान बनले. पुरातत्त्ववेत्ता बी. के. थापर यांना १९५०–५१ मधील उत्खननात असलेले गर्भगृह, अंतराळ आणि सभामंडप यांचा समावेश असलेली भव्य रचना. पूर्वाभिमुख त्रि-अंग संधार प्रासादाचे अवशेष सापडले. लक्षुलीश मूर्तीच्या अवशेषांनी त्याची शैव परंपरा सिद्ध केली. विद्वान मंदिराच्या नेमक्या कालखंडावर मतभेद करतात, परंतु एक गोष्ट निर्विवाद आहे—सोमनाथ त्या काळात अत्यंत वैभवशाली झाले होते आणि लवकरच त्याची कठोर परीक्षा होणार होती.

ही परीक्षा अनेक लाटांमध्ये आली. इ.स. ७२५ मध्ये उमय्यद सेनापती जुनैद इब्न अब्द अल-रहमान अल-मुरीने हल्ला केला, जो पहिला इस्लामी आक्रमण मानला जातो. परंतु सर्वात मोठा आघात ८ जानेवारी १०२६ रोजी झाला, जेव्हा गझनीचा महमूद आपल्या पंधराव्या मोहिमेत सोमनाथावर चालून आला. शिवलिंग फोडण्यात आले, खजिना लुटण्यात आला. अल बिरुनी यांनी मंदिरातील संपत्तीचे वर्णन केले आहे. सोने, चांदी, मोती, रत्ने आणि गावांच्या महसुलातून जमा झालेली संपदा.

तथापि, पुरातत्त्वीय पुरावे दर्शवतात की मंदिराचे भग्नावशेष त्वरित एकत्र करून सुरक्षितपणे पुरले गेले. म्हणजेच, श्रद्धा उद्ध्वस्त झाली नव्हती. इ.स. १०३८ मध्ये गोव्याच्या कदंब राजाने सोमनाथाला भेट दिली, यावरून पूजा-अर्चा किंवा पुनरुज्जीवनाची भावना त्वरित पुन्हा उभी राहिल्याचे दिसते. मंदिराचे रूप तुटले, पण संस्कृतीचे चेतन कायम राहिले.

पुढील काळातही विध्वंस आणि पुनर्निर्माण यांचे चक्र सुरूच राहिले. इ.स. ११६९ मध्ये सोलंकी राजा कुमारपालाने पाचवे भव्य दगडी मंदिर उभारले. प्रभास पाटण येथील भद्रकाली मंदिरातील शिलालेखात त्याचा उल्लेख आहे.

त्यानंतर १२९९ मध्ये अलाउद्दीन खिलजीचा सेनापती उलुघ खानने मंदिर उद्ध्वस्त केले. स्थानिक रक्षक वाजा मालसुत आणि पदमल यांनी मंदिररक्षण करताना प्राण दिले. पुढे चुडासमा राजा महिपाल देव यांनी १३०८ मध्ये मंदिराचे पुनर्निर्माण केले आणि त्यांचा पुत्र खेंगाराने शिवलिंगाची पुनःप्रतिष्ठा केली.

यानंतर झफर खानने १३९५ मध्ये मंदिर उद्ध्वस्त करून तेथे जामा मशिद आणि प्रशासकीय ठाणे उभारल्याचे उल्लेख आहेत. पुढे महमूद बेगडा, पोर्तुगीज आक्रमक, आणि नंतर औरंगजेब यांच्या आदेशाने १६६५ आणि १७०६ मध्ये पुन्हा विध्वंस घडवून आणण्यात आला. पुजाऱ्यांची हत्या, मंदिर परिसरातील अपवित्र कृत्ये आणि संपूर्ण रचना पाडण्याचे प्रयत्न झाले; परंतु तीर्थक्षेत्र टिकून राहिले.

जरी मंदिर वारंवार उद्ध्वस्त झाले, तरी स्मृती कधीच नष्ट झाली नाही. इ.स. १७८२–८३ मध्ये पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर यांनी आपल्या वैयक्तिक निधीतून सोमनाथाजवळ नवीन दगडी मंदिर उभारले. हे मंदिर १९व्या आणि २०व्या शतकात सोमनाथच्या श्रद्धेचे केंद्र राहिले.

१८४२ मध्ये ब्रिटिश गव्हर्नर-जनरल लॉर्ड एलेनबरो यांनी अफगाणिस्तानातील महमूद गझनीच्या कबरीतून चंदनाचे दरवाजे आणले आणि ते सोमनाथचे मूळ दरवाजे असल्याचा खोटा दावा केला. हा ब्रिटिश सत्तेचा हिंदू समाजाचे समर्थन मिळवण्यासाठी आणि ब्रिटिश राजवटीला वैध ठरवण्यासाठी राजकीय प्रचार होता. हे दरवाजे नंतर आग्रा किल्ल्यात ठेवण्यात आले.

१९२२ मध्ये के.एम. मुन्शी यांनी सोमनाथचे भग्नावशेष पाहिले. त्यांनी त्या अनुभवाचे वर्णन “भक्ती आणि लज्जा” असे केले आणि याच अनुभवातून त्यांच्या मनात मंदिर पुनर्निर्माणाची आजीवन बांधिलकी निर्माण झाली.

स्वातंत्र्यानंतर सोमनाथच्या इतिहासाचे अंतिम पर्व सुरू झाले. ऑक्टोबर १९४७ मध्ये जुनागढ भारतात विलीन झाले आणि हिंदूंना मंदिर दुरुस्तीवरील बंदी हटवण्यात आली. १२–१३ नोव्हेंबर १९४७ रोजी सरदार पटेल, एन. व्ही. गाडगीळ आणि जामसाहेब यांनी भग्नावशेषांना भेट दिली. तेव्हा पटेलांनी जाहीर केले: “या शुभ नववर्षदिनी आम्ही सोमनाथ मंदिर पुनर्निर्माणाचा निर्णय घेतला आहे.”

जुनागढ प्रशासन आणि जामसाहेबांनी तत्काळ देणग्या दिल्या. सुमारे ५,००० एकर जमीन मंदिर, संस्कृत विद्यापीठ आणि सांस्कृतिक केंद्रासाठी राखीव ठेवण्यात आली.

यानंतर वाद निर्माण झाला. महात्मा गांधींच्या सल्ल्यानुसार सरकारने थेट निधी न देता लोकवर्गणीतून मंदिर उभारण्याचा निर्णय घेतला, जेणेकरून हे राज्यप्राय धार्मिक प्रकल्प न राहता लोकसहभागातून उभे राहिलेले सांस्कृतिक पुनरुत्थान ठरेल.

दरम्यान, तत्कालीन प्रधानमंत्री जवाहरलाल नेहरु यांनी या प्रकल्पाला ‘हिंदू पुनरुत्थानवाद’ म्हणून विरोध केला. परंतु सार्वजनिक देणग्यांमुळे प्रकल्प थांबवता आला नाही.

१५ डिसेंबर १९५० रोजी सरदार पटेल यांचे निधन झाले, तरी काम सुरूच राहिले. अखेर ११ मे १९५१ रोजी राष्ट्रपती राजेंद्र प्रसाद यांच्या हस्ते प्राणप्रतिष्ठा करण्यात आली. सोमपुरा शिल्पकारांनी बांधलेल्या मारू-गुर्जर शैलीतील मंदिरात नवीन ज्योतिर्लिंगाची स्थापना झाली. शतकानुशतके कुजबुजत राहिलेली प्रतिज्ञा अखेर दगडात साकार झाली. नेहरू या समारंभाला उपस्थित नव्हते.

आज सोमनाथ हे केवळ पर्यटनस्थळ किंवा धार्मिक प्रतीक नाही; ते दगड आणि गाळात लिहिलेले भारतीय संस्कृतीचा इतिहासग्रंथ आहे. त्याची खरी ओळख अखंड वैभवात नसून प्रत्येक विध्वंसानंतर पुन्हा उभे राहण्याच्या मानवी निर्णयात आहे.

त्याच्या पायाभूत थरांमध्ये हडप्पाकालीन वसाहती, प्राचीन व्यापारी आणि शांतीच्या शोधात आलेले भक्त सामावलेले आहेत. प्रत्येक पुनर्निर्माण—मैत्रक राजे, सोलंकी सम्राट, मराठा राण्या किंवा नवस्वतंत्र भारत यांना “ही समाप्ती नाही; आम्ही पुन्हा उभारू” हा एक जाणीवपूर्वक केलेला उच्चार होता.

सोमनाथ आपल्याला शिकवते की लवचिकता म्हणजे कधीही न पडणे नव्हे, तर पडूनही कायमचे न राहणे—पुन्हा पुन्हा उभे राहणे. समुद्रकिनारी उभे असलेले हे मंदिर केवळ भगवान शिवाचे स्मारक नाही; तर त्या अदम्य मानवी आत्म्याचे प्रतीक आहे, जो शतकानुशतके समुद्राच्या काठावर येऊन शांतपणे म्हणत राहतो—

**“आम्ही अजूनही येथे आहोत.
आम्ही स्मरण ठेवतो.
आम्ही पुन्हा उभारतो.
आम्ही टिकून राहतो.”**



## यशवंतराव चव्हाण स्मारक समितीस अनुदानाचा धनादेश प्रदान

**पिंपरी (दै. संध्या)**

पिंपरी-चिंचवड शहराच्या शैक्षणिक, सांस्कृतिक व सामाजिक जडणघडणीत महत्त्वपूर्ण योगदान देणाऱ्या "यशवंतराव चव्हाण स्मारक समिती"ला पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने १ कोटी रुपयांच्या अनुदानाचा धनादेश आज प्रदान करण्यात आला. हा धनादेश महापौर रवि लांडगे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. यावेळी आमदार शंकर जगताप, उपमहापौर सौ. शर्मिला बाबर, स्थायी समिती सभापती श्री. अभिषेक बारणे, विधी समिती सदस्य कुशाग्र कदम तसेच स्मारक समितीचे पदाधिकारी उपस्थित होते. महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री स्व. यशवंतराव चव्हाण यांनी राज्याच्या औद्योगिक, सहकारी आणि विकासात्मक धोरणांद्वारे आधुनिक महाराष्ट्राची भक्कम पायाभरणी केली. त्यांच्या दूरदृष्टीमुळे पिंपरी-चिंचवडसारखी छोटी गावे देशातील अग्रगण्य औद्योगिक शहरांमध्ये विकसित झाली. लाखो युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देत त्यांनी महाराष्ट्राच्या प्रगतीला नवी दिशा दिली. त्यांच्या कार्याचा प्रेरणादायी वारसा जतन करण्यासाठी स्थापन झालेली "यशवंतराव चव्हाण स्मारक समिती" गेल्या अनेक वर्षांपासून सामाजिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करत आहे. निगडी प्राधिकरण परिसरातील भव्य स्मारकात ग्रंथालय, वाचनालय, अभ्यासिका, सांस्कृतिक भवन, वैद्यकीय केंद्र आणि विद्यार्थी मार्गदर्शन केंद्र यांसारख्या लोकाभिमुख सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. या माध्यमातून हजारो विद्यार्थी, नागरिक आणि अभ्यासक लाभ घेत असून समाजाभिमुख उपक्रम सातत्याने राबविले जात आहेत. यावेळी बोलताना महापौर रवि लांडगे यांनी सांगितले की, "स्व. यशवंतराव चव्हाण यांची विचारधारा ही केवळ इतिहास नसून महाराष्ट्राच्या विकासाची प्रेरणाशक्ती आहे. शिक्षण, संस्कृती, सामाजिक बांधिलकी आणि युवकांच्या प्रगतीसाठी कार्य करणाऱ्या संस्थांना महापालिका नेहमीच पाठबळ देईल.

## थोडक्यात पण महत्वाचे...

### द. मा. मिरासदार पुरस्कार सारंग मांडके, सारंग भोईरकर यांना जाहीर



■ जन्मशताब्दीनिमित्त वर्षभर साहित्यिक-सांस्कृतिक उपक्रमांचे आयोजन

पुणे (दैनिक संध्या) : सुप्रसिद्ध साहित्यिक द.मा.मिरासदार यांच्या जन्मशताब्दीनिमित्त द.मा.मिरासदार प्रतिष्ठानतर्फे विविध साहित्यिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार असून, यंदाचा द.मा. मिरासदार पुरस्कार युवा कलाकार सारंग मांडके आणि सारंग भोईरकर यांना जाहीर करण्यात आला आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांचे प्रेरणादायी चरित्र कथन आणि स्वरचित काव्याच्या माध्यमातून युवा पिढीपर्यंत इतिहास पोहोचविणाऱ्या या दोन्ही कलाकारांचा पुरस्काराने सन्मान केला जाणार आहे. प्रतिष्ठानचे अध्यक्ष रवींद्र मंकणी आणि सचिव सुनेत्रा मंकणी यांनी सोमवारी आयोजित पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. यावेळी संस्थेचे विश्वस्त हरिभाऊ मिरासदार आणि प्रसाद मिरासदार उपस्थित होते. पुरस्कार वितरण सोहळा शनिवार, दि. १६ मे २०२६ रोजी सायंकाळी ६ वाजता पुण्यातील सर परशुराम महाविद्यालय येथील लेडी रमाबाई सभागृहात होणार आहे. उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात येणार असून, कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी केंद्रीय मंत्री प्रकाश जावडेकर असतील. भाजपचे राज्य सरचिटणीस राजेश पांडे, महाराष्ट्र साहित्य परिषदेचे अध्यक्ष योगेश सोमण यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. इतिहासतज्ज्ञ राजा दीक्षित हे प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित राहतील. द.मा.मिरासदार पुरस्काराचे हे तिसरे वर्ष असून मानपत्र, सन्मानचिन्ह आणि रोख २१ हजार रुपये असे पुरस्काराचे स्वरूप आहे. द. मा. मिरासदार हे कथालेखक, चित्रपटकथा व संवाद लेखक, कथाकथनकार आणि लोकप्रिय प्राध्यापक म्हणून ओळखले जात होते. सामाजिक, साहित्यिक आणि सांस्कृतिक क्षेत्रातील त्यांच्या बहुआयामी योगदानाचा गौरव करण्यासाठी त्यांच्या कार्याशी संबंधित क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या व्यक्तींना हा पुरस्कार दिला जातो. जन्मशताब्दी वर्षानिमित्त राज्यभर विविध साहित्यिक, सांस्कृतिक आणि प्रेरणादायी उपक्रम राबविण्यात येणार असल्याची माहितीही प्रतिष्ठानच्या वतीने देण्यात आली.

### आळंदीत इंद्रायणी काठी 'महाराष्ट्र तेजोत्सव'; 'कैवल्यवारी'तून भक्तिरसाची सुरेल मेजवानी

आळंदी (दैनिक संध्या) : संतभूमी आळंदी नगरीत प्रकाश, कला आणि संस्कृतीचा अनोखा संगम अनुभवायला मिळणार असून "महाराष्ट्र तेजोत्सव २०२६" अंतर्गत आयोजित "कैवल्यवारी – पावलांची संगीत वारी" या सांस्कृतिक कार्यक्रमांची पर्वणी १२ ते १४ मे दरम्यान इंद्रायणी घाटावर रंगणार आहे. महाराष्ट्र राज्य पर्यटन विभाग, आळंदी नगरपरिषद, श्री ज्ञानेश्वर महाराज संस्थान, आळंदी ग्रामस्थ तसेच आय रियालिटीजचे प्रसाद आसगावकर यांच्या संयुक्त विद्यमाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या तीन दिवसीय सोहळ्याचे उद्घाटन मंगळवारी (ता.१२) सायंकाळी ७ वाजता इंद्रायणी घाट येथे होणार आहे. त्यानंतर सायं. ७.३० वाजता "कैवल्यवारी – पावलांची संगीत वारी" या विशेष संगीत मैफलीत सुप्रसिद्ध गायिका अंजली मराठे, रश्मी मोघे आणि युवा गायक अक्षय घाणेकर आपल्या सुरेल सादरीकरणातून भक्तिमय वातावरण निर्माण करणार आहेत. अभंग, भारूड आणि वारकरी संगीताच्या माध्यमातून रसिकांना भक्तिरसाचा आनंद अनुभवता येणार आहे. बुधवारी (ता.१३) सायं. ७.३० वाजता संगीताचार्य डॉ.वृशाली शरांग दाबके व त्यांच्या शिष्यांचा विशेष संगीत कार्यक्रम होणार आहे. वारकरी संप्रदायातील अभंग, नृत्यनाट्य आणि सांस्कृतिक सादरीकरणांतून भक्ती आणि संस्कृतीची मेजवानी रसिकांना अनुभवायला मिळणार आहे. तर गुरुवारी (ता.१४) सायं. ७.३० वाजता राज्यस्तरीय पुरस्कार प्राप्त युवा भारूडकार कृष्णाई उळेकर यांचा भारूड कार्यक्रम रंगणार आहे. विनोद, समाजप्रबोधन आणि अध्यात्म यांचा संगम असलेले भारूड हे या सोहळ्याचे विशेष आकर्षण ठरणार आहे. इंद्रायणी घाट परिसरात होणाऱ्या या सांस्कृतिक महोत्सवामुळे आळंदी नगरी भक्ती, संगीत आणि संस्कृतीच्या तेजाने उजळून निघणार असून नागरिक आणि भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आळंदी नगरपरिषदेचे नगराध्यक्ष प्रशांत कुऱ्हाडे तसेच श्री ज्ञानेश्वर महाराज संस्थानचे विश्वस्त ह.भ.प.चैतन्य महाराज लोंढे (कबीर बुवा) यांनी केले आहे.

# सासवडमध्ये 'पुरंदर ॲग्रो एक्स्पो'च्या मंडपाचे पूजन

**सासवड (दै. संध्या)**



सासवड येथील श्री शिवाजी इंग्लिश मीडियम स्कूलच्या मैदानावर 'पुरंदर ॲग्रो एक्स्पो'च्या मंडपाचे पूजन करताना माजी आमदार श्री. संजय जगताप, सौ. राजवर्धिनीताई जगताप आणि उपस्थित मान्यवर.

पुरंदर तालुक्यातील शेतकऱ्यांना जागतिक बाजारपेठ आणि आधुनिक तंत्रज्ञानाची दारे खुली करून देण्यासाठी शरद कृषी व पर्यावरण विकास प्रतिष्ठानच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या 'पुरंदर ॲग्रो एक्स्पो' या कृषी व पशू प्रदर्शनाच्या तयारीला वेग आला आहे. सासवड येथील श्री शिवाजी इंग्लिश मीडियम स्कूलच्या परिसरात २२ ते २५ मे दरम्यान हे भव्य प्रदर्शन भरणार असून, याच्या मंडपाचे विधिवत पूजन मंगळवारी माजी आमदार संजय जगताप आणि ग्रामीण संस्थेच्या अध्यक्षा राजवर्धिनी जगताप यांच्या हस्ते संपन्न झाले. कोरोनाच्या संकटकाळानंतर प्रदीर्घ विश्रांतीनंतर हे प्रदर्शन पुन्हा एकदा मोठ्या स्वरूपात आयोजित केले जात असल्याने शेतकऱ्यांमध्ये मोठा उत्साह पाहायला मिळत आहे.

शेतीमध्ये सध्या वाढत असलेला उत्पादन खर्च कमी करणे आणि एकरी उत्पादकता वाढवणे हा या प्रदर्शनाचा मुख्य उद्देश आहे. यामध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) आणि अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करून कमी खर्चात भरघोस उत्पादन कसे घ्यावे, याचे थेट मार्गदर्शन अनुभवी तज्ज्ञांकडून शेतकऱ्यांना दिले जाणार आहे. विशेषतः ग्रामीण भागातील मजूर टंचाईवर मात करण्यासाठी उपयुक्त ठरणारी आधुनिक कृषी यंत्रे, हरितगृह तंत्रज्ञान, मशरूम उत्पादन आणि कोल्ड स्टोअरेज क्षेत्रातील नामवंत कंपन्या आपली उत्पादने आणि तंत्रज्ञान या प्रदर्शनात सादर करणार आहेत.

शरद कृषी व पर्यावरण विकास प्रतिष्ठानच्या माध्यमातून पुरंदर तालुक्यात झालेल्या व्यापक जलसंधारणाच्या कामांमुळे भूजल पातळीत लक्षणीय वाढ झाली आहे. या उपलब्ध पाण्याचा उपसा न करता त्याचा योग्य आणि काटकसरीने वापर करण्यासाठी शेतकऱ्यांना सेंद्रिय शेती आणि ठिबक सिंचनाचे विशेष प्रशिक्षण या एक्स्पोमध्ये दिले जाणार आहे. त्याचबरोबर पशुंचे आहार व रोग याविषयी मार्गदर्शन, तसेच पशुपालन, कुक्कुटपालन आणि प्रक्रिया उद्योगातील नवनवीन संधींची माहिती देऊन तरुणांना शेतीपूरक व्यवसायांकडे आकर्षित करण्याचा संयोजकांचा मानस आहे.

या चार दिवसीय प्रदर्शनात राष्ट्रीय आणि बहुराष्ट्रीय कंपन्यांचे प्रतिनिधी प्रत्यक्ष उपस्थित राहून सुधारित बी-बियाणे, खते आणि कीटकनाशकांबाबत सविस्तर मार्गदर्शन करतील. ग्रामीण भागातील आर्थिक सक्षमीकरणासाठी शेतकरी बचत गट आणि शेतकरी उत्पादक कंपन्यांच्या स्थापनेसाठी तज्ज्ञांचा विशेष सल्ला दिला जाणार आहे.

याप्रसंगी उपनगराध्यक्ष मनोहर जगताप, गटनेते अजित जगताप, माजी उपनगराध्यक्ष यशवंतकाका जगताप, पाणी पुरवठा सभापती ज्ञानेश्वर गिरमे, नगरसेवक सोपान रणपिसे, संतोष गिरमे, सेवानिवृत्त कृषी अधिकारी संभाजी गरूड, रवींद्रपंत जगताप, पुरंदर नागरीचे सरव्यवस्थापक अनिल उरवणे, सतीश शिंदे, प्रताप गरूड, सुनील जगताप, ॲड. सौरभ वढणे, तुषार जगताप, संतोष गायकवाड, दीपक जगताप, विनोद राठोड, कैलास जगताप, गणेश सरनाईक आदी उपस्थित होते.

तालुक्यातील शेतकऱ्यांनी या संधीचा लाभ घेऊन आपले शेतीविषयक ज्ञान अद्ययावत करावे, असे आवाहन संयोजकांनी केले आहे.

## चाकण शहर डीपीआर प्रश्नी उपमुख्यमंत्री शिंदे यांना साकडे

**चाकण (दै. संध्या)**

चाकण शहराच्या सर्वांगीण विकासासाठी महत्त्वपूर्ण ठरणाऱ्या डीपीआर (विकास आराखडा) प्रश्नी शिवसेनेचे शहरप्रमुख तथा नगरसेवक महेश मोरेश्वर शेवकरी यांनी शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख प्रकाश वाडेकर यांच्या उपस्थितीत राज्याचे उपमुख्यमंत्री तथा शिवसेना मुख्यनेते एकनाथ शिंदे यांची भेट घेऊन विकास आराखड्याबाबत सविस्तर चर्चा केली. चाकण शहराच्या वाढत्या लोकसंख्येचा व औद्योगिक विस्ताराचा विचार करून विकास आराखड्याला तातडीने मंजुरी देण्यात यावी, अशी मागणी यावेळी महेश शेवकरी यांनी केली. खेडचे माजी आमदार स्व. सुरेशभाऊ गोरे यांच्या स्वप्नातील शहर घडवण्यासाठी नगराध्यक्षा मनीषा गोरे व गटनेते, नगरसेवक नितीन गोरे यांच्या प्रयत्नातून डीपीआर अत्यंत महत्त्वाचा असून रस्ते, पाणीपुरवठा, वाहतूक व्यवस्था, सार्वजनिक सुविधा तसेच सुशोभीकरणाच्या दृष्टीने हा आराखडा लवकर मंजूर होणे आवश्यक असल्याचे पदाधिकाऱ्यांनी नमूद केले.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी याबाबत सकारात्मक भूमिका घेत संबंधित विभागाला तातडीने कार्यवाही करण्याच्या सूचना देत लवकरच मंजुरी संदर्भात अधिसूचना काढण्यात येईल, असे ठोस आश्वासन दिले. यावेळी उपजिल्हाप्रमुख प्रकाश वाडेकर यांनी चाकण शहराच्या विकासासाठी शासन स्तरावर सातत्याने पाठपुरावा सुरू असल्याचे सांगितले.

## नीरा येथे उन्हाळी कराटे प्रशिक्षण शिबिर उत्साहात संपन्न

**नीरा (दै. संध्या)**



आयडियल तायक्वांदो कराटे किक बॉक्सिंग असोसिएशन, नीरा यांच्यावतीने आयोजित करण्यात आलेले दहा दिवसीय उन्हाळी प्रशिक्षण शिबिर उत्साहात संपन्न झाले. १ मे ते १० मे दरम्यान पार पडलेल्या या शिबिरात पुणे, सातारा आणि नगर जिल्ह्यातील तब्बल ४० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला.

शिबिरामध्ये कराटे, तायक्वांदो, किक बॉक्सिंग, मर्दानी खेळ तसेच योगा यांसारख्या विविध प्रकारांचे प्रशिक्षण देण्यात आले. विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेत कौशल्याचे उत्कृष्ट प्रदर्शन केले.

या शिबिरातील विशेष आकर्षण ठरली पुणे जिल्ह्यातील नवीन मराठी शाळेची माजी विद्यार्थिनी व अहिल्यादेवी हायस्कूल फॉर गर्ल्सची इयत्ता सहावीतील विद्यार्थिनी कु. ओवी किशोर गजमल हिने ब्लॅक बेल्ट मानांकन प्राप्त करून उल्लेखनीय यश संपादन केले. स्पर्धेतील गुणवंत विद्यार्थी पुढीलप्रमाणे : रेड ब्लॅक बेल्ट : विहंग दिनेश भुजबळ (प्रथम)

रेड बेल्ट : आरोही विठ्ठल शिंदे (प्रथम), अबोली अभिजित कुलकर्णी (तृतीय), हर्षिता सुरेंद्र मांजरेकर (चतुर्थ), अर्पिता आकाश जव्हेरी (चतुर्थ) ब्ल्यू रेड बेल्ट : कृष्णराज शेखर खाकुर्डीकर (द्वितीय) पर्पल बेल्ट : वैष्णव किसन झुरंगे (प्रथम) ग्रीन ब्ल्यू बेल्ट : रेवा अजय बुरटे

विद्यार्थ्यांना संस्थेचे प्रशिक्षक अजित सोनावणे, दिनेश भुजबळ, निलम जव्हेरी, किशोर पवार, प्रज्वल निगडे, ओमकार खलाटे, प्रसाद कानडे, ओम ढमाळ, अभिषेक लकडे, शुभम मोरे आणि सृष्टी ढमाळ यांचे मार्गदर्शन लाभले.

संस्थेचे ग्रँडमास्टर संजय सोनवणे यांनी विद्यार्थ्यांना ब्लॅक बेल्ट प्रदान केले. यावेळी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष दत्ताजीराव चव्हाण उपस्थित होते. तसेच उपाध्यक्ष राजेश चव्हाण, सदस्य सुनील चव्हाण आणि डॉ. श्रेणिक शहा यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## लोकन्यायालयात ३६२३१ प्रकरणांचा निपटारा, २ कोटी ९ लाख रक्कमेची वसूली

**नारायणगाव (दै. संध्या)**



जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, पुणे यांच्या सौजन्याने तसेच तालुका विधी सेवा समिती जुन्नर यांच्या वतीने जिल्हा व अति- सत्र न्यायालय जुन्नर येथे शनिवार ( दि.०९) रोजी राष्ट्रीय लोकन्यायालयाचे आयोजन करण्यात आले होते. जुन्नर न्यायालयातील लोकन्यायालयचे उद्घाटन जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालय जुन्नर जिल्हा न्यायाधीश १- एस.बी. शेलार साहेब यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले .

याप्रसंगी न्याय आपल्या दारी या संकल्पनेनुसार विधिसेवा प्राधीकरण आपल्यापर्यंत पोहोचत आहे.

पक्षकारांनी लोक न्यायालयाच्या माध्यमातून आपली प्रलंबित प्रकरणे निकाली काढून आयुष्यातील महत्वाचा वेळ आणि पैसा वाचवावा असे आवाहन जिल्हा व अति सत्र न्यायाधीश एस बी शेलार साहेब यांनी केले.

या कार्यक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी लोकन्यायालय पॅनल प्रमुख न्यायाधीश जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालय जुन्नर एस बी शेलार साहेब, ४ थे दिवाणी न्यायाधीश क स्तर जुन्नर तसेचश्रीमती एस एस जैन, जुन्नर वकील बार असोसिएशनचे अध्यक्ष हेमंत हाडवळे, उपाध्यक्ष निलीमा शेरकर, सचिव पुराणिक नलावडे, लोक अदालत पॅनल सदस्य ॲड प्रविण मदगुले, ॲड श्वेता पवार तसेच समर्थ लॉ कॉलेज बेल्हेचे स्वयंसेवक विद्यार्थी उपस्थित होते. सदर लोकन्यायालयामध्ये दिवाणी दावे फौजदारी दावे दावा दाखल पूर्व बँकेची वसुली प्रकरणे ग्रामपंचायत महावितरण पतसंस्था फायनान्सची प्रकरणे तडजोडी करिता ठेवण्यात आली होती दिवसभराच्या कामकाजात लोकन्यायालयाचे ०२ पॅनल मध्ये दोन्ही बाजूच्या पक्षकारांचे म्हणणे ऐकून व त्यांच्यामध्ये समेट घडवून आणण्याचा प्रयत्न करण्यात येऊन त्याद्वारे एकूण ३६२३१ प्रकरणे आपसी समझोता व तडजोड करून निकाली काढण्यात आली तसेच प्रलंबित व दाखलपुर्व प्रकणांतील २ कोटी ९ लाख ६० हजार दोनशे अठ्ठावन रुपये रक्कमेची वसूली करण्यात आली.

राष्ट्रीय लोकन्यायालय यशस्वी करण्याकरिता एस बी शेलार साहेब जिल्हा न्यायाधिश जुन्नर यांच्या न्यायालयात व्ही सी द्वारे पक्षकार हजर झाले.

सदर राष्ट्रीय लोकन्यायालय यशस्वी करण्याकरिता जुन्नर वकील बार असोसिएशनचे सदस्य, पोलीस अधिकारी व कर्मचारी, न्यायालयीन कर्मचारी, पंचायत समिती जुन्नर, बँक, ग्रामपंचायत, महावितरण, पतसंस्था, फायनान्स, पक्षकार यांचे मोलाचे योगदान लाभले.

## मतदार नोंदणी अभियानाला नागरिकांकडून प्रचंड प्रतिसाद : आरती परदेशी

**चाकण (दै. संध्या)**




भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार चाकण नगरपरिषदेच्या वतीने शहरात सुरु असलेल्या नवमतदार नोंदणीत आपले नाव नोंद झाले आहे का, याची खात्री करून घेण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या मतदार पुनरनिरीक्षण कार्यक्रमास व मतदार नोंदणी अभियानाला नागरिकांकडून व नवमतदारांकडून प्रचंड प्रतिसाद मिळाला असल्याची माहिती नगरसेविका आरतीताई परदेशी यांनी दिली. मतदारांचे नाव सन २००२ च्या मतदार यादी मध्ये आहे, त्यांनी त्यांचे डिटेल्स, तर ज्यांचे नाव २००२ च्या यादीमध्ये नाही, अशा नागरिकांनी आपले आई, वडील, आजी, आजोबा यापैकी एकाचे २००२ चे डिटेल्स देऊन नाव नोंदणी करून घेतली. ज्या महिलांचे नाव २००२ च्या यादीमध्ये नाही, त्यांनी आपल्या माहेरचा पुरावा म्हणजेच आई, वडील, आजी, आजोबा यापैकी एकाचे २००२ चे डिटेल्स देऊन खात्री करून घेतली.

# निरा नदीच्या काठावर होणार हरिनामाचा गजर

**दत्तघाटावर ११ दिवसीय कीर्तन महोत्सव व भागवत महोत्सव**

**सोहळा दिवंगत अजित पवार यांना असणार समर्पित**

**नीरा (दै. संध्या)**



पुणे व सातारा जिल्ह्याच्या सीमेवरील निरा नदीकाठावरील पवित्र श्रीक्षेत्र दत्तघाट येथे १५ मेपासून भव्य "श्री ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण, दिव्य कीर्तन महोत्सव तसेच श्रीमद् भागवत कथा अखंड हरिनाम सप्ताह" सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. खंडाळा, फलटण, पुरंदर आणि बारामती तालुक्यातील ग्रामस्थांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेला हा धार्मिक सोहळा तब्बल ११ दिवस भक्तिरसात रंगणार असून दररोज हजारो भाविक उपस्थित राहणार आहेत.

हा सोहळा स्वर्गीय लोकनेते मा. अजितदादा पवार यांच्या पावन स्मृतीस समर्पित करण्यात आला असून उपमुख्यमंत्री सौ. सुनेत्राताई अजितदादा पवार यांची प्रमुख उपस्थिती लाभणार असल्याची माहिती आयोजकांनी पत्रकार परिषदेत दिली. संत ज्ञानेश्वर महाराजांसह विविध संतांच्या पालख्या पंढरपूरकडे जात असताना निरा नदीतील दत्तघाटावर निरास्नानाची परंपरा आहे. त्याच पवित्र भूमीवर आता हरिनामाचा अखंड गजर होणार असल्याने वारकरी संप्रदायातील भाविकांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

दि. १५ ते २५ मे २०२६ या कालावधीत होणाऱ्या या सप्ताहात पहाटे काकडा आरती, विष्णुसहस्रनाम, ज्ञानेश्वरी पारायण, हरिपाठ, प्रवचन सेवा, कीर्तन सेवा आणि श्रीमद् भागवत कथा यांचे आयोजन करण्यात आले आहे. ह.भ.प. दिलीपजी महाराज झगडे (पाडेगाव) हे भागवत कथा प्रवक्ते म्हणून मार्गदर्शन करणार असून ह.भ.प. लक्ष्मण महाराज कोकाटे (आळंदी) हे नवविधा भक्ती कथेद्वारे अध्यात्मिक संदेश देणार आहेत.

महाराष्ट्रातील विविध भागांतील नामवंत कीर्तनकार, प्रवचनकार, संत-महंत आणि वारकरी संप्रदायातील भाविक या सोहळ्यात सहभागी होणार आहेत. दिंडी सोहळा, नगर प्रदक्षिणा आणि सामूहिक हरिनाम संकीर्तनामुळे संपूर्ण परिसर भक्तिमय वातावरणाने भारावून जाणार आहे.

कार्यक्रमाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे पंचक्रोशीतील इयत्ता सातवी ते बारावीतील सुमारे एक हजार विद्यार्थ्यांना पालकांसह सहभागी करून संत विचारांची प्रेरणा देण्याचा विशेष उपक्रम राबविण्यात येणार आहे. सहभागी विद्यार्थ्यांना आकर्षक शैक्षणिक भेटवस्तू देण्यात येणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली.

सोहळ्यादरम्यान भाविकांसाठी भोजन व निवासाची मोफत व्यवस्था करण्यात आली असून पंचक्रोशीतील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून धार्मिक लाभ घ्यावा, असे आवाहन ह.भ.प. दिलीप महाराज झगडे, ह.भ.प. दत्तात्रय फरांदे महाराज तसेच आयोजक समितीच्या वतीने करण्यात आले. यावेळी पुणे जिल्हा परिषद माजी बांधकाम सभापती दत्ता चव्हाण, शंकरराव मर्दाने, मंगेश धमाळ यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते.